

लेखक

**ॲड. यशवंत बाबुराव कदम**

(नमनेश्वर)

कादंबरी

# वळणावळणाची वाट

कोमल

कादंबरी

# वळणावळणाची वाट

ॲड. यशवंत बाबुराव कदम
(नमनेश्वर)

कोमल
प्रकाशन

**वळणावळणाची वाट/कादंबरी**
Valanavalanachi Vat / Kadambari

पहिली आवृत्ती : १ मे २०२३

ISBN No. : ?

**लेखक :**

© ॲड. यशवंत बाबुराव कदम
बी-११०१, एकता मेडोज, सिद्धार्थ नगर,
बोरीवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६.
भ्रमणध्वनी : ९८९२०४६८६८/९६१९३६०६६१

**प्रकाशक :**

१) कोमल प्रकाशन
३०२, कृष्ण श्रद्धा, पांचाळनगर,
नालासोपारा (प.), जि. ठाणे.
मोबाईल : ९१३७६ ६५९६८/९९८७७ ७६८९९
२) ई-साहित्य प्रतिष्ठान

**मुखपृष्ठ :**
नरेश ठाकूर, चैतन्य आर्टस्, दादर
मोबाईल : ९८२०३८०२९९

**अक्षर जुळणी :**
समर्थ क्रिएशन
१६४, मनीषा, श्रीकृष्ण नगर,
बोरीवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६.
भ्रमणध्वनी : ९८२०७७९३२५

**मुद्रक :**
----

**मूल्य**
रु. १६०/-

**'वळणावळणाची वाट'** या माझ्या कादंबरीतील कथानकामध्ये वाचकांना काही प्रसंग, नावे, काही सत्य घटना आढळून आल्यास, माझ्या कादंबरीतील वास्तव चित्रण, व्यक्तिदर्शन आणि घटना प्रसंग यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही, असेल तर तो केवळ योगायोग समजावा... **ॲड. यशवंत बाबुराव कदम, नमनेश्वर.**

# वळणावळणाची वाट

(कादंबरी)

हे पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल टीम ई साहित्य प्रतिष्ठान

लेखक- **ॲड. श्री यशवंत बाबुराव कदम**

आणि प्रकाशक- **कोमल प्रकाशन**

यांचे मनःपुर्वक आभारी आहे.

या पुस्तकावरील प्रतिक्रिया आपण ॲड. श्री. यशवंत बाबुराव कदम यांना **ybkadam14@gmail.com** या ई मेल पत्त्यावर किंवा **9892046868** या phone क्रमांकावर कळवाव्या ही विनंती.

धन्यवाद

सुनीळ सामंत
टीम ई साहित्य
esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237
(Whatsappवर विनामूल्य ई पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)

# अल्प–परिचय

**ॲड.यशवंत बाबुराव कदम**

बी.ए., एल एल बी. ॲडव्होकेट हायकोर्ट, मुंबई

**जन्मतारीख** : १४ ऑगस्ट १९४८

**मूळगांव** : मु. पो. टेरव, ता. चिपळूण, जि.रत्नागिरी

**प्राथमिक शिक्षण** : ज्ञानेश्वर विद्यालय, वडाळा, मुंबई

**महाविद्यालयीन शिक्षण** : रुईया महाविद्यालय, मुंबई
न्यू लॉ कॉलेज, माटुंगा, मुंबई

**नोकरी** : आयकर खाते (मुंबई) येथून वरीष्ठ अधिकारी म्हणून निवृत्त
सध्या – मुंबई उच्च न्यायालयात वकिली

***

खालील साहित्य संस्थांशी स्थापनेपासून सहभाग
काव्यमंच, मुंबई
कोकण मराठी साहित्य परिषद
मराठा मंदिर साहित्य संघ, मुंबई
लोटिस्मा, चिपळूण आणि अनेक सामाजिक संस्था

***

**प्रकाशित साहित्य** :

१. सद्‌गुरू दत्तात्रय शिंदे महाराजांचे जीवन परिचय १९७५
२. फुलोरा प्रातिनिधिक काव्यसंग्रह २००८
३. जीवनगाणे (काव्यसंग्रह) ५ जून २०१०
४. अंतरंगत (काव्यसंग्रह) २८ फेब्रुवारी २०१०
५. घे भरारी प्रातिनिधिक काव्यसंग्रह २०११
६. जय दुर्गे (आरती संग्रह) २०११
७. भक्तिरंग (काव्यसंग्रह) २०१२
८. बोलविता धनी वेगळाची (काव्यसंग्रह) ११ जानेवारी २०१३
९. तांडव (चरित्र) ११ जानेवारी २०१३
१०.जय दुर्गे (आरती संग्रह) चौथी आवृती
११.श्री कुस्वामीनी आई भवानी वाघजाई देवस्थान, श्री क्षेत्र टेरव मंदिराचा समग्र इतिहास, ८ मे २०१३

१२.बोलके झाड (कथासंग्रह) मार्च २०१६
१३.महामानव... (प्रातिनिधिक कविता संग्रह) मार्च २०१६
१४.दसपटीच्या श्रीरामवरदायिनीचा इतिहास (संपादित एप्रिल २०१६)
१५.आकाशाचे पंख (कथा संग्रह) १८ फेब्रुवारी २०१७
१६.अंतरीचा दीप (अभंगगाथा) १२ एप्रिल २०१८
१७.गडगीचा डोह (कथासंग्रह) २० मे २०१८
१८.देव माणूस (व्यक्तिचित्र) मे २०१८
१९.लोहितचे मानसपुत्र : संत शंकरदेव यांचे चरित्र (मार्च २०१९)
२०.हरिपाठ चिंतन (मार्च २०१९)
२१.वळणावळणाची वाट (कादंबरी) १६ डिसेंबर २०२२
२२.मावळतीच्या सावल्या (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२३.गरुडझेप (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२४.ऊनपावसाचा खेळ (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२५.लंडनचा किनारा (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२६.आडवळणाची वाट (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२

**आगामी पुस्तके** :
- चांदण्याचा पाऊस (ललित लेख)
- मावळतीच्या साक्षीने (कविता संग्रह)
- शब्द स्फोट (हिंदी काव्यसंग्रह)
- क्षितीजा पलीकडच्या प्रवासात (मराठी काव्यसंग्रह)
- आध्यात्मिकतेचा अन्वयार्थ – एक अभ्यास (ज्ञानदेव आणि तुकाराम)

**पुरस्कार** : 'जीवन गौरव पुरस्कार' – वंदना प्रकाशन उल्लेखनीय साहित्यिक कार्याबद्दल.
लोटिसमाचा कविवर्य द्वारकादास शेंडे कथा पुरस्कार २०१८ बोलके झाड या कथा संग्रहाला. गो. नि. दांडेकर यांच्या नावाचा कथेला तृतीय पुरस्कार २०१८ कोकण मराठी साहित्य परिषदेचा 'गडगीचा डोह' या कथा संग्रहाला विशेष पुरस्कार, २०१८.

# अर्पण पत्रिका

''वळणावळणाची वाट'' ही कादंबरी
मी माझे पितृतुल्य, आदरणीय,
**पद्मश्री मधु मंगेश कर्णिक**
यांना अर्पण करीत आहे...

**– ॲड. यशवंत बाबुराव कदम**

# माझे दोन शब्द

आजवर कादंबरी ह्या साहित्य प्रकाराकडे वळण्याचा योग आला नाही. बहुतेक जुन्या कादंबरीकारांच्या पुस्तकांनी गारुड केले होते आमच्या पिढीवर. एकदा एका लेखकाच्या कादंबऱ्यांचे वाचन सुरू केले की, त्यांच्या सगळ्या कादंबऱ्या वाचून पुऱ्या होत. पण सगळे... शालेय आणि महाविद्यालयीन कालखंडात. त्यात कथेची सरशी झाली आणि लघु कथेचे आठ कथा संग्रह आणि एक दीर्घ कथा संग्रह प्रकाशित झाले. पण कादंबरीकडे वळावे असे नाही वाटले.

आजवर माझी वीस पुस्तके प्रकाशित झाली. त्यात आठ कविता संग्रह, आठ कथा संग्रह, अभंग गाथा, चरित्र इ. चे लेखन झाले. पण त्यात कादंबरीकडे वळण्याचा योग काही आला नाही.

कादंबरीचा आवाकाच मोठा असतो. त्यातल्या कथानकाचा, त्यात वावरणाऱ्या पात्रांचा, निसर्गाचा. खरे तर ते कथानक वजनदार असायला हवे म्हणजे भिडते वाचकाला. पण तशा गोष्टी काही घडल्या नाहीत. पण एक गोष्ट प्रकर्षाने घडली की, कथा लिहिताना काही कथा लांबल्या... म्हणजे दीर्घ कथा झाल्या. कथानकही चांगले... वाचकाच्या मनाला भिडणारे असायला हवे. त्यात झाले काय ? की वळणावळणाची वाट ही कथा लिहीत असताना ती दीर्घ कथा कधी झाली हे समजलेच नाही. आणि दीर्घ कथा संग्रहात टाकण्याचीही शक्यता नव्हती. मग ठरविले ही छोटे–खानी कादंबरी होऊ शकते का? काहींनी सुचविले की त्या कादंबरीच्या कथानकामध्ये अधिक घटना येतील असे करा. निसर्गाचे वर्णन टाका. म्हणजे तिची लांबी वाढेल. पण या कादंबरीच्या बाबतीत मी तो विचार झटकून टाकला आणि आहे त्याच स्वरूपात ती यावी असे मला वाटले, तिचा बाज बिघडू नये म्हणून.

या कादंबरीतील कथानक मला खूप आवडले आणि पक्के ठरविले की ''वळणावळणाची वाट'' याच नावाने ही कादंबरी प्रकाशित करावी. ती माझ्या वाचकांनाही आवडेल. नाहीतरी आताच्या बदलत्या काळात वाचकही कमी झालेत आणि मोठ्या कादंबऱ्या वाचनापासून वाचक दूर होत चालले आहेत. मग हा प्रयोग मनावर घेतला आणि कादंबरी या स्वरूपातच ही कथा आणण्याचे ठरविले.

आपण ज्या वातावरणात जगतो, वा सभोवतालच्या लोकांचे समाजाचे जगणे पहातो त्यातून अनेक गोष्टी मनात घर करत राहतात. आणि त्याच या कथानकातून मांडल्या जातात. त्यात लघू कथा किंवा दीर्घ कथा किंवा कादंबरी या प्रकारात त्या प्रकाशित होतात. मी ठरविले की पानांनी वजनदार असण्यापेक्षा हे पुस्तक जर वाचकांच्या मनाला भिडले, तर ते माझ्या मनाला आवडेल. आणि ही कादंबरी आता प्रवाहीत होत आहे.

ज्या साहित्याच्या प्रकाराला आजवर आपण स्पर्श केला नाही, ती कादंबरी आता प्रकाशित होत आहे हे माझ्या जीवनातील एक आनंदाची घटना आहे असे मी समजतो.

या कादंबरीला प्रस्तावना लाभली आहे ती प्रा.प्रतिभा सराफ यांची. मी त्यांचा आभारी आहे. आज आमच्या कोकण मराठी साहित्य परिषदेत त्यांच्यासारखे नव्या दमाचे लेखक/लेखिका, समीक्षक साहित्य क्षेत्रात सक्षमपणे भरारी मारत आहेत. आज त्यांची प्रतिमा ही साहित्यीकाची आहे आणि त्याचा बोलबाला मराठी साहित्यात आहे. अनेक पुस्तकांना त्यांच्या प्रस्तावना लाभल्या आहेत. आणि आज माझ्या या कादंबरीलाही.

गेल्या चाळीस वर्षाचा आढावा घेतला तर कोकणातल्या साहित्यीकांचा वरचष्मा होताच, त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या, नाटके, कथा संग्रह, ललित वाङ्मय, आमच्या नव्या पिढीला गारुड करून गेले. माझे  पितृतुल्य पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या साहित्याने आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाने आमची पिढी आज सशक्तपणे लिहिते आहे. हेच कोकण मराठी साहित्य परिषदेचे फलित होय असे मी समजतो. बाबांच्या म्हणजेच मधु भाईंच्या कादंबऱ्या आणि कथा संग्रह यातून आमची पिढी खूप काही शिकून गेली. आणि साहित्य क्षेत्रात नव–नवे प्रयोग आज करीत आहे. आम्हाला ते पितृस्थानी आहेत, आदर्श आहेत. आणि आज ही कादंबरी प्रकाशनाच्या मार्गे आहे हे त्यांचेच आशीर्वाद आहेत असे मी मानतो.

ही माझी छोटीशी कादंबरी माझे पितृतुल्य पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांना अर्पण करीत आहे. त्यांचे अनंत उपकार माझ्यावर व आमच्या पिढीवर आहेत. हे ऋण कधीही न फेडता येणारे आहेत. हे खरेच !

या कादंबरीची अक्षर जुळवणी आमचे मित्र राम जोशी आणि भगिनी मानसी जोशी यांनी केले. अगदी प्रेमाने. त्यांचाही मी आभारी आहे.

या कादंबरीचे मुखपृष्ठ चैतन्य आर्टस्‌चे आर्टिस्ट आमचे मित्र नरेश ठाकूर यांनी केले आहे. अगदी प्राण ओतून. मला त्यांच्या ऋणात रहायला आवडेल.

हि छोटेखानी कादंबरीचे ई–बुक करावे असे माझे मित्र साहित्यिक प्रवीण दवणे यांनी सुचविले आहे. तसे श्री.सुनील सामंत यांच्या ई साहित्य या साईटवर प्रकाशित होत आहे.

त्याच प्रमाणे माझे आता प्रकाशित होणारे पाचही कथा संग्रह ई साहित्यावर यावेत अशी इच्छा आहे.

या कादंबरीच्या निमित्ताने, कादंबरी या बिजाला आता कोंब फुटले आहेत. अनेक गोष्टी मनात रुंजी घालत आहेत. त्यातून काही भव्य–दिव्य व्हावे असे वाटते. पांडुरंगाची इच्छा !

वळणावळणाची वाट ही कादंबरी माझ्या वाचकांना नक्कीच भावेल अशी आशा करतो आणि थांबतो.

**– ॲड.यशवंत बाबुराव कदम**

**नमनेश्वर**

# प्रस्तावना

दीर्घकाळ साहित्यीक क्षेत्रात असलेले, तसेच अनेक साहित्य चळवळींशी निगडित असणारे आणि साहित्याचे विविध प्रकार अगदी सहजपणे आणि उत्कृष्टपणे हाताळलेले ॲड. यशवंत बाबुराव कदम यांचा मराठी रसिक वाचकांशी ऋणानुबंध आहेच. 'वळणावळणाची वाट' या कादंबरीद्वारे प्रथमच वाचकांसमोर एक नवीन साहित्यप्रकार ते घेऊन येत आहेत, याबद्दल सर्वप्रथम मी त्यांचे अभिनंदन करते.

शाम आणि अंजू या मध्यवर्ती भूमिकेतील व्यक्तिमत्त्वाभोवती ही कादंबरी साकारलेली आहे. या कादंबरीतील शाम हा तरुण वयात अंजू नावाच्या मुलीच्या प्रेमात पडतो आणि तिथूनच कादंबरी सुरू होते. शाम अंजूला आवडतो की नाही? त्यांचे प्रेम प्रकरण चालू होते की नाही? त्यांचे एकमेकांशी लग्न होते की नाही? शाळेनंतर आयुष्यात ते परत भेटतात का? भेटतात तेव्हा त्यांची मानसिक स्थिती कशी असते? त्यांची आर्थिक परिस्थिती कशी असते? नियती त्यांना नेमकेपणाने कुठे घेऊन जाते? या सर्व प्रश्नांची उत्तरे आपल्याला या कादंबरीतून मिळतील. कादंबरीच्या सुरुवातीपासून ती वाचताना कादंबरीत पुढे काय होणार? ही उत्सुकता वाचकाला संपूर्ण कादंबरी एका दमात वाचायला भाग पाडते. ही कादंबरी एका दमात वाचणे ही शक्य आहे कारण ही फक्त सत्यान्नव पानांची कादंबरी आहे. वळणावळणाच्या वाटेवरून जाताना कादंबरीचा शेवट एका वेगळ्याच वळणावर होतो.

एखादा माणूस घडतो कसा, याविषयीची सुरस कथा यात दडलेली आहे. 'शाम' या मुलाच्या वडिलांची परिस्थिती त्याला कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याइतकीही नसते. मोठ्या मुश्किलीने ते त्याची पहिल्या टर्मची फी कर्ज काढून भरू शकतात त्यानंतरचा त्याचा कष्टाचा प्रवास हा वाचकाचाही दमछाक करणारा आहे. या कादंबरीतील दोन पात्रं ही अतिशय महत्त्वाची आहेत. त्यातील एक म्हणजे 'तान्या' जो एका गॅरेजचा मालक असतो. त्याला दोन अपत्य असूनही तो अतिशय जिव्हाळ्याने शामला समजून घेतो. इतकेच नव्हे तर त्याला आपला मुलगा मानतो आणि मदतीचा हात देऊन उच्चशिक्षण आणि

उच्चपदस्थ पदापर्यंत नेऊन पोहचवतो. या कादंबरीतील दुसरे महत्त्वाचं पात्र म्हणजे अंजू. शामच्या प्रेमसंबंधांबद्दल आणि तो अजूनही अविवाहित असल्याबद्दल जेव्हा तिला कळते, ती सर्वार्थाने त्याच्या जवळ जाते. त्यामागचे कारण सुद्धा या कादंबरीत अप्रत्यक्षपणे पण उत्कृष्टपणे आलेले आहे.

ॲड. कदम यांना वकिलीकेचे ज्ञान असल्यामुळे असेल कदाचित परंतु या कादंबरीमध्ये 'आर्ग्युमेंट्स', 'हिंदू लॉ', 'ह्यूमन राईट संस्था', 'नागरिकत्व', 'पिटीशन', 'रिटपीटेशन', 'डायव्होर्स' यासंबंधीची खोल तसेच अचूक माहिती कथानकात आलेली आहे.

या कादंबरीमध्ये 'शाम' हा अतिशय मोठ्या कंपनीचा मालक असल्यामुळे त्याचे उठणे–बसणे हे मोठमोठ्या हॉटेलमध्ये दाखवलेले आहे तसेच त्याच्या देशाविदेशातील मीटिंग्ज, कॉन्फरन्सेस याविषयीचीही सर्वसामान्यांची उत्सुकता वाढेल तसेच कुतूहल शमवेल अशी माहितीही या कादंबरीत आहे. एखाद्या प्रसंगाची कमीत कमी शब्दात असलेली वर्णने आणि सहजसंवाद यामुळे कादंबरी रसाळ झाली आहे. वानगीदाखल इथे एक उद्धृत करते.–

'मी त्याच्या जीवनाचा जन्मदाता नाही पण त्याच्या जीवनाचा शिल्पकार आहे. माझ्यासमोर तो शिकला वाढला आणि घडला आहे. अंतरबाह्य मी त्याला ओळखतो. तो खूप हळवा आहे. प्रेमळ आहे. आज त्याला कोणाच्या तरी प्रेमाचा आधार हवा आहे आणि तू ही त्याच अवस्थेतून गेली आहेस. तुम्ही दोघे एकत्र आलात तर सुखी व्हाल. अंजू, तेव्हा विचार कर आणि श्याम भरकटण्यापूर्वी त्याला आधार दे.'

'वळणावळणाची वाट' कादंबरी वाचकाला काहीतरी देऊन जाते, म्हणून मलाही कादंबरी महत्त्वाची वाटते. आपले प्रेम नाकारणारी प्रेयसी असो, शाळकरी मुलाला समजून न घेता आयुष्याच्या सुरुवातीलाच वाईट वागणारा प्रेयसीचा पिता असो या कादंबरीतील नायक मात्र मनात कोणतीही किल्मिष न ठेवता त्यांच्याशी अत्यंत प्रेमपूर्वक आणि आदरपूर्वक वागतो. अगदी छोट्या छोट्या प्रसंगातून एकमेकांविषयीचा तीव्र द्वेष असो किंवा निर्व्याज प्रेम असो ते

ॲड. कदम यांनी बारकाव्यांसहित वाचकांपर्यंत पोहोचवलेले आहे. ही संपूर्ण कादंबरी मानवकेंद्रित आहे.

आजकालच्या धावपळीच्या आयुष्यात माणसांकडे वेळच नसतो त्यामुळे मला या कादंबरीविषयी एक गोष्ट आवडली ती म्हणजे ही कादंबरी सुपरफास्ट पद्धतीने पुढे सरकते. एका माणसाच्या आयुष्यातील पन्नास वर्षांचा पट हा त्र्यान्नव पानांमध्ये मांडते.

या कादंबरीत कोरोना काळात घडलेल्या काही घटनाही सहजपणे आणि तितक्याच नेमकेपणाने येतात त्यामुळे ही कादंबरी वास्तववादी वाटते. 'वृद्धाश्रमा'सारखा एक वेगळा आणि आजच्या काळातील महत्त्वाचा विषय या कादंबरीमध्ये हाताळला गेला आहे, ही गोष्ट सुद्धा मला फार महत्त्वाची वाटते. वडिलांकडे असुरक्षित वाटणाऱ्या आणि कॅन्सरग्रस्त होऊन हे जग सोडून गेलेल्या आईमुळे अनाथ झालेल्या मुलाचा सांभाळ करणारा या कादंबरीचा अत्यंत त्यागी वृत्तीचा आणि स्फूर्तीदेवते पुढे सदा नतमस्तक झालेला नायक शाम हा आपल्या मनात घर करतो. ही कादंबरी सर्व वयोगटातील वाचकांच्या मनाचा ठाव घेईल आणि जीवनाकडे बघण्याची एक सकारात्मक दृष्टी देईल, हे निश्चितच!

**प्रा. प्रतिभा सराफ**

**१ डिसेंबर २०२२**

# वळणावळणाची वाट

शाम, मयूरला सोबत घेऊन लंडनच्या विमानात विसावला आणि गेला हरवून अंजूच्या आठवणींच्या धूक्यात, चाचपीत, या प्रदिर्घ जीवन प्रवासाच्या, वळणावळणाच्या वाटेवरील चढउतारात, नियतीच्या सापशिडीच्या या खेळातील हा जीवघेणा खेळ, पापण्या आडच्या हरवलेल्या अश्रूंच्या ओलाव्यात... एकटाच.

त्याला आता प्रदिर्घ काळ उलटून गेला होता. पण अजूनही शाम आपले पहिले प्रेम विसरायला तयार नव्हता. रात्रं दिवस अंजूचाच विचार. अंजूने शामला पूर्णपणे व्यापून टाकले होते. दिवस रात्र एकच ध्यास...अंजूचा. ती कोठे असेल, कशी असेल, लग्न झाले असेल कां ? पार अंजूमय झाला होता शाम.

आणि एक दिवस ती सापडली, गेली पेरून प्रेमाची हिरवळ... आणि आता जीवघेण्या वियोगाला सोबत देऊन आणि घेऊन आठवणींची गाठोडी. दूर–दूरच्या प्रवासाला...

शाम आणि अंजू एकाच शाळेत होती. तसे पाहिले तर त्यांची फारशी ओळख नव्हती. पण शामच्या मनास अंजूने पूर्णपणे व्यापून टाकले होते. कणभरही जागा नव्हती बाकी. अकरावी नंतर शाळा संपली. अंजू आता आपल्याला कधीच दिसणार नाही. भेटणार नाही. या कल्पनेने शाम अगदी वेडापीसा झाला होता.

अजून अकरावीची बोर्डाची परिक्षा व्हायची होती. शाम तसा हुशार विद्यार्थी होता. सत्तर टक्के मार्क त्याला मिळायचे. पण अंजूच्या विचारांनी तो पुरता कोसळला. रात्ररात्र जागू लागला. नजर पुस्तकावर ठरत नव्हती. फक्त अंजू आणि अंजू. दुसरा विषयच त्याच्या नजरेसमोर येत नव्हता. आता परिक्षेला आठवडाच बाकी होता. आणि शामच्या मनातली अंजूबद्दलची हूरहूर समुद्राच्या लाटांसारखी पुनः पुनः मनाचा वेध घेत होती. त्याने सगळी पुस्तके बांधून ठेवली. उद्या आपला नंबर कोणत्या शाळेत अथवा कॉलेजमध्ये येणार हे समजणार. तो घरून निघाला. शाळेत जाऊन हॉल तिकीट घेतले. घरी येताना त्याच्या देसाई नावाच्या मित्राकडे तो गेला. अभ्यासाच्या चर्चेऐवजी त्याने

अंजूचा विषय त्याच्याजवळ काढला. तोहि म्हणाला, ''ती तर येथे 'सिमला व्हिला' मध्येच रहाते.'' शामने हे ऐकले आणि त्याच्या मनाची चक्रे भराभर फिरायला लागली. तिचा पत्ता तर समजला होता. त्याने ठरवले तिला एक पत्र पाठवायचे. त्याने ते पोष्टातून आणले.

खरे तर त्या काळात पत्र आणि तेही मुलीला लिहायचे, ही कल्पना कोणाच्याच मनात आली नसती. तशी तिची, त्याची तोंडओळख असेल. पण तेव्हड्यावरून ती त्याला ओळखत नसावी. एक हुशार विद्यार्थी म्हणून सगळेच जण शामला ओळखीत एव्हढेच. पण मनात घुसलेला विचार काही केल्या बदलेना. तो सरळ पोष्ट ऑफीस मध्ये गेला. एक पोष्ट कार्ड घेतले आणि अंजूचे नाव टाकून ते पत्र पोष्टाच्या डब्यात पडले. त्याच्या मनात अंजूने अशी काही जादू केली होती की, मनातल्या विचारांना बदलण्याची संधी नाही मिळाली आणि तो घरी आला.

त्याचे घर एका चाळीत, एका रूमचे होते. ती चाळ होती पोलीसांची. शामचे वडिल पोलिस खात्यात हवालदार होते. त्या पत्राने आपले काम केले आणि ते अंजूच्या हातात पडले. तिच्या मनातल्या वादळाने तिला पुरते व्यापले. हा कोण शाम? आणि मला पत्र का लिहिले? शिवाय त्या पत्रातला मजकूर सामान्य, प्रेमाचा लवलेश नसलेला पण त्यातल्या एका वाक्याने घोटाळा केला ''आता आपण भेटू शकणार नाही'' बस्स! शामच्या या पत्राने तिच्या त्या बालवयात धुळवटच केली. प्रथम आईकडे आणि मग वडिलांकडे हे पत्र त्या लेकीने दिले आणि स्फोट व्हायचा तो झाला आणि घडले रामायण महाभारत.

त्याकाळात असा प्रेमपत्रांचा फारसा सुळसुळाट नव्हताच. भेटी गाठी प्रेमीकांच्या होत, पण त्याही क्वचित.' पण शामने आपला पत्ता ह्यावर लिहिला नव्हता. पण त्या पत्रात शामने आपले नाव मात्र पत्राच्या शेवटी लिहिले होते.

अंजूला तिच्या वडिलांनी खूप झापले. ''कोण आहे हा शाम! तुझा त्याचा संबंध काय! बोल! मी नाही ओळखत याला. मला काहिच माहिती नाही! खरं! हो! वा तो कोण शाम हे ही माहिती नव्हते. पण एक हुशार विद्यार्थी म्हणून शाळा त्याला ओळखत होती. एवढाच काय तो सुराग बस्स.

दुसऱ्या दिवशी अंजूचे वडिल शाळेत गेले. 'शाम' हा एकटाच विद्यार्थी

होता त्या नावाचा. तर हाच असावा म्हणून त्याचा रहाण्याचा पत्ता घेऊन अंजूचे वडिल व भाऊ शामच्या घरी त्या दिवशी सकाळी पोहोचले.

तो समजला, काय गडबड आहे ती. त्या पत्राने आपले काम चोख पार पाडले आणि संकट समोर उभे राहिले. पण कोण जाणे शामने स्वतःला सावरले आणि...

''तुम्ही शाम का?''

''हो!''

''कोण कोण असता घरी.''

''मी आणि माझे वडिल!''

''कोठे आहेत?''

ड्यूटीवर! येतील रात्री ''तुम्ही त्यांना उद्या सकाळी भेटायला या!''

''ठिक. खरे ना?''

''हो अगदी खरे!''

शाम पुरता घाबरला होता. पण आता हे संकट घरी आले तर आता निस्तरण्याशिवाय उपाय नव्हता. त्याने मनाची तयारी केली. पण उद्या वडिलांना ही मंडळी भेटल्यावर काय होईल? या विचाराने तो पुरता ढेपाळला होता. आता हे पत्राचे प्रकरण निस्तरायची पुरी तयारी शामने मनोमन केली होती.

त्याकाळी अभ्यास दिवसा शिवडीचे विठ्ठल मंदिर व रात्री रस्त्यावरल्या दिव्याखाली व्हायचा. घरी लाईट डीम. वाचताही येत नसायचे. दुसऱ्या दिवशी शामने आपली सगळी कामे आटोपून ७।। वाजताच घर सोडले. चावी बाजूच्या घरात दिली आणि तो निघून गेला. त्याची नजर फक्त पुस्तकांच्या पानावरून फिरत होती आणि अंजू मात्र त्या पानांवर विराजमान झालेली.

सकाळीच ही मंडळी आली.

''तुम्ही शामचे वडिल काय?''

''हो!''

तुमच्या मुलाने हे पत्र माझ्या मुलीला पाठविले आहे! वाचा! तुमचा

मुलगा माझे काळीज तोडायला निघाला आहे. आवरा त्याला!''

''बघतो मी! शाम चांगला मुलगा आहे. मी समजावतो त्याला. तुम्ही निश्चींत रहा!''

येवढे सांगून ती मंडळी निघून गेली. घरी रामायण, महाभारत घडले असणार. माझ्या प्रेमाच्या या मुर्खपणामुळे हे शाम जाणत होता. शामचे वडिल त्यावेळी कोणातरी मंत्र्याचे बॉडीगार्ड होते. शाम आणि त्याचे वडिल हे नेहमी भेटत असे नाही. त्या दोघांमध्ये एक वही होती. त्यात ते मेसेज लिहून ठेवीत. केव्हा येणार इ. ते त्यांना रात्रपाळी असल्याने संध्याकाळीच निघून गेले. पण त्यांनी त्यांच्या मेसेज बूकमध्ये लिहिले होते.

''शाम! ते गृहस्थ येऊन गेले... असे म्हणाले, तु आता लहान नाहीस! असा प्रकार व्हायला नको होता. पण आता तु या प्रकरणातून लांब रहा! हे बरे. तू सूज्ञ आहेस, हुशार आहेस. तुझे भले कशात आहे हे तुला समजले असेलच!''

शाम विठ्ठल मंदिरातून ५।। वाजताच घरी आला. शामचे वडिल शांत होते. सकाळच्या प्रकरणाचा मागमुसही त्यांच्या चेहऱ्यावर दिसला नाही.

''मी डायरीत मेसेज लिहिला आहे. तो वाच. मी उद्या दुपारी परत येईन.'' असे सांगून ते निघून गेले.

त्यांच्या या वागण्याने शाम चक्राऊन गेला. एखाद्या बापाने दोन कानशीलात लगाऊन दिली असती. पण शाम आला तेव्हा ते एकदम शांत होते. याचेच आश्चर्य शामला वाटले आणि आपल्या डायरीत काय लिहिले आहे हे वाचण्यासाठी त्याने डायरी उघडली...

तर वरील मजकूर! त्याला आपल्या वडिलांबद्दल आदर वाटला नव्हे वाढला. इतर कुठला बाप आकांत तांडव करता. पण शामचे वडिल एकदम कूल. काही झालेच नाही अशा अविर्भावात ड्यूटीवर निघून गेले.

त्या रात्री शाम न जेवताच झोपला. आपल्या वडिलांना त्या गृहस्थाने काय ऐकवले असेल, याची कल्पनाच तो करीत बसला. पण वडिलांच्या मेसेजने त्याचा धीर थोडा चेपला. पण आपण आता अंजू पासून थोडे दूरच

रहावे असे त्याने ठरवले.

शामने स्वतःला खूप समजाविले. पण अंजू काही डोक्यातून जायला तयार नव्हती. गेले २/३ दिवस या प्रकरणाने अभ्यासाचा बट्ट्याबोळ झाला होता. पुस्तक नजरेसमोर धरावे असे वाटत नव्हते. नको नको ते विचार डोळ्याच्या पापण्यांवर थैमान घालीत होते. तो, त्याच्यामुळे पार ढेपाळला होता. ही परिक्षा म्हणजे आयुष्याची पहिली पायरी. माझ्याकडून वडिलांना चांगल्या मार्काने पास होण्याची अपेक्षा.

''तुला फर्स्ट क्लास मिळाला तर, दुसऱ्या दिवशी बँकेत चांगली नोकरी लावीन.'' वडिल. असे कितीतरी वेळा शामच्या वडिलांनी बोलून दाखविले होते. हे वाक्य त्याच्या डोळ्यासमोर सारखे दिसायचे आणि अंजू दुसऱ्या बाजूला. आपल्याला चांगले मार्क मिळाले तर ठिक. पण तसे नाही घडले तर? आयुष्याचा मार्गच बदलेल आपल्या. पुढची वाट खडतर आहे. हे तो समजला.

दोन दिवसांवर परिक्षा येऊन ठेपली. पोतदार कॉलेजमध्ये त्याचा नंबर आला होता आणि अंजूचाही. हे त्याला समजले आणि मनाची तगमग अधिकच वाढली. मनाचा कालवा झाला होता, काळजातली धडधड खूपच वाढली होती. परिक्षेला तर बसायला हवे आहे. त्याला अजून भिती वाटत होती की लोक त्याला मारतील, दमबाजी करतील इत्यादी. कारण जाण्या येण्याचा रस्ता एकच होता. ती दिसेल रस्त्यात जाता येता. या विचारांचे काहुर त्याला सतावीत होते. गेले ४ दिवस काडीचाही अभ्यास झाला नाही. शिवाय भितीने झोपेचेही खोबरे झाले होते. शाम पुरता गळून गेला होता.

परिक्षेला दोन दिवस बाकी होते. शामने वडिलांना सांगितले.

''तुम्ही त्या कॉलेजची गार्ड ड्युटी घ्या! मला भिती वाटते त्या लोकांची!'' शाम.

''बघतो!'' वडिल.

शामच्या वडिलांना एका आठवड्याची ड्युटी पोतदार कॉलेजला लावली. शाम थोडासा निश्चिंत झाला पण पुढे मोठे संकट वाढून ठेवले होते हे त्याला केंद्रावर गेल्यावर समजले. अंजूचा नंबरही शामच्या हॉलमध्येच होता.

म्हणजे प्रचंड टेंशन. पण एक गोष्ट मात्र जमेची की वडिलांची ड्युटी त्या कॉलेजवर होती.

शामचा नंबर मागच्या बाकावर तर त्याच हॉलमध्ये पलिकडच्या कोपऱ्यात पहिल्या बाकावर अंजूचा. ती त्याला त्याच्या बाकावरून दिसायची.

श्रीमंत बापाची पोरगी टकाटक यायची. झुपकेदार केस, सौंदर्याचा पुतळाच होती ती. तिला कसले टेंशन नव्हते. पण पहाड कोसळला होता तो शामच्या डोक्यावर. चार दिवस परिक्षा चालली. दररोज दोन पेपर, परिक्षा संपली. दररोज शाम लवकर पेपर टाकून निघायचा. काय लिहितोय याचाही त्याला पत्ता नव्हता. ते ४ दिवस प्रचंड दबावाखाली गेले. पेपर गेले. पण मार्क? तो चिंतेत होता. वडिल म्हणाल्याप्रमाणे चांगले मार्क मिळाले तर बँकेमध्ये हमखास नोकरी. पण नाही तर... तर आपल्या जीवनाचा मार्ग कोणता असेल? याचा अंदाज शामला येत नव्हता.

खरेतर परिक्षेचे जोखड उतरल्यावर शाम आनंदात असायला हवा होता. पण तसे नाही घडले. रिझल्ट दोन महिन्यांनी. तोपर्यंत काय करायचे याच विचाराने त्याच्या डोक्याचा भुगा झाला होता.

''पेपर कसे गेलेत!''

''ठिक!''

''म्हणजे चांगले नाहीत!''

''शामने काहीच उत्तर दिले नाही.''

काय सांगावे यांना, काहीही होऊ शकते. फेल होणार नाही पण पहिला वर्ग मिळेल याची खात्री तो आताच वडिलांना देऊ शकला नाही.

''तु असे कर उद्यापासून डॉमनीकच्या गॅरेजमध्ये जा. काही काम शिक. येईल कामाला. पहिला वर्ग नाही मिळाला तर तुझे नशीब तुझ्याबरोबर.'' वडिलांच्या या निर्वाणीच्या इशाऱ्याने तो रात्रभर तळमळत होता.

दुसऱ्या दिवशी शामने डॉमनीकला गाठले आणि त्याला सांगून त्याच्या गॅरेजमध्ये तो जाऊ लागला. अडीच रुपये रोज हेल्पर म्हणून कामावर रुजू झाला.

दिवसभर गॅरेजमध्ये गाडी घासण्याचे काम. वेल्डरला मदत करा, सगळी कामे तो सफाईदारपणे करीत होता. आता आपली गाडी या गॅरेजच्या चिखलातच रुतुन बसणार असा पक्का समज शामने करून घेतला होता. आपले भवितव्य आता डॉमनीकपेक्षा काही वेगळे नव्हते याची खूणगाठ त्याने मनाशी बांधली होती.

तर, पास झालो तर ठिक. अन्यथा पाय नेतील तिकडे जायचे. घरी यायचे नाही. हे त्याने मानाशी पक्के ठरविले होते.

आता एस.एस.सी.चा रिझल्ट दोन दिवसांवर आला होता आणि शामच्या मनाचा बुरूज पार ढासळला. या अंजू प्रकरणाने आपल्या आयुष्याची दिशाच बदलली आहे. पुढे शिकण्याच्या आशा पार मावळल्या होत्या. वडिल निवृत्त होणार. मग गावाला जाणार आणि आपले हाल कुत्राही खाणार नाही. याची खूणगाठ त्याने मनाशी बांधली होती. थोडक्यात कणी तुटलेल्या पतंगासारखी शामची अवस्था झाली होती. आता आपण भरकटणार, नी आपला ठेंगा होणार. हे आता नक्की झाले होते. पूर्वी भविष्याबद्दल केलेली आखाडे त्याने केव्हाच इतिहास जमा केले होते आणि जर तरच्या चक्राने शामच्या मनात प्रवेश केला.

समजा फर्स्ट क्लास मिळाला तर ठिक. पण नाही मिळाला तर गॅरेज आणि जर नापास झालो तर? तर वडिलांना तोंड दाखवणे कठिण. मग आपले पाय नेतील तिकडे जायचे. घर सोडून वाट फुटेल तिकडे.

आता त्याच्या मनाची तयारी कसल्याही संकटांना सामोरे जाण्याची झाली होती. या महिन्याचा ७५ रु. पगार त्याच्या खिशात होता. निकालाच्या आदल्या दिवशी तो खूप रडला. आपल्या भविष्याच्या चिंतेबद्दल. पण मग मनाची तयारी केली. दुसऱ्या दिवशी सकाळी निकाल होता.

तो सकाळी ४ वाजताच घरातून बाहेर पडला. वडिल घरी नव्हते. त्याने एकावर एक डबल पॅन्ट घातली होती. यदाकदाचित नापास झालो तर घरी परतायचे नाही. वाट फुटेल तिकडे जायचे आणि आपले नशीब अजमावायचे बस्स!

खरेतर शामला खूप शिकायचे होते. पण त्याच्या परिस्थितीने मोठा अडसर निर्माण केला होता. आर्थिक अडचण, वडिलांची निवृत्ती, रहायला जागा नाही. सारे आकाशच उजाड झाले होते शामचे. पण याही अवस्थेत तो अंजूला विसरला नव्हता. ते त्याचे पहिले प्रेम. स्वच्छ, पारदर्शक, ज्याला पवित्रपणाचा मुलामा होता. ती त्याला मनापासून आवडत होती. नुकताच १८ वर्षाकडे झुकलेल्या शामच्या मनात उगवलेला प्रेमाचा हा अंकुर असाच जळून जाणार. तो साकार होणे कठिण. तिचे रस्ते वेगळे, आपले वेगळे. आपल्या शिक्षणाचा खेळ खंडोबा त्याला पुढे दिसत होता. पण उमेद मात्र तो हरला नव्हता. ते तसेच आपल्या मनात ठेऊन जीवनात काहीतरी भव्यदिव्य करावे याचा तो सातत्याने विचार करायचा. पण... उद्याच्या रिझल्टचा अडसर होता मोठ्ठा. आज त्याच्याकडे कसलीच जमेची बाजू नव्हती. होता तो फक्त कल्पनाविलास जर तरचा.

सकाळी रिझल्ट पेपरला यायचा. त्या काळात फक्त नंबर ते फर्स्ट क्लास, सेंकड क्लास आणि पास क्लास असे. दादरच्या पुलावर तेव्हा न्यूज पेपरवाले बसत. चार आणे देऊन त्याने लोकसत्ता पेपर घेतला आणि पुलावरच दिव्याच्या प्रकाशात त्याने नंबर तपासायला सुरूवात केली. पहिल्या वर्गात नंबर नव्हता. आपण फेल तर झालो नाही ना. आपण पेपरात काय लिहीले होते हे त्यालाही कळत नव्हते. अंजूच्या नशेने त्याचे तीन–तेरा वाजले होते. मग शामने पास क्लास पहिला. त्यातही नंबर नव्हता. आपला बोऱ्या वाजला. हे त्याने मनाने जाणले आणि दुसऱ्या वर्गातला नंबर पाहिला, त्यात त्याचा नंबर होता. त्याला हायसे वाटले. पण वडिलांच्या नाराजीला आता आपण कसे सामोरे जायचे? याच विचाराने तो पुरता ढासळला. आता पुढे काय?

गळालेल्या अवस्थेतच तो घरी परत आला आणि मग ८ वाजता निघून गॅरेजमध्ये जायला निघाला येवढ्यात शामचे वडिल समोरून आले...

''अरे शाम! आज रिझल्ट होता ना?''

''हो!''

''मग काय झाले? पहिला वर्ग मिळाला की नाही?''

''नाही!''

''मग काय नापास झालास?''

''नाही! दुसऱ्या वर्गात पास झालो.''

''दिवे लावलेस.''

आणि ते घरात आले. शाम मात्र तसाच गॅरेजमध्ये गेला. सोबत डॉमनीक होता. तो काही ७वी नंतर शिकला नाही. पण आपल्या पेंटिगच्या कामात बाप होता. ते रस्ता चालत होते. पण शामच्या मनात ''दिवे लावलेस'' या वाक्याने त्याचा निकाल लागलाच होता. आपण नापास झालो असतो तर घरी येऊन हे ऐकावे लागले नसते. आता आपण आणि आपले नशीब!

संध्याकाळी शाम कामावरून घरी आला. त्याचा अंदाज होता वडिल घरी नसतील, पण अंदाज चुकीचा ठरला. वडिल काहीच बोलले नाहीत. घरात स्मशान शांतता.

येवढ्यात शेजारी ही बातमी. तो पास झाल्याची चाळीत पसरली.

''अरे शाम! तु पास झालास. पेढे?''

येवढ्यात वडिल येऊन त्यांच्यावर डाफरले.

''दिवे लावलेत त्याने परिक्षेत. कसले पेढे? पळा.''

आता मुले निघून गेली. आपण पास झालो दुसऱ्या वर्गात याचे वडिलांना नाविन्य नव्हते. शाम पास झाला काय नापास झाला काय याचे त्याना सोयर सुतक नव्हते. एव्हढे मात्र खरे.

पुढचा सगळा आठवडा शाम नित्य नियमाने गॅरेजमध्ये जात होता. बहुतेक त्याचे मित्र पास झाले. अंजूही पास झाली हे शाळेत मार्कशीट आणायला गेल्यावर त्याला समजले.

आपल्याकडून शाळेतल्या सगळ्या शिक्षकांना खूप अपेक्षा होत्या. त्यानाही आश्चर्य वाटले. डिस्टींगशनमध्ये येणारा शाम ५८% मिळवतो कोणाचा विश्वास बसेना. आपण परत चेक करूया पेपर्स असे शिक्षक म्हणाले.

''नको! बरोबर हे मिळाले तेवढेच मिळणार होते! धन्यवाद. म्हणत शामने त्याच्या टिपणीस सरांना नमस्कार केला आणि शाळेतून बाहेर पडला.

घरी येताना तो प्रकाशला भेटला. खरेतर त्यानेच अंजूच्या वडिलांना बराच मसाला पुरवला होता. त्याच्याबद्दल शामला दुःख झाले नाही. जे झाले त्याबद्दल शामने चकार शब्दही उच्चारला नाही. त्याच्याकडून समजले की सगळ्या वर्गातल्या मुलांनी कॉलेजला ॲडमिशन घेतली होती.

''तू कोणत्या कॉलेजमध्ये ॲडमिशन घेणार!'' प्रकाश.

शाम काहीच बोलला नाही.

''आणि तू प्रकाश.''

''मी नाही जाणार. मला कालच जॉब मिळाला. वडिलांच्या जागेवर टेलिफोनमध्ये!'' प्रकाश.

पुढे काही न बोलताच शाम घरी आला तो दुखित अंतःकरणाने. शामचे वडिल घरात नव्हते. घरी येताच त्याला रडू आवरेना. मग बराच वेळ शामच्या डोळ्यातले अश्रू काही थांबत नव्हते. त्यादिवशी न जेवताच शाम झोपला केव्हा हे त्यालाही समजले नाही. घडलेल्या गोष्टीबद्दल त्याने अंजूला जराही दोष दिला नाही. हे आपले कर्म एवढेच त्याला जाणवले. अंजूने रुईयाला प्रवेश घेतला हे त्याला समजले. आपण आता कधीच कॉलेजला जाणार नाही याची खूणगाठ त्याने बांधली होती. पण इच्छा मात्र जबरदस्त होती. कोठेतरी सकाळी व संध्याकाळची कॉलेज असतील तर आपण प्रवेश घेऊ आणि आपले नशीब अजमाऊ असा विचार त्याने केला.

मग दोन दिवस तो गॅरेजमध्ये गेला नाही. तेव्हा त्याला समजले की दादरच्या किर्ती कॉलेजमध्ये संध्याकाळचे कॉलेज आहे. त्याने जाऊन कॉलेजची चौकशी केली. पण पुन्हा पैशांची अडचण शिवाय संध्याकाळी ५ चे कॉलेज म्हणून गॅरेजमधून निघून तो केव्हा पोहोचणार? दोन पिरीयड बुडणार त्याने ठरवले हे फॅड सोडून द्यायचे आणि आपण आपले नशीब गॅरेजमध्ये अजमावायचे. आताशा अंजूचे प्रेम प्रकरण साईडिंगला पडले होते. पण मनातून पुसले गेले नव्हते एवढे मात्र खरे.

मुलाची तमगम वडिलांना बघवेना. हातात पैसाही नव्हता. पगारात मुंबई, गाव सगळा खर्च करता करता ते मेटाकुटीस येत होते.

शामची अवस्था पाहून वडीलही दु:खी झाले होते. दिवसभर त्यांनी अबोला धरला होता.

''बाबा, मला तुम्ही कॉलेजमध्ये पाठवणार नसाल तर ठिक. मी माझे नशीब या गॅरेजमध्येच अजमावीन, तुम्ही दुःखी होऊ नका!'' शाम.

त्याच्या या बोलण्याने वडिल कमालीचे सद्‌गदीत झाले. रात्रभर त्यांना झोप लागली नाही. काय करावे. दोन दिवस शिल्लक आहेत किर्ती कॉलेजचे ॲडमिशन बंद व्हायला.

सकाळी उठल्या उठल्या शामचे वडिल भायखळ्याला त्यांच्या सोसायटीत गेले आणि त्यांनी १५० रु. ची सोसायटी कर्ज काढले. ते घरी आले तो दिवस शनिवार होता. शामच्या मनाची तगमग वडिलांना बघवत नव्हती.

''तुम्ही माझ्या पहिल्या टर्मची फि भराल तर पुढच्या टर्मची जबाबदारी माझी. मी काहीही करेन आणि पैशाची व्यवस्था करीन. त्याची चिंता करू नका, फक्त एका टर्मची दिडशे रुपये फी हवी.'' शाम

शामच्या वडिलांनी दिडशे रुपये त्याच्या हातात ठेवले. बस्स अत्यानंद झाला शामला आणि तो तसाच किर्ती कॉलेजमध्ये आला. फी भरली कॉलेज उद्यापासून सुरू होणार होते. वेळ संध्याकाळी ५।। ते ९।। अशी होती.

शाम घरी आला, पण तत्पूर्वी त्याने कॉलेजमध्ये पुस्तके मिळणार का? याची चौकशी केली. प्रत्येक विषयाला वेगळी वही त्याला परवडणार नव्हती. तेव्हा एकाच वहित त्याने ६ विभाग पाडले आणि कॉलेजमध्ये लेक्चररनी सांगितलेल्या नोटस् लिहायला सुरूवात केली.

एक मोठी समस्या समोर होती. कॉलेजच्या वेळेची. एरव्ही त्यांचे गॅरेज ६ वा बंद होत असे. काहीतरी सांगून त्याने पहिला आठवडा वेळेत कॉलेज अटेंड केला. पण असे नेहमीच कसे जमणार? संध्याकाळचे लॉजीकचे लेक्चर महत्वाचे. त्याने पहिले ३/४ दिवस ते बंक केले व त्याची अस्वस्थता अधिकच वाढली.

वर्गातली मुले नोकरी करणारी. कोणी ओळखीचे नव्हते. पण त्याच्या वर्गातला त्याच्या सारखा उशीरा येणारा 'ओक' नावाचा मुलगा त्याच्या कामी

आला. खरेतर तो रिपीटर होता. दिवसा कॉलेजमध्ये जाणारा पण एका दुकानात काम करायचा. म्हणून दिवसाचे कॉलेज सोडावे लागले. तो आपल्या पहिल्या दोन विषयांच्या वह्या शामला द्यायचा. महिना होत आला. पहिल्या टर्मची परिक्षेची तारीख ठरली. आता शामसमोर मोठे संकट पुनः उभे राहिले. पुढचा सगळा आठवडा ५।। ला कॉलेजला पोहोचावे लागणार होते परिक्षेसाठी. ते अशक्य होते.

शामने 'तान्या' त्या गॅरेजचा मालक यांच्याकडे विषय काढला. शाम कॉलेजमध्ये जातोय या कल्पनेनेच तो सुखावला. पैसा असून त्यांची दोन्ही मुले दिवसभर न शिकता उंडारत होती बिनकामाची.

''तू कॉलेजमध्ये जातोस?''

''हो! संध्याकाळच्या! पण माझे दोन तास बुडतात. पण मी तो अभ्यास रात्री जागुन करतो!'' शाम.

''शाब्बास! बेटा! म्हणत तान्याने शामच्या खांद्यावर हात ठेवला.''

''तू चिंता करू नको. तू ५ वा. निघत जा. मी काम सांभाळीन शिवाय तुझा पगार २५ ने वाढवीला आहे. मला अभिमान आहे. पुढे तू मोठा साहेब होशील. माझे आशिर्वाद आहेत. कधी काय पैशाची गरज लागली तर निःसंकोचपणे माग!'' तान्या.

आज तान्याचा मुड काही वेगळाच होता. या मुलाला आपण मदत करतो ही काही मेहेरबानी करीत नाही. त्याला प्रोत्साहन देतोय. याला अधिक पैसे मिळवण्यासाठी काही करता येईल का याचा विचार तान्या करीत होता. याची पुढची फिची व्यवस्था करायला हवी.

शामचे अक्षर वळणदार होते. त्याला रंगांची जाण होती. त्याच्या गॅरेजमध्ये येणाऱ्या सगळ्या गाड्यांचे नंबर प्लेट तान्या काढायचा. त्यावर नंबर लिहिण्याचे काम त्याने शामला दिले. त्याला मिळणाऱ्या पगाराव्यतिरिक्त प्रत्येक नंबर प्लेटचे अडीच रुपये त्याला मिळत. म्हणजे महिन्याला ६०/७०/रु. त्यातून शामने आपल्या पुढच्या टर्मची फि भरली. तान्याचे उपकार कसे मानावे हे त्याला कळेना. तान्या स्वतः अनपड. पण शाम शिकतोय याचे अप्रुप मात्र

त्याला होते. आतातर शामही तान्याजवळ अदबीने वागत असे. आपल्या वडिलांच्या ठिकाणी त्याला पाहत असे.

पहिली परिक्षा शाम पास झाला व दुसरी टर्म सुरू झाली. शाळेत मराठी मिडियम. पण येथे इंग्रजी शामला खूप मेहेनत करावी लागायची. डिक्शनरीतून प्रत्येक कठीण शब्दाचा अर्थ त्याला समजाऊन घ्यावा लागायचा. पहिले वर्ष खूपच कष्टाचे गेले, पण आपण इतर मुलांसारखे कॉलेजची पायरी चढणे याचे समाधान त्याला होते. अजूनही अंजूच्या चक्रातून शाम बाहेर आला नव्हता. पुस्तक उघडले की ती पानवरच दिसायची विसावलेली. पण एक समाधानाची गोष्ट त्याच्या बाबतीत घडली की, आपणही कॉलेजमध्ये गेलो. आपण पुढे पुढे जाणार, नाही रहाणार अनाडी मॅट्रीक्युलेट बस्स. त्याला मार्ग सापडला होता. त्याने तो जाणारच होता. अडथळे येतील ते पार करण्याची धमक त्याच्यात होती. आता तो खूप शहाणा झाला होता टक्के टोमणे खाऊन.

शाम एफ. वाय. पास झाला आणि इंटरला गेला. सारे कसे अगदी छान चालले होते. शामने एप्लॉयमेंट एक्सेंजमध्ये नाव नोंदवले होते. छोट्या मोठ्या नोकरीचे कॉल येत होते. पण आता शाम चांगल्या नोकरीच्या शोधात होता आणि त्याला तसे कॉल आले पण टेम्पररी. शाम गॅरेजमधला हक्काचा जॉब सोडायला तयार नव्हता.

त्याचवर्षी ऑक्टोबरमध्ये त्याचे वडिल निवृत्त झाले आणि गावाला कायमचे गेले. शाम पोरका झाला. एकटं मुंबईत कोणीही आधाराशिवाय राहू शकत नाही या मुंबापुरीत. शाम कामावर होता आणि वडिल गावाला निघून गेले. आता महिन्याभरात जागा खाली करावी लागणार होती. तो एक महिन्याच्या आधारानंतर काय? रहायचे कोठे, अभ्यास कसा होणार. इन्टरचा अभ्यास, वेगळे विषय, सारीच अडथळ्याची शर्यत होती. पण धीर सोडला नव्हता. काहीतरी व्यवस्था होईल. नाहीतर तान्याशेठचे गॅरेज आहेच ना. त्याचा आधार त्याला होताच. पण त्यांना सांगणे जरूर होते. शिवाय गॅरेजमध्ये खाली पाणी, मच्छर यांचीही सोबत असणार होती. पाहु या. येतील तसे दिवस काढू या. त्याला अश्रूंची अदृष्य शक्ती, अंजूचे प्रेम धीर देत होती आणि तो अभ्यासाला लागला. इन्टरची परिक्षा झाली. पास होईल असा आशावाद होता त्याच्या

मनात.

पण पत्त्याचा बंगला कोसळला. लॉजीकने दगा दिला. आता पुनः ऑक्टोबरशिवाय पर्याय नव्हता. पण अंजू एक वर्षांनी पुढे गेली याची रुखरुख त्याला होती. पण तरीही त्याने अभ्यासाला सुरूवात केली. आता एकच विषय घेऊन बसायचे हा निर्धार झाला. परिक्षा झाली आणि तो पास झाला. आता एफ.वाय.बी.ए. करायची. पण पुढचे ६ महिने काही अभ्यास नव्हता शामने मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय लायब्ररी जॉईन केली व जुन्या नव्या लेखकांची पुस्तके त्यात कथा, कादंबऱ्या, कवितासंग्रह मिळेल ते तो वाचत होता. अंजूही त्याच वाचनालयाची सभासद आहे हे त्याला नंतर समजले. कारण तिला दोन वेळा त्याने पाहिले पुस्तके बदलताना. आता शाम संध्याकाळी त्या वाचनालयात येऊन बसू लागला. अनेक वेळा ती त्याच्या समोरून गेली. पण कोण जाणे तिने ओळखले की नाही त्याला.

मराठी वाचनाची आवड त्याला चैन पडून देईना. अंजूने पुस्तक बदलले की ते पुस्तक घेऊन जाई व वाचून परत करी. हा सिलसिला गेले ६ महिने चालू होता.

म्हणजे ती शामला विसरली, म्हणजे 'शाम कोण?' हे अजूनही तिच्या ध्यानात येत नसावे वा ती टाळत असावी. एकदा शाम तिच्या मागे वाचनालयातून निघाला व लिफ्टसाठी उभा होता. अंजूही लिफ्टची वाट पहात होती. पण दुसऱ्या माळ्यावरच अडकली. शामने दुसऱ्या मजल्यावर जाऊन लिफ्ट तिसऱ्या मजल्यावर आणली.

''दरवाजा उघडा ठेवला होता कोणीतरी.''

''थॅंक्स!''

हा तिचा पहिला शब्द त्याच्या कानावर आला. जो अंजूने उच्चारला होता व बाहेर पडून ती भराभर आपल्या घराकडे निघाली. शामही तिच्या मागून निघाला. त्याने अंजूला गाठले.

''अंजू!'' शाम.

''हे पुस्तक तुम्ही वाचले. कसे आहे?''

''नाही आवडले मला.'' अंजू.

आणि ती तिच्या इमारतीकडे वळली. बराच वेळ तो अंजूला पाठमोरी जाताना पहात होता. असे उभे रहाणे ठिक नाही म्हणून तो झपाझप आतल्या रस्त्याने आपल्या चाळीकडे गेला.

आज शामने अंजूला दीड वर्षाने पाहिली होती ती तशीच होती. जशी ११ वीच्या सेंडॉफमध्ये त्याने पाहिली होती तशी, तो घरी आला. पण बेचैन होता तो, आज सारखी अंजूची मुर्ती डोळ्यासमोर येत होती आणि क्षणाक्षणाला तो तिच्या आठवणीत विरघळत जात होता.

अंजू भेटली पण तोच शाम असावा याचा कणभरही मागमूस तिला नव्हता. म्हणजे पूर्वी घडलेली घटना ती पार विसरून गेली होती वा तिच्यापर्यंत हे पत्र पोहोचले नसावे. पण तसे शक्य नसावे. तिला तिच्या वडिलांनी शामबाबत विचारले असणारच. हे आणि अनेक विचारांचे ओझे घेऊन शाम अनेक जर–तर चे प्रश्न स्वतःच्या मनात घोळत राहिला. नाही झोपला तो आज रात्रभर आणि एक दिवस अचानक शामचे वडिल गावाहून मुंबईला परत आले. त्यांची अडकवून ठेवलेली ग्रॅज्युईटीची रक्कम परत मिळवण्यासाठी ती रहाती जागा सहा महिन्यात सरकारला परत करायची होती. दिवाळीचे दिवस होते. संध्याकाळी ते परत आले. शाम तेव्हा घरी आला होता.

''शाम मला उद्या ही आपली रहाती जागा ऑफीसच्या हवाली करायची आहे. तसे आपले काही सामान नाही. दुपारपर्यंत ते आटोपेल, आणि मी रात्रीच्या एस. टी. ने गावाला जाईन.'' वडिल.

शाम हादरून गेला. त्याचा रहाण्याचा प्रश्न आवासून समोर उभा होता. जवळ कोणी नातेवाईक नव्हते की काही व्यवस्था करता येईल. शाम तसाच गॅरेजमध्ये आला. गॅरेजची वेळ कामगारांसाठी सहाची. पण तान्याशेठ रात्री ८/८ वाजेपर्यंत गॅरेजमध्ये बसलेला असे.

शामला पाहून तान्याशेठ भांबावला. हा घरी गेला आणि का परतला असावा. तेवढ्यात शाम गॅरेजचा कॅबीनचा दरवाजा उघडून आत आला. चिंतेत होता. उद्या खोली खाली केल्यावर जायचे कोठे?

''बोल! शाम असा अचानक कसा आलास? काही अडचणी?''

''हो! सांगतो. मी रहातो ती खोली उद्या दुपारपर्यंत सरकारच्या ताब्यात घ्यायची आहे. माझ्या रहाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झालाय! मी कोठे जावे? काय कराव, मला कोण मदत करणार?'' शाम सद्‌गदीत झाला. डोळ्यात अश्रू उभे राहीले आणि तो पूरता कोलमडलाच.

तान्याशेठ आपल्या खुर्चीवरून उठले. त्यांनी शामच्या खांद्यावर हात ठेवला. त्याला थोपटले.

''तू चिंता सोड! शाम काहीतरी मार्ग निघेल. तू आधी फ्रेश होऊन ये.'' तान्याशेठ.

शाम उठला तोंड धुवून परत आला तोवर तान्या शेठही उभेच होते.

''बस! मी तुला काय मदत करू शकतो? अरे मी तुझ्या वडिलांसारखा आहे. सारे काही मला समजले आहे. तुझ्या बोलण्यातून.'' शाम.

शाम अबोल होऊन गेला होता. काय बोलावे त्याला समजेना.

''माझी एकच खोली आहे त्यात आम्ही पाचजण रहातो. तेथे शक्य नाही. तू आलास तरी तातपुरता या गॅरेजमध्ये येऊन तुझे सामान ठेव. मग विचार कर.'' तान्याशेठ.

शामने डोळे पुसले. आपले अश्रू पुसले. तान्या शेठकडे आश्वासक नजरेने पहात तो उठला आणि शामने तान्याशेठचे पाय धरले. तान्या शेठला हे अपेक्षित नव्हते. तो गडबडला. पण मग सावरून शामला छातीशी कवठाळले. कितीतरी वेळ दोघे एकमेकांच्या मिठीत होते.

''ठिक आहे मी उद्या सकाळी ती जागा खाली करतो. माझे फारसे सामान नाही. मी दुपारी गॅरेजमध्ये येतो?'' शाम.

शाम उठला आणि प्रसन्न मुडमध्ये घरी आला. वडिल घरीच होते. शामने आल्याबरोबर आवराआवर करण्यास सुरुवात केली. या गोष्टीचे त्याच्या वडिलांना आश्चर्य वाटले. मघाशी चेहरा पडलेला शाम इतका शांत कसा? त्याचे सामान फारसे नव्हतेच. थोडे कपडे, पुस्तके बस्स. दोन पिशवीत त्याने सारे सामान भरले. त्यात अंथरुणाची एक वळकटी आणि जेवणासाठी भांडी

एव्हढाच ऐवज तो उद्या गॅरेजमध्ये नेऊन ठेवणार होता आणि या वळणावर आपल्या जीवनाची सुरुवात करणार होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी शाम लवकर उठला. सामानाची आवराआवर त्याने सुरू केली. हे काम तासाभरात संपले. तोवर वडिलांनी ऑफिसमध्ये जाऊन जागा परत करण्याचे काम पूर्ण केले व एक चेक घेऊन परत आले. दुपारी ऑफीसचे लोक त्या जागेचा ताबा घेणार होते. शाम ११ वाजताच आपले सामान घेऊन निघून गेला. गॅरेजमध्ये येऊन त्याने सामान एका कोपऱ्यात ठेवले व कामाला सुरूवात केली.

त्यादिवशी संध्याकाळी काम संपल्यावर तान्याशेठने शामच्या हातात २०० रुपये दिले.

''तू तुला लागणारे जेवणाचे जरुरीचे सामान घेऊन ये आणि पहा जेवण करता येते का? मी रात्री ९ वाजता परत येईन. आता कामाला लाग.'' तान्या.

''ठिक!'' शाम.

आणि शाम फ्रेश झाला. त्या गॅरेजमध्ये ऑफिसची एक रूम होती. तान्या शेठ त्यात बसायचा. ती जागाच रहायला योग्य होती. शिवाय गॅस होता. शेगडी होती. साऱ्या सुविधा होत्या. शामची ती तेथली पहिली रात्र होती. थंडीचे दिवस होते. बाहेर प्रचंड चिखल, गाड्यांची अडचण होती. पण या जागेत आजतरी तान्या शेठने आसरा दिला होता. म्हणून तो खूश होता. शामच्या वडिलांनी रात्रीच्या गाडीने गावाला प्रस्थान केले. आज शाम मुंबईत आणि गॅरेजमधल्या साऱ्या अडचणीत एकटाच होता.

त्याला या सगळ्या वातावरणाची सवय नव्हती. संध्याकाळी गॅरेजमधील लोक निघून गेले. शामने नळावर हात-पाय धुतले आणि तो तान्या शेठच्या केबिनमध्ये आला. तेवढाच भाग काय तो सुख. बाकी बाहेर सगळी दलदल. पण तेवढाच आधार होता. नाईलाज होता त्याचा. त्याने एका कोपऱ्यात सामान ठेवले होते. ७.४५ वाजले होते. तान्या शेठ अजून हिशेबाचे काम करत होते. पण त्या केबिनमध्ये शाम वावरत होता. पण जोपर्यंत तान्या शेठ जात नाहीत

तोवर तो काहीच करू शकत नव्हता. ना चहा, ना जेवण. शामचे सगळे सामान त्याची वाट पहात होते. आज तो वाचनालयातही पुस्तक बदलायला गेला नाही. आज अंजू येते हे त्याला माहित होते. पण आज त्याची दांडी झाली.

''तुझ्या जेवणाचे काय?''

''बघतो!''

कि, मी आजचा दिवस घरून डब्बा घेऊन येऊ का?'' तान्या शेठ.

''नको. मी आज खिचडी करेन. चिंता नको. तुम्ही त्रास घेऊ नका!'' शाम.

तान्या शेठ गेल्यावर शामने गॅसवर एका टोपात खिचडीसाठी तांदूळ, डाळ घातली. पापड भाजला आणि तो जेवायला बसणार येवढ्यात तान्या शेठ भाजी घेऊन आला.

''जेवला की नाही!''

''नाही अजून! आताच खिचडी झाली आहे!'' शाम.

''मी तुझ्यासाठी छान भाजी आणली आहे! आज तू इथे. जेवणाचा पत्ता नाही. मला जेवण जाईना म्हणून भाजी घेऊन आलो!'' तान्या.

''आज ठिक आहे. पण पुनः तसदी घेऊ नका. मी माझे पाहिन. तुम्ही मला येथे आसरा दिला. मी भरून पावलो!'' शाम.

तान्या शेठ गेल्यावर शाम जेवला आणि अंग टाकून दिले.

सकाळी ६ वाजता त्याला जाग आली. पहाटे ३ वाजल्यापासून तो ५ वाजेपर्यंत जागाच होता. सारखी अंजू डोळ्यासमोर वावरताना दिसत होती. आपले भविष्य कसे असेल? आपले शिक्षण कसे होईल? पुढे चांगली नोकरी मिळेल काय? अंजूचे काय होईल? तिचे वडिल लग्न करून तिला माझ्यापासून दूर दूर पाठवतील या विचारांनी तो अगदी कासाविस झाला. सकाळी आंघोळ आटोपून, शामने तान्याने ठेवलेल्या दोन नंबर प्लेट पूर्ण केल्या व सुकत ठेऊन तो पुनः गॅरेजमध्ये आला. आज त्याने चहा केला नव्हता. बाजूच्या टपरीवर जाऊन चहा घेतला. एव्हढ्यात तान्या शेठ आले.

''कशी रात्र गेली शाम?''

''ठिक! छान! तुमचे उपकार!''

''नाही! नाही!! अरे शाम मी ही असाच कोकणातून याच गॅरेजमध्ये आलो. शिक्षण नव्हते. येथिल साहेबांनी मला आधार दिला. आज जसा तू राहिलास तसा मी येथेच रहात होतो. खाणावळीत जेवण आणि झोपायला ऑफिस. सावंत साहेबांचे हे गॅरेज तेव्हा फ्रान्सीस चालवत होता. फ्रान्सीसशी माझे पटत नव्हते. पण सावंत साहेबांमुळे तो काही करू शकत नव्हता. मी सगळे काम ३/४ वर्षात शिकलो. कामात तरबेज झालो आणि सावंत साहेबांनी फ्रान्सीसला काढून टाकले. त्यानंतर मला हे गॅरेज चालवायला दिले. त्याला ३० वर्षे झाली.

''मी कोकणातून रत्नागिरीतून आलो. आपण अशिक्षित पण इमानदार म्हणून इतकी वर्षे हे गॅरेज चालवले. आता थकलो आहे. साठी पार झालेय!'' तान्या शेठ.

शामच्या नजरेसमोर तान्या शेठने सांगितलेला सारा वृत्तांत डोळ्यासमोर चित्रीत होत होता. आज आपणही बेघर आहोत तान्यासारखे आणि तेच काम नशीबी येणार काय? तो चरकला. नाही. आपण आपले भवितव्य येथून सुरुवात करून घडवायचे. हिंम्मत हरायची नाही. अंजू आपला पाठलाग करीत येईल इतके शिकायचे. साम्राज्य उभे करायचे. तिचे डोळे दिपतील असे करायचे. अंजू माझी स्फूर्ती देवता होईल. जीवन घडवायचे. बस्स क्षणभरच आणि तो कामाला लागला.

शाम या कामात तरबेज झाला. ''आपण गॅरेजचे मोठे  करू. त्याचे सर्व्हिस सेंटरमध्ये रुपांतर करू! कोणातरी मोठ्या कंपनीशी टायअप करू म्हणजे त्यांच्या गाड्या आपल्याकडे सर्व्हिसींगला येतील. त्या परदेशी गाड्यांचे सर्व्हिस सेंटर येथे नाहीत. उदा – मर्सिडीज बेंज!'' शाम.

ही गोष्ट शाम आणि तान्याशेठ यांनी, सावंत यांच्या कानावर घातली.'' शाम.

तान्या शेठलाही आनंद झाला. हा मुलगा काय म्हणतोय ते मला काहीच आजवर सुचले नाही आणि सावंत यांनीही मदतीचा हात दिला.

त्या गॅरेजच्या चाळीत अनेक गाळे होते. शामने गॅरेज बंद करून मोठ्या शेडचे काम सुरु झाले. तेव्हा काही दिवस शामने एका मोठ्या गॅरेजमध्ये मॅकॅनिझमचे काम शिकून घेतले. शिवाय इंडो बर्मा पेट्रोलाईन या कंपनीच्या इलेक्ट्रीक डिपार्टमेंटमध्ये कार पेंटींगचे काम शिकून घेतले. पगार चांगला होता व आपण येथे काही फार दिवस रहात नाही असे ठरवून काम केले. संध्याकाळी तेथून गॅरेजमध्ये येऊन तो शेडचे चाललेले काम पहात होता. बराच अनुभव त्याच्या गाठीला लागला. काम अतिशय वेगाने चालू होते. आणि महिन्याभरातच ते पूर्ण झाले.

सावंत साहेबांनी त्या मोठ्या शेडमध्ये मर्सिडीज गाडीच्या सर्व्हिस सेंटरची परवानगी मिळवली व ती फार जोरात चालू झाली. पूर्वीच्या गॅरेजपेक्षा. शामला तेथे मॅनेजर नेमले. आता पगारही वाढला होता. नंतर तो त्या मोठ्या सर्व्हिस सेंटरच्या रेस्ट रुममध्ये शिफ्ट झाला. त्याने बी.ए.च्या पहिल्या वर्षात रुईया कॉलेजच्या मॉर्निंग बॅचला प्रवेश घेतला. सकाळी साडे नऊ पर्यंत कॉलेज संपल्यावर तो सर्व्हिस सेंटरमध्ये येई व रात्री उशीरापर्यंत काम करीत असे. मर्सिडीज गाडीचे सगळे मॅकॅनिझम शामने शिकून घेतले. तेथेच त्याला एक कल्पना सुचली. त्यांचे हे मर्सिडीजच्या गाड्यांचे मुंबईमधील एकमेव शो रूम सेंटर होते. खूप गाड्यांचा सेल झाला व कामही वाढले.

सावंत साहेबांनी एक प्रायव्हेट लिमिटेड कंपनी स्थापन केली व शामला पार्टनर बनविले. तेथेच त्याला या गाड्यांसाठी लागणाऱ्या स्पेअर पार्ट निर्मितीची कल्पना सुचली व त्याने सावंत साहेबांशी याबाबत चर्चा केली व चेंबूर येथे मर्सिडीज बरोबर रोल्स रॉयल इत्यादी परदेशी गाड्यांच्या स्पेअर पार्ट निर्मितीला सुरुवात झाली. या सगळ्या गोष्टीत तीन वर्षे कशी गेली हे समजले नाही. धंदा वाढला. त्या गाड्यांचे स्पेअर पार्ट जगातल्या सगळ्या देशात जाऊ लागले. प्रचंड मागणी. कारखाना तीन शिफ्टमध्ये चालला होता. ते सगळे काम शामच सांभाळीत होता. शिवाय सर्व्हिसींगसाठी त्याने एक्सपर्ट स्टाफ नेमला व थोड्याच काळात ही कंपनी नावारूपाला आली व ती नंतर पब्लिक लिमिटेडमध्ये कन्व्हर्ट झाली. शाम त्याचा चेअरमन झाला.

आता ह्या जबाबदारीबरोबर आपल्याला शैक्षणिक स्टेटस येणे जरूरीचे

होते. ही इच्छा पूरी करण्यासाठी त्याने पुढे शिक्षण घेण्याचे ठरविले आणि पुढे रुईया कॉलेजमध्ये मॉर्निंग बॅचमध्ये ॲडमिशन घेतले.

अचानक सावंत यांच्या निधनामुळे सगळ्या धंद्याची जबाबदारी शामवर पडली आणि त्याच वर्षी शाम बी.ए.(ऑनर्स) झाला. आता एम.बी.ए. करावेच लागणार होत. कारण व्यवहाराबरोबर कंपनीच्या सर्वच गोष्टीसाठी स्वतःला ट्रेंड करून घ्यायला लागणार होते. शामने पार्टटाईम एम.बी.ए. जॉईन केले. मराठा मंदिरच्या कॉलेजमध्ये त्याची लेक्चर्स संध्याकाळी व रविवारी असत. त्यातून त्याने दोन वर्षाचा कोर्स पूर्ण केला.

या सगळ्या कामाच्या भाव गर्दीत शाम अंजूला विसरला नव्हता. त्याचा एकही दिवस अंजूच्या आठवणीशिवाय सुरू होत नव्हता आणि संपतही नव्हता. झोपेतही अंजू, मनात अंजू, जागेपणी अंजू. पूर्णपणे अंजूमय झाला होता. तीच आपली स्फूर्ती देवता आहे. हे तो पक्के जाणून होता!

या सगळ्या ३/४ वर्षांच्या काळात शाम अंजूला विसरला नव्हता. तो अधिकाधिक तिच्यात गुंतत गेला. आता त्याला एक चांगले स्टेटस आले होते. परळ मध्येच त्याने एक थ्री बीएचकेचा फ्लॅट बुक केला व स्वतः त्या जागेत शिफ्ट झाला.

अजून शामचे लग्न झाले नव्हते. या कामाच्या गडबडीत त्याला हा विचार करायला वेळही नव्हता. पण अंजूची माहिती नेहमी घेतच होता आणि एक दिवस त्याला समजले. तिचे लग्न लंडनमधल्या एका कारखानदाराबरोबर अंजूचे लग्न झाले आणि ती पुण्याला शिफ्ट झाली.

शाम पुरता कोसळला आणि स्वतःला दोष देत राहीला. तत्पूर्वी ती एल.आय.सी. या ईन्श्यूरन्स कंपनीमध्ये नोकरीला लागली हे ही त्याला समजले. पण एवढ्या लवकर लग्न होईल अशी शक्यता त्याला वाटत नव्हती. पण घडले विपरीतच. गेले ४-५ दिवस त्याच्या झोपेचे खोबरे झाले होते.

आपण काहीतरी भव्यदिव्य करावे आणि मग अंजूला मागणी घालावी, रीतसर लग्न करावे. यासाठी अंजू त्याची स्फूर्ती देवताच बनली होती आणि तिला समोर ठेऊन शाम आपला व्यवसाय, स्टेट्स वाढवित होता. पण या

गडबडीत घात झाला. शामने स्वतःला खूप कोसले. ही बातमी शामला लायब्ररीत समजली. तिने आपली मेंबरशिपही रद्द केली होती आणि आता तर ती पुण्याला गेली. भेट होणे आता शक्य नव्हते. मोठे भव्यदिव्य काम करण्याच्या नशेत आपणच आपल्या पायावर धोंडा मारून घेतला. मधल्या काळात त्याने तिच्या इमारतीत चौकशी केली. वडिल–आई नाशिकला गेले म्हणजे आता तिच्याबद्दल काहीही समजणे शक्य नव्हते वा भेट होणार नव्हती.

नंतरचे ८/१० दिवस शामला खूप त्रास झाला. डिप्रेशनने त्याला गाठले. एवढ्या मोठ्या फ्लॅटमध्ये तो एकटाच रहात होता. अंजूशी आज न उद्या आपले लग्न होईल या आशेवर त्याने स्वतः लग्नाच्या बेडीत न अडकण्याचा निर्णय घेतला आणि आजपर्यंत शामने लग्न केले नाही.

अंजूच्या लग्नानंतर तो पूर्णपणे नैराश्याच्या गर्तेत सापडला आणि लग्नावरचा त्याचा विश्वासच उडाला. त्याने अविवाहितच रहाण्याचा निर्धार केला व आपल्या व्यवसायामध्ये स्वतःला पूर्णपणे झोकून दिले. आता त्याचे वय ३२ झाले होते. म्हणजे फार नव्हे पण लग्न करायचेच नाही. मग काय करणार? तो मनाचा पक्का होता. ठाम विचाराचा आणि आपल्या अंजूच्या प्रेमात पूर्णपणे बुडालेला. डिप्रेशनमधून बाहेर येण्यासाठी त्याने औषधोपचार केले व आता त्याने पूर्णपणे आपल्या व्यवसायाकडे लक्ष देण्याचे ठरवले.

मधल्या काळात तो इंग्लंडला जाऊन आला. रतन टाटांना भेटला व येताना जर्मनीलाही जाऊन आला. त्याला मर्सिडीज बेन्झ आणि रोल्स रॉयल या गाड्यांच्या कारखान्याना भेटी द्यायच्या होत्या. त्याचा हा परदेशी दौरा खूपच यशस्वी झाला. त्या कंपन्यांनी शामच्या कंपनीलाही टायअप करून घेण्याचे मान्य केले व हिंदुस्थानामधील वातावरण चांगले असल्याने देशभर स्पेअर पार्ट त्यांच्या कंपनीकडून खरेदी करण्याचे कबूल केले. आता आपला व्यवसाय वाढवणे आणि तोही अगदी तातडीने या दृष्टीने त्याने पुण्याला एक मोठे प्रॉडक्शन युनीट चालू करावे असे ठरविले.

त्यासाठी त्याने ३ दिवसाचा पूणे दौरा काढण्याचे नक्की केले. शिवाय पुण्यात या कंपन्यांच्या सर्व्हिस सेंटला भेट देण्याचे शामने नक्की करून त्याची माहिती घेतली व आता पुण्यातच तो चालू करायचा असे ठरले व त्यासाठी

जागेच्या शोधात शाम लागला.

त्याच्या माहितीनुसार एकच सर्व्हिस सेंटर पुण्यात होते. मर्सिडीज गाडीचे ते होते वाघोली येथे म्हणजे पिंपरी आणि पुणे यांच्यामध्ये खूपशी मोकळी जागा कंपनीसाठी योग्य होती. त्यातली चांगली, मोक्याची, रोड टच जागा निवडायची हे त्याने ठरवून तिथल्या एजंटना कामाला लावले.

वाघोली जवळचा प्लॉट चांगला होता. हायवे टच होता. त्या प्लॉटची निवड त्याने केली व तो पहाण्यासाठी आपल्या मर्सिडीज गाडीने तो पुण्याला आला. तेथेच हा स्पेअर पार्टस् निर्मितीचा कारखाना त्याला चालू करायचा होता.

पुण्यालाही तशाच प्रकारचे एक सर्व्हिस कोटक सर्व्हिस सेंटर म्हणून चालू झाले होते. त्याला व्हिजीट करायचे त्याने ठरविले. आणि तेथे येण्यापूर्वी तिथल्या मालकाला फोन केला व  साडे दहा वाजता सर्व्हिस सेंटरमध्ये पोहोचला.

तिथल्या स्टाफने, मॅनेजरने, सेंटरच्या मालकाने त्याचे स्वागत केले. शामने आपल्या कल्पना त्याच्यासमोर चर्चा चालू असताना मांडल्या. एवढ्यात त्या सर्व्हिस सेंटरच्या मालकीण आल्या निर्मला कोटक. तिला पाहताच शाम उडालाच. तिच ती अंजू होती. पण त्यावेळी ती त्याला फारशी ओळखत नव्हती म्हणून बरे. नाहीतर? शामचे स्वागत तिने पुष्पगुच्छ देऊन केले. मुंबईच्या त्यांच्या सर्व्हिस सेंटरला तिने शाम लंडनला असताना भेट दिली होती. आधुनिकतेने ती दिपून गेली होती. सहा महिन्यांपूर्वीच तीने हे सर्व्हिस सेंटर चालू केले होते. दुपारचे जेवण झाले व तो आपला प्लॉट पहायला गेला. अंजू आणि तिच्या सर्व्हिस सेंटरचा मॅनेजर सोबत होता. भविष्यातील नियोजित योजनेसाठी २५०० एकराचा छान प्लॉट त्याने निवडला. यावेळी अंजू बरोबर त्याचे बरेच बोलणे झाले. शामचा आनंद त्याच्या हृदयात मावत नव्हता. पण त्याने संय्यम राखला. अधिक जवळीक टाळली व सेफ डिसन्टस् ठेऊन आजची व्हिजीट संपवली. पण त्या रात्री त्याने शेजारच्या फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये अंजूसाठी डिनरचे आयोजन केले व त्या उभयतांना जेवणासाठी इनव्हीटेशन दिले.

पण या डिनरला अंजू एकटी आपल्या ६ वर्षाच्या मुलाबरोबर आली होती. तिचे मिस्टर आले नाहीत. याची चौकशी त्याने केली नाही व डिनर छान पार पडले.

आपण या आमच्या प्रोजेक्टमध्ये आम्हाला स्थानिक म्हणून मदत करा व आपल्या व्यवसायाच्या या प्रवासात स्वतःही भागीदार व्हा. असे शामने अंजूला सांगितले. तिनेही त्याला दुजोरा दिला व ती आपल्या घरी निघणार तेव्हा शाम म्हणाला –

''मॅम मी आपणाला घरी सोडायला माझी गाडी पाठवतो. आमचा ड्रायव्हर तुम्हाला सोडून येईल आणि त्याच्या मर्सिडीजने ती घरी गेली.

आज अंजूची भेट त्याला खूपच आनंद देणारी ठरली. पण तिचे मिस्टर का नाही आले? ती व मुलगाच फक्त का? या प्रश्नाचे उत्तर त्याला आजही सापडले नव्हते.

दुसऱ्या दिवशी तो मुंबईला परतला. पण आज त्याचे पाय काही जमिनीवर ठरत नव्हते. आज दुप्पट उत्साहाने तो कामाला लागला होता. पुण्याच्या प्रोजेक्टसाठी पुनः पुनः मिटींग होत होत्या. हा प्रोजेक्ट खूप मोठा होता. महाराष्ट्राला भूषण ठरणार होता. शिवाय १५०० लोकांना त्यात नोकऱ्या मिळणार होत्या. भारत सरकार स्वतः आणि भारतातले अनेक उद्योगपती या प्रोजेक्टमध्ये भागिदार होणार होते. संबंधीत सगळ्या परवानग्या आल्या होत्या आणि बांधकामाला जोर आला. ६ महिन्यात बांधकाम पूर्ण करून हा प्रोजेक्ट देशाला अर्पण करण्यासाठी पंतप्रधानांनी स्वतः येण्याचे कबूल केले होते.

शामची पुण्याला महिन्यातून एक व्हिझीट होत असे. तो ताजमहाल हॉटेलमध्ये उतरत असे. अंजूची भेट होत असे. तिच्या सर्व्हिस सेंटरमध्ये चर्चा होई आणि तिथेच संपूर्ण महाराष्ट्रासह देशाच्या विविध शहरात त्यांची सर्व्हिस सेंटर काढण्याची योजना पुढे आली. अंजूने ती उचलून धरली व या मोठ्या प्रवाहात तिलाही मोठी संधी मिळाली.

तो डिसेंबर महिना होता. शामने एक मोठा बुके व मिठाई अंजुला तिच्या वाढदिवशी २१ डिसेंबरला पाठवून दिला. त्यावर कोणाचेही नाव नव्हते. ती

चकित झाली. चौकशीअंती तिला समजले शामने हा पाठवला होता. कारण तो बुके ताजमहाल हॉटेलातून आला होता.

अंजूने शामला फोन केला. ती संधी साधून शामनेही तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

''तुम्हाला कसे माहिती माझा आज वाढदिवस आहे ते!'' अंजू.

''केव्हातरी सांगेन मी. पण आता माझ्या शुभेच्छा स्वीकारा. परमेश्वर तुम्हाला दिर्घायुष्य आणि ऐश्वर्य देवो!'' शाम.

''धन्यवाद सर!''

''सर! नको म्हणू. शाम म्हण!''

शाम हे नाव ऐकल्यावर मात्र अंजूच्या डोक्याची चक्रे फिरू लागली. तो मला पत्र पाठवणारा 'शाम' तर नसेल. याला कसे माहिती माझी जन्मतारीख आणि दरवर्षी मला शुभेच्छा देणारे निनावी पत्र यायचे ते याचेच तर नसेल. आता हाच तो 'शाम' हे सांगणारे कोणी नव्हते. ना आई-बाबा, भाऊ इत्यादी कोणीही जवळ नव्हते. पण तिची झोप मात्र या घटनेने पार उडाली होती. तिच्या नजरेसमोर 'शामचा' चेहरा रात्रभर गरगर फिरत होता.

म्हणजे ह्याचे माझ्यावर प्रेम आहे आणि हा शाम अजून कसा विसरला नाही? आणि मी मात्र केव्हाच याला वजा करून टाकला. ती ११ वीला असतानाची घटना. मी पार विसरून गेले. याचे तिला वैषम्य वाटले. आपले लग्न झाले तेव्हा ती लंडनमध्ये होती. तिचा नवरा रोहन कोटक हा मोठा श्रीमंत कारखानदार होता. त्या ग्लॅमरच्या नशेत त्याचे प्रेमाचे धागे जुळले.

रोहन कोटक हा मोठा कारखानदार होता. सातत्याने त्याचे एल.आय.सीच्या ऑफिसमध्ये येणे जाणे होते. अब्जावधी रुपयांच्या एल.आय.सीच्या पॉलिसीच त्याच्या आणि त्याच्या कुटूंबियांच्या असल्यामुळे त्याचे अंजूकडे येणे जाणे चालू होते. आणि त्यातच त्यांची ओळख होऊन प्रेमात रुपांतर झाले. खरे तर घरच्या मंडळींचा याला विरोध होता. कारण तो गुजराती आपण मराठी, वेगळी संस्कृती संस्कार आणि चालीरिती. त्यामुळे शक्यतो अंजूने हे प्रपोजल स्वीकारू नये असे आई वडिलांना वाटत होते. पण अंजू रोहन

कोटकच्या श्रीमंतीच्या आहारी गेली आणि लग्नाला तयार झाली. लग्नापूर्वी रोहन कोटकबद्दल तिला काहीही कल्पना नव्हती. आणि नंतर एक एक गोष्टी समोर येत गेल्या. आणि त्यात तिला समजले की आपण फसलो आहोत.

पण त्या गुजुच्या बाहेर अनेक भानगडी. हे अंजूला लग्नानंतर माहिती पडले. तेव्हा तिला एक मुलगा झाला होता. वाद वाढत गेले आणि प्रकरण डिव्होर्सपर्यंत पोहोचले आणि शेवटी मांडवल झाली. तिला पाच कोटी रुपये मिळाले व मुलाची कस्टडी. शिवाय हे सर्व्हिस सेंटर तिच्या मालकीचे झाले. कोटक प्रकरण येथे संपले पण तात्पुरते. गेले ६ महिने ती येथे पुण्यात आपला व्यवसाय सांभाळायला रहात होती. जवळच एका मोठ्या कॉम्प्लेक्समध्ये तिने एक थ्री बीएचकेचा फ्लॅट घेतला होता. आज शामच्या या शुभेच्छेमुळे बरेच काही प्रश्न उलगडले होते. पण शामचे लग्नही झाले असेल. तो पत्नीला का आणत नाही पुण्याला? हो आणि असे अनेक प्रश्न तिला आता सतावित होते. त्या रात्री तिला झोप लागलीच नाही. सताड डोळे उघडे ठेऊन मागच्या घटना आठवित तिने रात्र जागून काढली.

शामच्या भेटीनंतर अंजूला हे कळून चुकले की रोहन कोटकशी लग्न करून आपण फसलो आहोत आणि आपण शामचा विचार कधीच केला नाही.

त्या रात्री तिने संपूर्ण रात्र जागून काढली आणि केव्हातरी सकाळी तिला थोडी झोप लागली. आळसावले होते डोळे. खरे तर सर्व्हिस सेंटरमध्ये जायला हवे होते पण अंगात त्राण नसल्यासारखी अवस्था अंजूची झाली होती. सारा भूतकाळ तिच्या डोळ्यासमोर गरगर फिरत होता. आणि त्याच ग्लानित अंजू उठली. पण पुन्हा झोपून गेली. आज ती खूपच अस्वस्थ होती. आज शामची खरी ओळख तिला पटली होती आणि भूतकाळातल्या शाळेतल्या सगळ्या घटनांची रांगोळी डोळ्यासमोर गरगर फिरत होती. पण दैवगतीला कोणीच थांबवू शकत नाही. खरे तर तिला शामबरोबरच लग्न करायचे होते पण झाले विपरीतच. रोहनच्या श्रीमंतीला भुलून ती लग्नाला तयार झाली.

रोहन कोटक हा ज्या ज्या वेळी अंजू फॅक्टरीत यायची त्यावेळी तिच्या भोवती भुंग्यासारखा घुमत बसायचा. खर तर त्याचे प्रेम वगैरे काही नव्हते अंजूवर. तसा सहवासही त्यांचा फारसा नव्हता. आपल्या या फॅक्टरीच्या

मालकाची सुंदर मुलगी या पलिकडे काहीही संबंध नव्हता. मोठा स्वार्थी होता तो. खरे तर श्रीमंत घराण्यातला पण हाव मोठी. त्याला लाटायची होती ती अंजूच्या वडीलांची ही फॅक्टरी. ते ही काही सामान्य आसामी नव्हते. गडगंज संपत्ती त्यांच्याकडे होती. अजून काही फॅक्टरीचे प्लॅन करण्याचे काम चालू होते. अशी सोन्याची अंडी देणारी आसामीची मुलगी अंजू जर आपल्या बरोबर लग्नाला तयार झाली तर बरे. त्याने तसे प्रयत्न केलेही पण अंजू काही त्याला भीक घालायला तयार नव्हती. तिने एल.आय.सी.तली तिची नोकरी सोडली. सध्या ती फॅक्टरीत वडीलांबरोबर दररोज येत असे त्यावेळी तिच्याकडे प्रोडक्शन डिपार्टमेंटचा चार्ज होता. आणि रोहन कोटककडे सेल्सची जबाबदारी होती. आणि म्हणून दररोज केव्हा ना केव्हा तरी त्याची फेरी अंजूच्या डिपार्टमेंटमध्ये होत असे. आणि अशा वेळी काही काम नसतानाही तो अंजूच्या मागे गोंडा घोळत बसायचा. त्याचा सहवासही अंजूला खरे तर किळसवाणा वाटायचा, नकोसा वाटायचा आणि ती स्वतःच तिथून निघून आपल्या वडीलांच्या कॅबिनमध्ये जायची. पण रोहनचा हा पाठलाग काही संपत नव्हता.

नाईलाज म्हणून रोहनने अंजूच्या वडीलांना गळ घातली आणि अंजूचा हात मागितला. खरे तर त्यांना कुठे माहित होते ह्या गुजू भाईचा कावा... त्याला लाटायची होती कंपनीच.. अंजूसोबत. तो शिकलेला होता. इंजिनिअर होता, त्याने एम.बी.ए. केले होती. त्यांच्या कुटूंबाचा कारोबार त्यावेळी लंडनमध्ये खूपच तेजीत होता. पण नियतीने डाव साधला. त्याच्या फॅक्टरीत तयार होणाऱ्या मालाचा उठाव होईना. नुकसान आणि नुकसानच होत होते. आणि नाईलाजाने रोहनने लंडनला जायचे ठरवले. पण तत्पूर्वी अंजू आपल्या गळाला कशी लागेल यासाठी त्याने सातत्याने प्रयत्न करून अंजूच्या वडीलांना या जाळ्यात खेचले. ते लग्नाला तयार झाले. पण शेवटपर्यंत अंजू मात्र या लग्नाला तयार नव्हती. तिचे खरे प्रेम होते ते शामवर. तिने मनोमन तिच्याशी लग्न करण्याचा विचार केलाच होता. आणि त्यात हे नवे लचांड येऊन उभे राहिले.

खरे तर अंजू ही तिच्या वडीलांची एकुलती एक मुलगी. अनेक दिवस ती या विचारातच होती. की आपण वडीलांना नाराज न करता काही मार्ग निघू शकतो का? पण वेळ निघून गेली होती. आणि चक्रे इतकी वेगाने फिरली की

रोहनला ताबडतोब लग्न करून लंडनला जावे लागले. लग्न तसे थाटामाटात झाले. रोहनच्या घरातले, नातेवाईक आणि अंजूच्या घरातले नातेवाईक यांच्या साक्षीने.

लग्न होईपर्यंत अंजूला खरे तर रोहनचे खरे अंतरंग समजलेच नव्हते. लग्नानंतर १ महिनाच व्यवस्थित गेला. पण त्यानंतर त्याचे सगळे रंग ढंग हळू हळू अंजूच्या ध्यानी यायला लागले. तो रात्री उशिरा यायचा तो दारू प्यायलेल्या अवस्थेतच. अंजूला त्याला जवळ करावेसे वाटत नव्हते, पण हा सगळा जबरदस्तीचा मामला तिला खूपच महागात पडला. तसे पाहिले तर अंजू ही मराठी आणि कोटक घराणे हे गुजराती, त्यांचे संस्कार वेगळे. त्यांच्या चालीरीती वेगळ्या. अंजूला खूप जड जायचे ह्या सगळ्यातून पार पडताना. अनेक वेळा तिने याबाबत रोहनला रोखण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा विरोध इतका होता की अंजू काही करू शकत नव्हती.

आणि एवढ्यात अंजूला दिवस गेले. तिच्या पोटात रोहनचे मुल वाढत होते. खूप त्रास होत होता तिला. पण ती एकाकी होती. जवळचे कोणीही नव्हते. ना आई–वडील ना दुसरे कोणी नातेवाईक. इकडे आड तिकडे विहीर अशी अवस्था अंजूची झाली होती. आणि हे डोहाळे अत्यंत विषण्ण अवस्थेत ती सहन करीत होती. त्या दोघांमध्ये संबंध इतके ताणले गेले होते की नाईलाजाने तिने भारतात येण्याचे ठरवले. आणि रोहनला गळ घालून ती भारतात आली बाळंतपणाच्या निमित्ताने.

भविष्यात आपण पुन्हा लंडनला जायचेच नाही असा एक पक्का इरादा तिने मनामध्ये केला होता. आणि तिने बाळंतपण होईपर्यंत कड काढला. तिला मुलगा झाला. त्याचे नाव मयुर. यावेळी ती खूपच तणावग्रस्त अवस्थेतून जात होती. येथे भारतात तिने वकीलांशी चर्चा केली आणि काही मार्ग निघतोय काय? आणि शेवटी रोहनला सांगून काहीतरी उद्योग येथे सुरु करावा अशी गळ घातली. आणि त्यातूनच या सर्व्हिस सेंटर चालू करण्याचा तिला इरादा सफल झाला. अजून ही ती त्या विचार चक्रातून आज बाहेर आली नव्हती. ती झोपेतून उठली त्यावेळी नऊ वाजून गेले होते. आणि सर्व्हिस सेंटरला तर जाणे भाग होते.

आज शामची भेट झाली आणि सगळा भूतकाळ जागा झाला. शाम आला आहे इथे आणि त्याने तिला ओळखले आहे याच विचाराच्या आनंदात ती पुन्हा सर्व्हिस सेंटरला आली.

दुसऱ्या दिवशी शाम मुंबईला निघण्याच्या तयारीत होता म्हणून सर्व्हिस सेंटरला आला. प्रोजेक्टचे काम पूर्ण होत आले होते. ते पुढच्या २ महिन्यात संपेल व कारखाना ३१ मार्च पूर्वी चालू होणार होता. तो अंजूची वाट पहात होता.

अंजू आली तेव्हा शाम निघायच्या तयारीत होता. दीड तासापेक्षा अधिक उशीर होऊन गेला होता. पुढे उशीर झाला तर वाशीला होणाऱ्या ट्राफ्रिकमधून बाहेर पडणे मुश्कील. अंजू आल्याने त्याला हायसे वाटले. पण आता सगळे पत्ते हळूहळू उघडे होत होते. त्यामुळे अंजूने नक्की आपल्याला ओळखले असेल का? याच विचारात तो पूर्णपणे हरवला होता.

''हाय! सॉरी! तुम्हाला थांबावे लागले. सॉरी! पण आता लंच घेऊन निघायचे मुंबईला. प्रथम आपण आत चलावे!'' अंजू.

अंजूच्या मागून काहीही न बोलता शाम सर्व्हिस सेंटरमध्ये आला. दुपारचे १२.३० वाजले होते. शाम भेटणार म्हणून तीने खास बेत आखला. आपल्या हाताने तिने छान मालपोहे करून आणले होते. शिवाय श्रीखंड पुरीही होतीच.

''चला! सुरू करा! कोठे हरवलाय? शामराव? अंजू.

''नाही! मी उशीर होतोय याचा विचार करीत होतो! शाम.

''सॉरी! माझ्यामुळे तुमचे दोन तास वाया गेले. एवढ्यात तुम्ही वाशीला पोहोचला असता पण आता लंचला सुरुवात तर करा!'' अंजू.

बराच वेळ शाम अंजूकडे पहात होता. तोच निरागस, हसरा चेहरा, तेच झुपकेदार मागे बांधलेले केस. तिची लगबग हालचाल त्याच्या नजरेतून सुटत नव्हती. त्याने तिच्यावरची नजर हटवली.

''हो! सुरु करू या.'' शाम.

आणि दोघांनी लंच घेतला. अंजूने जीव ओतून छान बेत आखला होता.

जेवताना ती त्याच्याकडे अधून मधून कटाक्ष टाकीत होती आणि शाम ती चुकवीत मनात सुखावत होता. जेवण झाले.

''आता केव्हा येणार!'' अंजू.

''आठवडाभरात खेप होईल! पाहु या!''

''मग हॉटेलला न जाता माझ्या घरीच या. परकेपणा जराही न ठेवता. मला पण आवडेल तुमचा सहवास!'' अंजू.

शाम 'सहवास' या शब्दानी चमकलाच. त्याला शाळेतल्या दिवसांची आठवण झाली. आपण हे काय ऐकत आहोत. आंधळा मागतो एक डोळा... तशी अवस्था त्याची झाली होती. तो निघाला. अंजू त्याला सोडायला त्याच्या गाडीपर्यंत आली. शाम गाडीत बसला आणि त्याने बाय म्हणण्यासाठी हात बाहेर काढला. अंजूच्या मुलायम स्पर्शाने तो अधिक सुखावला आणि तिही. हा त्याचा तिला व तिचा त्याला झालेला पहिला स्पर्श होता. वीज जावी अंगाला स्पर्शून, तसा अंजूचा स्पर्श त्याला सुखाऊन गेला. मग बराच वेळ तो त्याच नशेत होता.

आपण अंजूकडे नकळत ओढले जात आहोत हे त्याला जाणवले. तसे तरुण वय दोघांचे. त्यात नवल ते काही नव्हते. हा एक चांगला योग होता. वळणावळणाने आपल्या इप्सीतापर्यंत पोहोचलेला. पुनः त्याला शंकेने गाठले. तो मीच शाम हे अंजूला कळले असेल का? तो अडखळला आणि पुनः हरवला अंजूच्या विश्वात.

आपण अंजूजवळ आता काहीही आड पडदा न ठेवता बोलायला हवे. सत्य समोर यायला हवे असे त्याला वाटत होते. पण समजा मी दुसरा कोणी आहे असे अंजूला वाटत असेल. पण आवडत असेन का मी तिला? तर मग मागची तबकडी उगाळणं याला काही अर्थ नव्हता. ही विचारांची राळ वाशीपर्यंत चालू होती. शामच्या मनात हुरहुर वाढली आणि त्याला वाटले तिला फोन करावा आणि सांगावे की मी तोच शाम आहे. तुझ्यासाठी वेडा झालेला. पण जर ती त्या प्रसंगाने दुखावली असेल आणि मला दुसराच कोणी समजत असेल तर? आता त्याच्याजवळ येणाऱ्या अंजूला तो कोणत्याही परिस्थितीत दूर करू इच्छित नव्हता.

एक विचार त्याच्या मनाला चाटून गेला. ''पुढच्या खेपेला हॉटेलमध्ये न रहाता माझ्या घरी या.'' या वाक्याने त्याची धडधड वाढली होती. पाहू पुढचे पुढे. पण आता तिची ऑफर स्विकारावी की न स्विकारावी. या जर–तरच्या चक्रात तो फसला आणि स्वप्नात हरवला. अंजू आता त्याची प्रेयसी वाटत होती. तिच अंजू, जी त्याला हुलकावणी देत पंधरा वर्षांचा काळ त्याच्यापासून दूर होती.

पण हा काळाचा महिमा असावा. असाही एक विचार त्याच्या मनात येऊन गेला. 'दूर ही सही' म्हणत तो विचार चक्रातून बाहेर आला. बाहेर पहातो तर सायनच्या ब्रिजवर गाडी होती. आता पाच मिनिटात आपण घरी पोहोचू. आता इतक्या उशीरा घरी जाऊन काय खाणार? म्हणून दादरच्या प्रितम हॉटेलात त्याने आपला मोर्चा वळवला.

तो रविवार होता. दुपारच्या अंजूच्या हातच्या जेवणाने तृप्त झालेला शाम विसावला. हॉटेलात. पण काय ऑर्डर करावे हे त्याला समजेना. त्याने प्रथम सॉफ्ट ड्रिंक म्हणून थम्स अप मागवले आणि नंतर सांगतो म्हणून वेटरला पाठवला.

पुनः अंजूचा फोन. ''पोहोचलात का? मुंबईला घरी!'' अंजू.

''नाही! डिनर घेऊनच घरी जाईन!'' शाम.

''मग मी दिली असतीना पोळी–भाजी!'' अंजू.

या संवादाने अंजूच्या मनात आपल्याबद्दल वाटणारे आकर्षण शामला जाणवले.

''ठिक! आता जेवण आले आहे. पण दुपारी तुझ्या हाताच्या जेवणाची चव अजून जिभेवरून हटत नाही. शिवाय तू एव्हढे प्रेमाने जेवायला दिलेस. गेल्या दहा वर्षात असे घरचे, रुचकर व प्रेमात ओसंडून वाहणारे जेवण जेवलो नव्हतो. आवडले मला. तुझ्या हाताला भारी चव आहे... मी तुझ्या जेवणाच्या प्रेमात नाही पडलो तरच नवल!'' शाम.

या प्रेमाच्या उल्लेखाने अंजूही सुखावली. शाम एक गोरापान, हुशार, यशस्वी उद्योगपती व तसाच नम्र, प्रांजल, कुटुंबवत्सल म्हणून तिलाही त्याची

ओढ लागली. त्या रात्री तर तिचा डोळ्याला डोळा लागला नाही.

तीच अवस्था इकडे शामची होती. दुसऱ्या दिवशी तो नेहमीच्या कामात व्यस्त झाला. एक वर्ष संपत येणार होते. कंपनीची अकाऊंटस् ऑडीटची व्यवस्था करणे, यामध्ये तो आठवडाभर व्यस्त होता. खरेतर शामला पुण्याची ओढ लागली होती. पण कामातून वेळ मिळणे कठिण झाले होते. दोन्ही कंपन्यांची सगळी जबाबदारी त्याच्या खांद्यावर होती. शिवाय पुण्याचे मल्टीनॅशनल प्रोजेक्ट आणि भारतभर शोरूम आणि सर्व्हिस सेंटर उघडण्याचे प्रोजेक्ट. त्याला आता सक्षम जोडीदाराची गरज होती आणि ती शामला अंजूमध्ये दिसत होती. पण घोडा मैदान अजून खूप लांबच होते. पण शामने अंजूला त्याच्या नव्या प्रोजेक्टच्या कामात गुंतवावे असे त्याला वाटत होते.

अंजू ही हुशार. तिने बी.एस.सी. केल्यानंतर मॅनेजमेंट व मग ॲडव्हान्स मॅनेजमेंटची पदवी घेतली होती. तिला व्यवसायाचे सखोल ज्ञान होतेच म्हणून आपण पुण्याला जाऊन याबाबत तिची मते काय आहेत याची चाचपणी करायची होती. म्हणून दोन दिवसांसाठी त्याने पुण्याला जाण्याचा विचार केला व शनिवारी सकाळी निघून पुण्याला आला. नेहमीप्रमाणे तो ताजमध्ये राहिला व अंजूला फोन करून आपण आल्याची बातमी दिली व तिला त्याच्या नव्या फॅक्टरीत बोलाविले. त्या कंपनीच्या प्रोजेक्टचे ९५% काम संपले होते. सगळ्या केबिन तयार होत्या. मशीनरी आपापल्या जागेवर फिक्स केल्या होत्या. रॉ–मटेरियल येऊन पडले होते. सगळी तयारी झाली होती. पण हा सगळा कारभार पहायला योग्य माणसांची शोधाशोध सुरू होती.

तो पोहचण्या आधी एक तास अगोदर अंजू हजर झाली. ती हे प्रोजेक्ट प्रथमच पहात होती. ही भव्य–दिव्यता पाहून तिचे डोळेच दिपले. गाडी पार्क करून ती शामच्या कॅबिनमध्ये आली. प्रथम शामला नमस्कार करून ती त्या आलीशान कॅबिनमध्ये विराजमान झाली.

''गुड! तुम्ही आलात. खूप आनंद झाला. मला बऱ्याच गोष्टी तुमच्याजवळ बोलायच्या आहेत. आपण येथेच लंच घेऊ. मी ताजमधून मागवले आहे. तेव्हा जायची घाई करू नका!'' शाम.

''ओके ओके! नाही जाणार, येतानाच मी माझ्या सर्व्हिस सेंटरला

जाऊन सगळी व्यवस्था लावून आले आहे. तेव्हा मी तुमच्याबरोबर दिवसभर आहे. घाबरू नका!'' अंजू.

''अंजू! हे पहा या कंपनीत तयार होणारा १००% माल एक्सपोर्ट होणार आहे. लोकल सर्व्हिस सेंटरना माझ्या मुंबईतील ऑफीसमधून सर्व सर्व्हिस स्पेअरपार्ट मिळतील. तेव्हा हा प्रोजेक्ट किती महत्त्वाचा आहे. तुम्हाला समजले असेलच. येथल्या व्यवस्थापनासाठी मला एका सक्षम, हुशार व्यक्तीची गरज आहे. यासंदर्भात माझी चाचपणी चालू आहे. पण या क्षेत्रातली जाणकार माणसे शोधणे कठिण. शिवाय टाटा, बिर्ला यांच्या कारखान्यातील लोक कोणी येणार नाहीत तेव्हा...!'' शाम.

''तेव्हा काय?'' अंजू.

''मी म्हणतो की जबाबदारी तुम्ही स्विकाराल का?'' शाम.

अशी सोन्यासारखी संधी आपणास मिळते आहे आणि त्यात शामसारख्या हुशार व्यक्तीबरोबर काम करण्याची संधी कोण सोडेल? शिवाय आपलेही सर्व्हिस स्टेशन चालूच आहे. तेही बघता येईल.

''येस. मी तयार आहे! ही जबाबदारी मी स्वीकारते. तशी इच्छा माझी होतीच. शिवाय तुमच्यासारख्या कुशल व्यक्तीबरोबर काम करायला कोणाला आवडणार नाही?'' अंजू.

तुम्ही सर म्हणू नका 'शाम' म्हण. मला ते अधिक आवडेल!'' शाम.

''ओके ओके!'' अंजू.

याबाबत बोर्ड ऑफ डायरेक्टर यांच्याशी बोलून तुझे पॅकेज ठरवतो आणि सोमवारी मेल करीन! शाम.

दुपारचे २ वाजून गेले होते. ताजमधून आलेले लंचचे बॉक्स एका टेबलावर मांडले होते. त्या दोघांनी फ्रेश होऊन आनंदाने लंच घेतला. आज शामची अर्धी जबाबदारी संपली होती. अंजूचेही मर्सीडीज बेंझचे सर्व्हिस सेंटर असल्याने तिच्याकडे एक्सपर्ट स्टाफ होता. थट्टा–मस्करी करीत मजेत जेवण आटोपले. पण आज अंजूने ती ऑफर स्विकारल्याने बॉस आणि नोकर ही भावना दोघात मर्यादेची भिंत उभी करून गेली.

''अंजू! इथली सगळी कामे संपवून रात्री ती मुंबईला निघायचे म्हणतो!'' शाम.

''आजची रात्र तुझी माझा पाहुणचार स्विकारावा व उद्या सकाळी मुंबईला प्रस्थान करावे असे मी म्हणते!'' अंजू.

''ओके! ठिक आहे. चालेल मला. तुमच्या घरी कोण कोण असता तुम्ही?''

''मी आणि माझा ८ वर्षाचा मुलगा मयूर!'' अंजू.

''तुझे मिस्टर!''

''ती मोठी स्टोरी आहे सांगेन केव्हातरी!''

''म्हणजे.''

''माझ्या डिव्होर्स झाला. पाच वर्षे झाली! पण अजून मुलाच्या कस्टडीची केस चालू आहे. अनेक अटी नवऱ्याने घातल्या. टेम्पररी डिव्होर्स दिला. पण लग्न न करण्याच्या अटीवर!'' अंजू.

हे सारे ऐकून शाम एकदम सर्दच झाला. हे काय ऐकतो आहे मी. तिच्याबद्दलची सहानुभूती शामच्या मनात जागी झाली.

''ठिक! मी आज थांबतो तुझ्याकडे!'' शाम.

आणि त्याच्या गाडीतूनच ती दोघे अंजूच्या घरी आले. एका मोठ्या कॉम्प्लेक्समध्ये तिचा फ्लॅटही प्रशस्त होता. रात्री जेवण (डिनर) झाले आणि ती दोघे व मुलगा हॉलमध्ये गप्पा मारत होते. झोप आली म्हणून तिचा मुलगा बेडरुममध्ये जाऊन झोपला.

''मला हे सांग. अंजू तू कोणत्या शाळेत होतीस? आणि कॉलेज?''

''ज्ञानेश्वरमध्ये आणि रुईयातून मी बी.एस.सी. केले व मग एम.बी.ए आणि नंतर पी.जी.!'' अंजू.

''मग तू मला ओळखलं असशील. मी शाम. तुला पत्र पाठवणारा. ११ वीत असताना. माझीही शाळा तीच. फक्त माझं पुढचं शिक्षण खूप धकाधकीचे झाले.'' शाम.

''ओके!''

आणि तिने डोळे मिटले. शामही हरवला आपल्या शाळेतल्या सगळ्या आठवणीत.

''काय हा योगायोग? वळणा वळणाच्या वाटेवरून शेवटी आपण एकत्र आलो... हा योगायोगच म्हणायचा.'' शाम.

आणि शामने अंजूचा हात हातात घेतला तिनेही त्याला विरोध केला नाही. क्षणभर दोघेही आपल्या दुनियेत हरवली.

''शेवटी माझ्या मनासारखे झाले. मला माझे हरवलेले प्रेम आज सापडले. पण त्यासाठी येवढा प्रवास. आयुष्यातले चढ–उतार पहावे लागले आपल्याला.''शाम.

''शाम! अरे तु लग्न केले असशील ना?''

''नाही! मी अविवाहीत रहाण्याचा निर्णय घेतला होता आणि तु माझी स्फूर्ती देवता म्हणून माझ्यासमोर होतीस. अशी अचानक आपली भेट होईल. असे स्वप्नातही मला वाटले नव्हते. द गॉड इज ग्रेट!'' शाम.

रात्री उशीरापर्यंत ती दोघे गप्पात रंगली होती. सारे बालपण त्यांच्या नजरेसमोर रांगोळ्या काढीत होते. रात्रभर ती दोघे जागीच होती.

आज अगदी आनंदी मुडमध्ये शाम मुंबईच्या दिशेने निघाला. मुंबईत केव्हा पोहोचला हे त्याला कळलेच नाही.

शामने अंजूला छान पॅकेज दिले व मॅनेजर म्हणून तिची या नव्या प्रोजेक्टवर नेमणूक केली.

त्या फॅक्टरीचे उद्‌घाटन पी. एम. मोदी यांच्या हस्ते झाले. जर्मनी, लंडनमधून मर्सीडीज बेंझचे चेअरमन आले होते. त्याशिवाय ऑटोमोबाईल क्षेत्रातले दिग्गज रतन टाटाही आले होते. शानदार सोहळा झाला आणि भारत सरकारतर्फे शामला 'उद्योग श्री'चा सन्मान पी.एम. मोदींच्या हस्ते देण्यात आला.

कारखाना सुरू झाला. अब्जावधीची उलाढाल सहा महिन्यात झाली. जगभरात मर्सीडीज गाडीचे पार्ट जगभर निर्यात होऊ लागले.

आज हॉटेलमध्ये न रहाता शाम अंजूच्या घरीच आला खरा. पण अंजू

प्रचंड टेन्शनमध्ये होती. आज तिचा मुड पूर्वीचा नव्हता...

''अंजू काय प्रोब्लेम आहे. गेले दोन दिवस मी पहातोय आपल्या फॅक्टरीच्या कार्यक्रमामध्येही प्रसन्न नव्हतीस. कसले टेन्शन आहे तुला?'' शाम.

अंजूने एक पॅकेट शामच्या हातात ठेवले. शामने ते उघडले. ती कोर्टाची डिव्होर्स संबंधीची ऑर्डर होती. या ऑर्डरप्रमाणे तिचा नवरा रोहन कोटक याला मुलाची कस्टडी मिळाली होती व तो अंजूला पत्नी म्हणून स्वीकारायला तयार होता. या गोष्टीला कोर्टाने अनुमती दिली होती आणि महिन्याभरात भारतातून तिला लंडनला मुलासह जावे लागणार होते. मोठा पेच अंजूसमोर होता. तिचा डिव्होर्स पूर्णपणे झाला नव्हता. तिला मुलाची कस्टडी मिळाली होती पण तात्पूर्ती. मुलगा मोठा होईपर्यंतच. आता तिला पुनः रोहनबरोबर रहावे लागणार होते. तेही लंडनला. मोठा पेच होता तिच्यासमोर.

''ठिक! आपण काय करणार देवाच्या मनात काहीतरी वेगळे आहे. आपण एकत्र येऊ नये असेच त्याला वाटत असावे. सॉरी! अंजू मी किती स्वप्न पाहिली होती. पण आताच्या परिस्थितीत ते शक्य नाही असे दिसते!'' शाम.

''होय! पण मार्ग निघेल काहीतरी. मी पुनः कोर्टात पिटीशन करीन. मला मुलगा तर हवाच. पण मी आता रोहनकडे पुनः जाऊ इच्छित नाही. त्याच्यासोबत रहाणे क्लेशकारक होते. पुनः ते अग्नीदिव्य नकोच. अन्यथा मी अविवाहित राहिन पण रोहनसोबत रहाण्याची माझी मानसिकता नाही.'' अंजू.

अंजू आणि शाम यांनी मनात ठरविलेले स्वप्न जमिनीवर आले होते. इतक्या वर्षांनी अंजू भेटली पण आपल्या प्रेमाचा असा विचका व्हावा. पुनः काधीही न भेटण्यासारखी परिस्थिती निर्माण व्हावी हा नियतीचा निर्णय असावा. अंजूचा हात त्याने सोडला आणि वेगळ्या बेडरुममध्ये तो जाऊन झोपला. पण झोप लागली नव्हती.

अंजूला जर रोहनबरोबर मुलासाठी रहावे लागले तर तिच्यावर अन्याय होईल. नाही सुखी होऊ शकणार ती. तिच्या आयुष्याचे मातेरे होईल आणि आपली स्वप्नेही धुळीला मिळतील. रात्रभर शाम जागा होता. केव्हातरी पहाटे

५ वाजता त्याला झोप लागली. अंजूची तिच अवस्था होती. सकाळी तिने शामच्या बेडरूममध्ये डोकावले. तो शांत झोपला होता. मग अंजूने कॉफी करून नाश्त्याची व्यवस्था केली. शाम उठला, फ्रेश झाला नी बाहेर आला. तर अंजू अजून बाहेर बसली होती चिंतामग्न मनःस्थितीत.

शाम येताच तिने त्याला कॉफी तयार करून दिली. ती घेण्याच्याही मनःस्थितीत शाम नव्हता...

''मला तातडीने निघावे लागेल लंडनला!'' शाम.

''पुनः कधी येणार?'' अंजू.

''माहिती नाही.'' शाम.

या त्याच्या उत्तराने अंजू पार तुटली. तिनेही कॉफी घेतली नाही. शाम तसाच निघून मुंबईकडे निघाला तो पडल्या चेहऱ्याने. आयुष्य असे सारखे हेलकावे खात होते. ज्या अंजूसाठी आपण गेले १५ वर्षे वाट पाहिली. विवाह केला नाही. आज भेटेल, उद्या भेटेल ही वाट पहात राहिला. अचानक तो योग आला पण पुनः अडचणी उभ्या राहिला.

अंजू रोहनबरोबर लग्नानंतर दहा वर्षे राहिली. पण वैवाहिक जीवन सुखाचे नव्हते. रोहन हा बाहेरख्याली अब्जाधिशाचा मुलगा. तो नेहमी सिंगापूरलाच असायचा. मी बिझनेस टूरवर आहे असे खोटे सांगायचा. तिकडे त्याने एका चायनिज मुलीबरोबर टाय अप केले होते. रंगत होत्या रात्री सिंगापूरमध्ये आणि अंजू लंडनमध्ये. मयुर लहान होता म्हणून अंजू त्याला सांभाळीत होती. तिला दुसरा इलाज नव्हता. पण मनातल्या मनात तिच्या डोळ्यातून रोहन उतरला होता आणि तिने डिव्होर्ससाठी लंडन कोर्टात अर्ज केला.

पहिल्या इंटिरिअम ऑर्डरमध्ये तिला मुलाची कस्टडी देण्यात आली कारण ते मुल लहान होते म्हणून. शिवाय तिच्या उपजीवीकेसाठी चार कोटी रुपये देण्यात आले. ही केस अजून संपली नव्हती. पण अंजूने भारतात येण्याचा निर्णय घेतला आणि येथे ती स्थायिक झाली. गेली ४ वर्षे ती पुण्यात होती.

आणि आज फाईनल ऑर्डरमध्ये रोहन आणि अंजू यांनी मयुरसह एकत्र

रहावे. असे निर्देश दिले. अंजूला हे मान्य नव्हते. तिने या ऑर्डर विरोधात लंडन कोर्टात पुनः अर्ज करण्याचे ठरवून या प्रकरणात स्टे मिळवण्यासाठी दुसऱ्या दिवशीच ती लंडनला गेली.

झाले शाम आणि अंजू यांचे सूत जुळण्यापूर्वीच हा बखेडा उभा राहिला होता. तिचा नाइलाज होता. महिन्याभरात पुनः लंडन कोर्टाने तिचा स्टे खारीज केला व रोहन–अंजूच्या वैवाहिक जीवनाला मान्यता दिली.

पण अंजूचे मन त्यासाठी तयार नव्हते. हे वैवाहिक जीवन सुखाचे नाही हे ती जाणीत होती. ती मयुरलाही सोडू शकत नव्हती. ते लहान बाळ. ना समज. त्याची काळजी लंडनमध्ये कोण घेणार? रोहन हा सडाफटींग, बेजबाबदार. फक्त पैसा आणि पैसा याबरोबर ऐयाशी जीवन जगणारा तो. एक क्षणभर येथे रहायचे नाही असे ठरवून अंजू पुनः पुण्याला आली. सोबत मयूर होता.

येथे येताच अंजूने शामला फोन केला. मात्र शामने फारसा प्रतिसाद अंजूला दिला नाही. या विचित्र अवस्थेत आपण अंजूशी विवाह करू शकत नाही. वा राहू शकत नाही तिच्यासोबत. अशा विचित्र अवस्थेत शाम सापडला होता. त्याच्या स्वप्नांचा चक्काचूर झाला होता. हा वळणावळणाचा प्रवास जीवघेणा होत होता. जिच्या प्रेमाखातर आपण स्वप्न रंगवली. १५ वर्षाने ती भेटली पण सगळाच घोळ होता. त्याने अंजूपासून दूर रहाण्याचा निर्णय स्वतःवर लादून घेतला. आता त्याचे मन त्या कामात लागत नव्हते. एवढा मोठा डोलारा उभा केला खरा. पण आता पुढे काय? कामाच्या बोझ्याने ओढाताण होत होती.

शाम वयाच्या चाळीशीत आला. पुनः कोणा दुसऱ्या स्त्रीबरोबर लग्न करावे हे त्याच्या मनाला पटत नव्हते आणि पुनः आपण आहे त्या अवस्थेत ठिक आहोत हे त्याने ठाम ठरविले व विवाहाच्या विषयाला पूर्णविराम दिला. पण तो अंजूच्या चक्रातून बाहेर येऊ शकत नव्हता. इतका शाम तिच्यात गुंतला होता. जगाच्या पाठिवर ती कोठेही असो. ती सुखी रहावी हिच अपेक्षा तो करीत होता. याला म्हणतात निस्सीम प्रेम, निर्वाज्य प्रेम.

एकदा अंजू येऊन गेल्याचे त्याला समजले. ती तिच्या सर्व्हिस सेंटरची व्यवस्था लावण्यासाठी. तिच्या मनात शामला भेटावे असे होते. पण मनातल्या

विचारांनी आणि प्राप्त परिस्थितीने सगळा घोळ केला. तिलाही वाटत होते आपण शामशी लग्न करावे. तो एक सज्जन, प्रापंचिक गृहस्थ आहे आणि माझ्यासाठीच अविवाहित राहिला. तो अत्यंत संयमी आहे, प्रेमळ आहे. हे ती जाणत होती. पण नियतीच्या मनात काय आहे हे कळणे कठीण. एवढे आम्ही जवळ आलो पण पुनः दुरावलो, म्हणून मनातल्या रंगवलेल्या स्वप्नांना पूर्णविराम मिळाला.

लंडनमध्ये ती गेली खरी, पण वेगळी रहाण्याचा निर्णय तिने घेतला. तिने नवऱ्याला स्पर्शही करून दिला नाही. तिला तो व्हावा असेही वाटत नव्हते. तो एक बाहेरख्याली पुरुष होता हे ती जाणून होती. त्याला बायकाही कमी नव्हत्या. मग का तो आपल्या मागे आहे. पुनः एकत्र येण्याची तिची मानसिकता नव्हती. तिच्या मनातून तो कायमचा उतरला होता.

या मधल्या काळात शामच्या पूना प्लॅन्टचे काम मार्गी लागले होते. उत्तम उत्पादन म्हणून जगात त्याचा बोलबाला झाला होता. एक उभारता उद्योगपती म्हणून शामचे नाव भारतभर आणि जगातही गाजत होते. त्यामुळे गाड्यांच्या किंमतीत घट होऊन परदेशी गाड्यांचा सेलही जगभर दुप्पट झाला होता. मर्सिडीज बेन्जच्या कंपनीने शामला आपल्या डायरेक्टर बोर्डावर घेतले होते. शिवाय लंडनमधल्या मोटार कंपन्यांनाही तो स्पेअर पार्ट पुरवीत होता. या दोन वर्षांत धंद्यात उत्तम पाय रोऊन तो उभा राहिला होता. एक क्षणाचीही उसंत त्याला मिळत नव्हती. ऑर्डरवर ऑर्डर जगभरातून मिळत होत्या व म्हणून दुसरे एक युनिट सुरू करावे लागले तेही पुण्यात.

अनेक वेळा त्याच्या जर्मनी, लंडनमध्ये खेपा होत. लंडनमध्ये तर १५/१५ दिवस तो थांबत असे पण त्याने अंजूला ना फोन केला वा तिच्या घरी गेला. शक्यतो आपण स्वतःला अंजूपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला होता.

पण अंजूला शामचा दुरावा अधिक त्रासदायक वाटत होता. एकाकीपणा तिला खायला उठत होता. आपण याला भेटावे असे राहून राहून तिला वाटत होते. शामच्या फोनची ती सतत वाट पहायची पण गेल्या दोन वर्षांत एकदाही त्याने तिला फोन केला नाही व तिनेही. म्हणून तिला एकाकीपणाची आता भिती वाटायला लागली होती.

अंजूने लंडनला गेल्यावर मयुरला रोहनच्या घरी पोहोचविले आणि ती एकटीच रहात होती. रोहनच्या कुटुंबाशी मयुर आता एकरुप झाला होता. तिची मोठी चिंता मिटली होती.

अंजूला शामला भेटण्याची इच्छा तीव्र होत गेली. तिला त्याच्या धंद्यात होणाऱ्या वाढीचा, त्याच्या करीयरविषयी बातम्या ऑटो मोबाईलच्या मॅगझिंनमध्ये मिळत होत्या. त्याचे युरोप, लंडनमध्ये येणे–जाणे होते. एकदा तिने पुणे सेंटरला स्वतः फोन केला. शाम कोठे आहे हे पहाण्यासाठी. तेव्हा तिला समजले तो जर्मनीला गेला आहे व परत येताना व्हाया लंडन येणार आहे. तिने शामला फोन केला पण तो मिटिंगमध्ये व्यस्त होता. तेव्हा संपर्क होत नव्हता. शाम भारतात आला तेव्हा अंजूने त्याच्या संदर्भात संपर्क करण्याचा प्रयत्न केला होता हे समजले. अंजूच्या प्रेमात आकंठ बुडालेल्या शामला पुनः तिच्या आठवणी जागवाव्या असे मुळीच वाटत नव्हते. तो आता विरक्त अवस्थेकडे झुकला होता. पण तरीही अंजू काही केल्या मनातून जात नव्हती.

अंजूने पुनः लंडन कोर्टात रिटपिटीशन फाईल केले व डिव्होर्स मिळावा यासाठी पिटीशनही केले होते. लंडनला आपल्याला आता पाच वर्षे होऊन गेली होती. तीही आता निश्चिंत होती. कारण मयुर रोहनच्या घरी होता. त्यामुळे आज तरी ती स्वतंत्र होती. तिला मयुरची कस्टडी वडिलांना देऊन मोकळे व्हायचे होते. तो काही अडचण निर्माण करील असे वाटले नव्हते. कोर्टात केस उभी राहिली. रोहनने तिला डिव्होर्स देण्यास नकार दिला व मयुरसह तिने त्याच्या सोबत रहावे अशी विनंती कोर्टाने केली. पण अंजू मात्र यातून मोकळी होऊ इच्छित होती. त्याचे कारणही तसेच होते. रोहनला अंजूच्या म्हणजे शामच्या जवळकीबद्दल सर्व्हिस सेंटरच्या काही लोकांनी सांगितले. त्याला बायको म्हणून नव्हे तर हक्काची एक बटिक हवी होती. त्यालाच तिचा विरोध होता. या जोखडातून मोकळे होण्याचा प्रयत्नही लांबवत होता. ती डिव्होर्स मागत होती. रोहनचा विरोध होता. सारे प्रकार समोर दिसत होते. पण पुराव्या अभावी कोर्ट तरी कशी परवानगी देणार? रोहनने तिला दिलेले पैसे व सर्व्हिस सेंटर आपल्याला मिळावे हा घाट घातला, जेणे करून अंजू हिंदुस्थानात जाऊ शकत नाही. त्याने तिला घेऊन दिलेला पुण्याचाही फ्लॅट त्याला हवा अशी कोर्टाला

विनंती केली. या कोंडीत अडकलेली अंजू मोठ्या संकटात सापडली होती. तिला काहीच मार्ग सापडत नव्हता.

अंजूला रोहनपासून सुटका करून घेणे हा एकच पर्याय यामध्ये दिसत होता. तिला नवऱ्याच्या प्रॉपर्टीत काहीही इंटरेस्ट नव्हता. हवी होती ती फक्त सुटका. येथे भारतात येऊन पोटापुरते कामावण्यास ती समर्थ होती. शेवटी तिने शामला फोन केलाच. अगदी नाखुशीत त्याने फोन उचलला. अंजू आपली कर्म कहाणी शामला सांगत होती आणि शाम ती ऐकत होता. मनाने खरेतर अगदी निरीच्छ अवस्थेत गेला होता. अंजूचे काय व्हायचे ते होऊ दे. आपण आता या प्रकरणातून दूर व्हावे असे अनेकवेळा त्याला वाटत होते. पण दुसरे मन अंजूच्या या अवस्थेत मदतीचा हात द्यायला हवा या विचारापर्यंत तो आला होता.

कोर्टाच्या केसचा निकाल लवकर लागेल अशी आशा नव्हती. हे काही तातडीचे प्रकरण नव्हते. अंजू लंडनमध्येच होती. तत्पूर्वी रोहनने अंजूला त्याने दिलेली ४ कोटीची रक्कम आपल्या ताब्यात घेतली. आता अंजूकडे असलेल्या तुटपुंज्या रकमेवर तिचा दररोजचा व्यवहार चालत होता. ती एक जागा भाड्याने घेऊन तेथे रहात होती. तो खर्चही आता पेलण्यासारखा नव्हता. अंजू आजच्या घडीला खूपच अडचणीत होती.

पुनः अंजूने शामला फोन केला व तू युरोप व लंडनमध्ये येणार असशील तर माझी भेट घे! अशी विनंती केली. खरेतर त्यावेळी शाम लंडनमध्ये यायला निघाला होता. कंपनीची कामे आटोपून शामने तिला फोन केला व हॉटेलवर बोलाविले.

अंजूने आपली प्राप्त परिस्थिती शामला सांगितली. शामचे हृदयही पाझरले.

''पाहू या काही अडचण असेल तर मला सांग. लंडनमध्ये माझे एक बँक अकाऊंट आहे मी तुला पैसे देईन. तुझी केस एकदा संपू दे. मग काय तो विचार करू!'' शाम.

अंजूला या परिस्थितीत शाम हा एकमेव आधार होता आणि तिला मदत

करायला शामही तयार होता. नंतर शाम हिंदुस्थानात आला.

अंजू सतत शामच्या संपर्कात होतीच. यातून मार्ग काढण्यासाठी काय करावे याचा विचार शाम करीत होता.

मी जरी अंजूपासून दूर जाऊ इच्छितो, तरी परिस्थिती मला पुनः अंजूच्या मार्गावर का आणते आहे हे त्याला कळेना. शेवटी हा विचार झटकून त्याने स्वतःला कामात गुंतवून घेतले. काम प्रचंड वाढले होते. त्याच्या मर्सीडीज कंपनीची मॅनेजमेंटही त्याच्यावर खूष होती. हाल–अपेष्टा, काढत या थराला आलेला शाम मात्र तान्याला कधीच विसरला नाही.

शामने आपल्या परळच्या वर्कशॉपमध्ये मुख्य दारावरच तान्याचा एक पुतळा बनवून तो बसवला होता. तान्याची दोन्ही मुले उनाड. पण त्यांनाही शामने आपल्या कारखान्यात नोकऱ्या दिल्याच. पण तान्याची सगळी जबाबदारी शामने उचलली. तान्याचे वयही ६५ होते. काम फारसे होत नव्हते. मुले विचारीत नव्हती. तेव्हा त्या उभयतांसाठी काहीतरी करावे, त्यांची कायमची व्यवस्था व्हावी यासाठी, शामने नाशिकला एक वृद्धाश्रम काढायचे ठरवले. त्याच्या शेजारीच त्याच्या कारखान्याचे एक नवे प्रोजेक्ट होणार होते. त्या शेजारीच एक छोट्या प्लॉटवर वृद्धाश्रमाचे बांधकाम करून घेतले. हा वृद्धाश्रम फक्त बेघर आणि परितक्ता अशा लोकांसाठीच होता. ज्यांचे कोणी नाही अशा लोकांसाठी आणि तान्याच्या हस्तेच त्या आश्रमाचे उद्‌घाटन केले. तान्याने त्याला आधार दिला होता. हे तो विसरला नाही. तान्या त्याचा अन्नदाता होता. त्याने त्या परिस्थितीत आधार दिला नसता तर? आज शाम कोठे असता. शामने उभयतांवर आश्रमाची जबाबदारी सोपवली.

या आश्रमात २५ खोल्या होत्या. अद्यायावत सगळ्या सोई होत्या. बेघर लोक, परित्यक्ता, अपंग यांना त्याने काम मिळवून दिलेच. पण तान्यासाठी स्वतंत्र व्यवस्था या आश्रमात केली. आश्रमाचे नियम अगदी कडक होते. शाम जातीने आठवड्यातून एक दिवस या आश्रमाच्या बाजूला बांधलेल्या बंगल्यात रहात असे.

शामला जन्मतःच पहिल्यापासून वाचनाची आवड होती. लेखनाची आवड होती. छोटे–मोठे लेख, कविता, कथा शाम लिहायचा. आता त्याचा तो

वेग कमालीचा वाढला होता. वृद्धाश्रमाची पायाभरणी शामने तान्या शेठच्या हस्तेच केली होती. तान्या शेठचा सहवास हा त्याला देवासारखा वाटायचा. शाम जेव्हा नाशिकला असे त्यावेळी तान्या व त्याची पत्नी त्याची सगळी व्यवस्था पहायचे. खूप जीव होता त्या उभयतांचा शामवर. आपली दोन्ही मुले कुचकामी. पण तो शामला आपला मुलगाच मानायचा. एवढे प्रेम, माया त्याने शामवर केली होती. हा मुलगाच भविष्यात काहीतरी भव्य–दिव्य करील असा होरा त्यानेच केला होता आणि तो खरा ठरला. आज त्याचे चार कारखाने चांगले चालत होते. प्रचंड आर्थिक उलाढाल होत होती. स्पेअर पार्टसही उत्तम दर्जाचे आणि जगभरातून मागणी. पैशाचा पाऊस काय म्हणतात त्याचा अनुभव शामला येत होता. पण गरीबीचे चटके खाल्लेला तो, आपले पाय नेहमी जमिनीवर ठेऊन होता.

पण एक गोष्ट मात्र खरी होती. अंजूच्या प्रेमाच्या कैफात तो प्रगती करीत गेला. पण काय? दोघेही दुःखात. जीवनात आनंद काय याचा अनुभव दोघांनाही नव्हता. अंजू लंडनमध्ये एकाकी जीवन जगत होती. तर शामही एकटाच होता. त्याला कौटुंबिक सुख नव्हते, ना अंजूला. हे त्याच्याही ध्यानात आले होते. असे का व्हावे? हे दोन्ही जीव एक दुजे के लिये नाही का जन्मले. मग शामला वाटे माझ्या मनात जे प्रेमाचे बीज पेरले गेले. त्याचा अर्थ काय? पैशाने सुखी नाही होता येत हे त्याच्या मनाने पक्के ताडले होते. रात्री रात्री तर तो याच गोष्टीचा विचार करीत रहायचा. डोळे लाऊन बेडरुमच्या छप्परांना. झोपेचे खोबरे होऊ लागले होते त्याच्या आणि आताशा तो डिप्रेशनमध्ये जाऊ लागला होता. त्यात कामाचा प्रचंड बोजा होता. त्यातही आता तर त्याला अंजूच्या विचारांना पूरते पछाडले होते.

अनेक वेळा त्याला वाटे मी आणि अंजू हे दोन दुःखी जीव एकत्र येऊ शकत नाही का? पण प्रश्न होता तो अंजूच्या डिव्होर्सचा. याबाबत काहीतरी करायला हवे. अंजूची सुटका या कैचीतून करायला हवी. मग पुढचे पुढे. असे वाटून त्याने अंजूला फोन केला. त्यावेळी रात्रीचे १० वाजले होते. अंजूने खूप वेळाने फोन उचलला.

''अंजू! मी शाम! कशी आहेस तू?''

अंजूने काहीच उत्तर दिले नाही. बराच वेळ रडण्याचा आवाज मात्र त्याला वेगळाच संकेत देत होता.

''मी भोगते आहे माझे सुक्रुत! शाम यातून सोडव रे मला... मी वेडी होईन!'' अंजू.

प्रचंड टेन्शन आले शामला. दुसऱ्याक्षणी त्याने लंडनला जाण्याचा निर्णय घेतला आणि सकाळच्या फ्लाईटने तो लंडनला पोहोचला. तो ताजमध्ये उतरला आणि त्याने अंजूला फोन केला.

''मी तुला भेटायला येऊ का? मी लंडनमध्ये आलो आहे!''

''हो! का नाही!'' अंजू.

अंजूने आपला पत्ता दिला आणि तातडीने शामही तिच्या घरी पोहचला. एक छोटीशी जागा तिने भाड्याने घेतली होती. अगदी सामान्य. ते पाहून शाम चरकलाच. ती कशी या अवस्थेत जगते आहे. विषण्ण झाला शाम आणि आता अंजूला या गर्तेतून बाहेर काढलेच पाहिजे. या निर्णयाप्रत आला.

''तुझे इथले वकील कोण आहेत?''

''ॲड दुधानी!''

''मला त्यांना आज भेटायचे आहे. माझ्या जवळ फक्त १ दिवस आहे. परवा भारतात जावे लागेल. त्यांना फोन कर! तू आणि दुधानी येऊन मला ताजमध्ये भेटा. आज संध्याकाळी!'' शाम.

''हो!'' अंजू.

त्यादिवशी संध्याकाळी ६ वाजता ॲड. दुधानी आणि अंजू ताजमध्ये आले.

''ॲड. दुधानी! यांच्या केसबाबत बोला.''

''फार कॉम्प्लीकेटेड नाही. पण इथला कायदा फार स्ट्रीक्ट आहे. यांच्या निकालाला अजून २ वर्षे तरी लागतील! हे काही अर्जंट मॅटर नाही कोर्टाच्या पद्धतीने!'' दुधानी.

''ओके! आपण जाऊ शकता!'' शाम.

आणि शामने ही केस ह्युमन राईटस् या संस्थेकडे सुपूर्त करण्याचे नक्की

केले. अंजूची छळवणूक होते आहे! तिचे लाईफ बकाल झाले आहे. रोहन श्रीमंत आहे. पैशात लोळतो आहे आणि अंजूची अवस्था भिकाऱ्यासारखी झाली आहे. ती डिप्रेशनमध्ये गेली आहे. तेव्हा कोणा एक्सपर्ट डॉक्टरांना दाखवून तसा रिपोर्ट घ्यायचा आणि 'ह्युमन राईटस्' संस्थेच्या माध्यमातून ह्या केसची तड लावायची असे शामने मनात पक्के ठरवले. त्यांचे लग्न भारतात हिंदू मॅरेज ॲक्टनुसार झाले होते. याबाबत कोर्टात तिच्या वकीलाने कोणतीही बाजू मांडली नव्हती. बस्स! आता ठरले.

''अजूं! तू आज येथेच थांब! उद्या सकाळी आपण इथल्या टॉप डॉक्टरांना भेटू व तसा रिपोर्ट घेऊ. येथेच 'ह्युमन राईटस्'चे ऑफीस आहे. त्यांना ही कैफियत सांगू व रोहन विरोधात दावा दाखल करू. मी अजून दोन दिवस थांबेन!'' शाम.

अंजू आणि शामने तेथेच डिनर घेतले आणि ती त्याच्याच सूटमध्ये थांबली. सकाळी हॉवर्ड हॉस्पिटलला जाऊन इथल्या टॉप सायक्रेटीक यांना भेटून त्याने तसे सर्टिफिकेट घेतले व दुपारी ते पिटिशन फाईल झाले. सकाळी कामे ठरल्याप्रमाणे मार्गी लागली.

शामला भारतात इअर एन्डींग असल्यामुळे खूप काम होते आणि म्हणून तातडीने परतणे भाग पडले. दुसऱ्या दिवशी दुपारचे फ्लाईट होते. शामने अंजूला तिच्या घरी सोडले व सरळ एअर पोर्टवर येऊन हिंदुस्थान गाठले.

पुढच्या १५ दिवसात अंजूची केस बोर्डावर आली आणि ४ दिवस त्यावर आर्ग्युमेंट झाले. हिंदू लॉमुळे तिची बाजू मजबूत केली व कोर्टाने तिचे अपील तिच्या बाजूने निकालात काढली. शिवाय तिच्या खर्चापोटी दोन कोटी डॉलर्स देण्याचे कोर्टाने सांगितले. तेही २ तासात. ती रक्कम कोर्टाकडे जमा करण्याची ऑर्डर देऊन.

अंजूची रोहनच्या जोखडातून सुटका झाली होती. तिने त्याच दिवशी संध्याकाळी शामला याबाबत सांगितले.

''हे बघ! तु तिथेच थांब. मी आठवडाभरात परत लंडनला येत आहे. मग तु माझ्याबरोबरच भारतात परतण्याची तयारी कर!'' शाम.

आज अंजू–शाम यांचे पाय काही जमिनीवर नव्हते. अंजूची आज घुसमटीतून सुटका झाली होती. शामलाही कमालीचा आनंद झाला होता. जिच्यावर आपण जीवापाड प्रेम करतो आहोत ती आज आनंदात आहे. गेल्या अनेक वर्षाने खुल्या वातावरणात श्वास घेत आहे. हे त्याच्या दृष्टीने फार मोठी आनंददायक घटना होती.

पुढच्याच आठवड्यात शाम लंडनला आला आणि ताजमध्ये उतरला. अंजूही तेथे त्याच्या सोबत ४ दिवस होती. शाम हा संयमशील पुरुष होता म्हणून कोणाताही गैरप्रकार त्याच्याकडून घडला नाही. याचे आश्चर्य अंजूला वाटले. त्यामुळे तो अधिकच अंजूला आवडू लागला होता. गेले अनेक दिवस शाम बद्दलचे आपल्या मनातील दरवाजे उघडले होते.

पण अजून तोच 'शाम'. ज्याने आपल्याला पहिले प्रेमपत्र पाठविले होते आणि इतका गदारोळ झाला होता. हे अंजूला अजून पटत नव्हते. तेव्हा ह्या शामचे नावही ती विसरली होती. हा कोणी तरी दुसराच शाम असावा हे तिने मनात ठरवून टाकले होते. मागे त्यांच्यामध्ये या संदर्भात काही गोष्टी शामने व्यक्त केल्या. पण त्यातून अंजूला काहीही समजले नसावे. पण तरीही अंजूच्या मनात काहीतरी वेगळी भावना निर्माण झाली होती एव्हढे मात्र नक्की.

लग्नानंतरचे अंजूचे आयुष्य पुण्यातली ४–५ वर्षे सोडली तर भयानक, क्लेशकारक होते. आपल्या वैऱ्याच्याही वाट्याला असे जगणे येऊ नये असे राहून राहून अंजूला वाटत होते. लग्नाचे सुख तिला कधी मिळालेच नाही. सगळीच ओरबट, राक्षसासारखी एका स्त्रीवर तुटून पडणारी वृत्ती. ही रोजची मरणयात्रा तिला वाटत होती. सगळी श्रीमंती. पण रोहनच्या वागण्याने ती अगदी पार तुटली होती. आपण येथून कोठेतरी पळून जावे. पण तिचा पासपोर्ट रोहनने आपल्या तिजोरीत ठेवला होता. घर तिला तुरुंग वाटत होते. पण मागच्या पुण्यातल्या तिच्या वास्तव्या नंतर पुनः परवड सुरू झाली होती आणि आता शामनेच मोठ्या शिताफीने तिची कायम सुटका केली होती. पण अजून मयुरचा प्रश्न होताच ना! तो तिच्या काळजाचा तुकडा होता आणि आपल्याजवळ तो असावा हा प्रश्न अजून प्रलंबीत होता. तो आता ८–९ वर्षांचा होता. आईच्या सहवासात तो आनंदात होता. पण आता काय परिस्थिती असेल या विचाराने

त्या आईचे काळीज द्रवले होते. तिने फोन केला तरी मयुरला दिला जात नव्हता. लंडनमधून पुण्याला आल्याला आता दीड महिना होऊन गेला होता.

गेल्या दीड महिन्यात शामची भेट झाली नव्हती. तो एकवेळा पुण्याला येऊन गेल्याचे तिला समजले. पण त्याने फोनही केला नाही. वा भेटण्याचा प्रयत्नही केला नाही. अंजूला या गोष्टी अपेक्षित नव्हत्या. येथे येण्यापूर्वी लंडन व युरोप मधल्या ८ दिवसांच्या वास्तव्यात तो किती आनंदात होता. शिवाय सगळ्या मर्यादा त्याने पाळल्या. माझा जराही गैरफायदा घेतला नाही. पण दोन मित्रांसारखा हसत खेळत तो आठवडा गेला आणि अता शामने मला का टाळावे. फोनही नाही केला या सगळ्या गोष्टीचा संभ्रम तिच्या मनात झाला होता. आपणही शामला फोन केला नाही ना त्यानेही. पण आता तिला रहावेना. आणि

''हॅलो! शाम मी अंजू बोलतेय!''

''हो! मीच बोलतोय! कशी आहेस? तुझा वेळ सर्व्हिस सेंटरमध्ये जात असेल. मी एकवेळ पुण्याला आलो पण व्यस्त होतो म्हणून ना भेटलो ना फोन केला. यू टेक केअर!'' शाम.

हा असा काय? बोलतोय यू टेक केअर म्हणजे या पलिकडे याला माझ्याशी बोलण्याची इच्छा नाही का? ती पार चक्रावली गेली होती. आता आपणच त्याला भेटले पाहिजे. म्हणून तिच मुंबईला आली. ती दुपारी अडीच वाजता चेंबूरच्या फॅक्टरीमध्ये आली. तर शाम तिथून नायगावला गेला होता. म्हणजे हा मला कधी भेटणार? शिवाय येथे माझे काही नाही. इथला फ्लॅट बाबांनी माझ्या कझीनला दिला. गेल्या १५ वर्षांत त्याचा संपर्क नाही. कसे भेटावे त्याला? पण दुसरा इलाज नव्हता. शाम कोहिनूर मिलच्या कॉम्प्लेक्समध्ये रहातो. येवढेच तिला माहित होते.

ती रमेशच्या म्हणजे तिच्या भावाच्या घरी आली, जेथे पुर्वी तिचे वडील रहात होते. त्यावेळी संध्याकाळचे ५ वाजले होते. रमेश आणि कुटुंबीयांनी तिचे स्वागत केले.

''आज कसे काय अचानक येणे झाले? तू लंडनला होतीस ना?''

रमेश.

''हो! पण आता पुण्याला आले आहे!'' अंजू.

''आता किती दिवस मुक्काम आहे?''

''असेल २/३ दिवस, कदाचित आज जाईन!'' अंजू.

''काय झाले? तातडीचे काम काढलेस!'' रमेश.

''मी इथल्या मर्सिडीजच्या सर्व्हिस सेंटरच्या शामला भेटायला आले आहे!'' अंजू.

''अरे तोच तो शाम! ज्याने तुला ११ वीला असताना पत्र लिहिले होते. आता तो मोठा कारखानदार झाला आहे. माझा मेहूणाही त्याच कारखान्यात काम करतो!'' रमेश.

''म्हणजे तू त्यांना ओळखतोस?'' अंजू.

''चांगला! खूप चांगला माणूस! गरिबीतून त्याने स्वप्रयत्नाने आयुष्याचे सोने केले. नाव कमावले. येथे कोहिनूर कॉम्प्लेक्समध्ये रहातो एकटाच! खूप मदत करतो लोकांना. चांगले नाव आहे पण लोकात फारसा मिक्स होत नाही. मोठा माणूस!'' रमेश.

''म्हणजे तोच शाम! ज्याने मला पत्र पाठवले होते!'' अंजू.

''हो! तोच! पुण्यालाही त्याचे दोन कारखाने आहेत. एक चेंबूरला आणि एक येथेच नायगावला!'' रमेश.

''त्यांनाच भेटायचे आहे!''

''मग तू थांबणार का येथे?''

''नाही मी निघते!'' अंजू.

आणि अंजू निघून गेली. आज तिच्या मनातला सगळा संभ्रम दूर झाला आहे. आपल्यावर त्याचे प्रेम आहे. त्याच प्रेमापोटी तो मला मदत करीत आहे. पण स्वतःची ओळख तो सांगायला तयार नाही. पण नक्कीच त्याच्या मनात माझ्याबद्दल प्रेम आहे. ओढ आहे. पण हे रहस्य असेच रहावे असे शामला वाटत आहे. आता त्याच्याबद्दल ओढ निर्माण झाली आहे. आता त्याला भेटल्यावाचून पर्याय नाही. मी आजच शामची भेट घेईन. हे तिने मनाशी ठरवून ती शामला

भेटायला गेली.

म्हणून ती कोहिनूर कॉम्प्लेक्समध्ये आली. आत येताच तिने शामची गाडी ओळखली. म्हणजे तो घरीच असणार असा होरा होता. तिने सिक्युरिटीजवळ चौकशी केली. शाम आहेत का?

''हो! शाम साहेब आहेत! आपण कोण?''

''अंजू!''

''बरं मी त्यांना वर्दी देतो!''

''ओके!'' अंजू.

इंटरकॉमवर वॉचमनने शामला अंजू आल्याचे सांगितले. खरेतर ती येथे त्याला भेटायला येईल अशी सुतराम शक्यता नव्हती. ती लिफ्टने १२व्या मजल्यावर आली. बेल वाजताच शामने दरवाजा उघडला.

''अरे! तू अचानत कशी? काही अडचण आहे काय?''

''का? अडचण असल्यावरच यावे?'' अंजू.

''तसे नाही! तू फ्रेश हो! आपण जवळच्या हॉटेलात डिनर घ्यायला जाऊ. चल आलोच!'' शाम.

अंजूने १० मिनिटात फ्रेश होऊन कपडे बदलले. ती व शाम जवळच्याच हॉटेलमध्ये आले.

''काय घेणार?'' शाम.

''तुम्ही घ्याल ते काहीही चालेल मला!'' अंजू.

शामने पाश्चीमात्य पद्धतीचे जेवण मागवले आणि ते येण्यास अजून १५–२० मिनिटे लागणार होती.

''अंजू! आज तू येथेच थांबायचे! मी उद्या पुण्याला जात आहे! आपण बरोबरच जाऊ!'' शाम.

अंजू काहीच बोलली नाही.

''गप्प का? अंजू!'' शाम.

''काही नाही.''

''आयुष्यात अशा अनेक गोष्टी अनपेक्षितपणे घडत असतात. माणसे

भेटत असतात. हा सगळा नियतीचा खेळ आहे!''

''तू कशा संदर्भात बोलतो आहेस?''

''हे बघ! तुम्ही मला पुण्याला भेटलात. माझी लंडनमध्ये झालेली परवड तुम्हाला समजली आणि या तुरुंगातुन तुम्ही माझी सुटका केलीत. मी येथेच सडणार असा माझा ठाम विश्वास होता. तुमचे केवढे उपकार!'' अंजू.

''उपकाराचे काय? मी हे सारे तुझ्या प्रेमापोटी केले!'' शाम.

अंजू गप्पच राहिली म्हणजे याने मला ओळखले आहे. गेल्या २१ वर्षातला हा खडतर वळणा वळणाचा प्रवास होता आणि इतक्या वर्षांनी शाम तिला भेटत होता. डिनर आटोपले आणि ती घरी आली.

शामचा फ्लॅट मोठा प्रशस्त. एका पुऱ्या मजल्याचा. फोर बीएचके, ३,००० स्क्वेअर फीटचा होता.

''अंजू! तुझ्या बेडरूममध्ये तू झोपायचे! वेल फर्निश आहे!'' शाम.

''ओके!''

आता रात्रीचे साडेनऊ वाजले होते. शाम दररोज रात्री ११ वाजेपर्यंत वाचन/लिखाण करीत असे व मगच झोपत असे. तो उद्या पुण्याला निघणार म्हणून खूप काम होते. त्याने लॅपटॉप उघडून कामाला सुरूवात केली. तोवर अंजू सोफ्यावर बसून होती.

''तुला झोप आली असेल तर झोप अंजू!''

''नाही! तसे नाही. तुम्ही तुमचे काम आटपा तोवर मी वाचन करते!''

शामने तिला छानशी बाबा कदम यांची एक कादंबरी दिली आणि अंजू वाचनात बुडून गेली. रात्रीचे ११ वाजले होते.

''अंजू! मी फार काही नाही बोलू शकलो. उद्या निघायचे आहे म्हणून!'' शाम.

''ठिक! आता झोपू या... उद्या गाडीत बोलू!'' अंजू.

सकाळी फ्रेश होईन. पहाटे ५ वाजता ती दोघे पुण्याला निघाली. तो शनिवार होता. रस्त्याला फारसे ट्रॅफिक नव्हते. ते अडीच तासात ते लोणावळ्याला पोहोचले. मग त्यांनी छानपैकी नाष्टा केला आणि पुढचा प्रवास

सुरू झाला. आता एव्हढ्या प्रवासात त्याचे खूप बोलणे झाले. पण मूळ मुद्याला कोणीही हात घालीत नव्हते. एकमेकांकडे पहात त्यांचा प्रवास चालू होता.

''शाम!''

''बोल!''

''आज तू माझ्यापाशी रहायचे. आज मला खूप बोलायचे आहे तुझ्याजवळ. अगदी माझे पूर्ण मन मोकळे करायचे आहे. मला टांग देऊ नको. काय?'' अंजू.

''नाही, बाईसाहेब! शिवाय मला तुझ्या मुलाची मयुरची तेथून सुटका करायची आहे. त्यासाठी प्रयत्नशील आहे. तेही काम महिन्याभरात पूर्ण करायचे आहे. मला तुलाही याबाबत सारे माझे प्लान सांगायचे आहेत. मी गेले महिनाभर यासाठी अनेकांना कामाला लावले आहे. यू शूड नो इट!'' शाम.

पुण्याला आपल्या फॅक्टरीमध्ये जाण्यापूर्वी शामने अंजूला घरी सोडले व रात्री येथे येतो असे सांगितले.

संध्याकाळी ७ वाजता अंजूच्या घरी पोहोचला साडे आठपर्यंत त्यांचे डिनर झाले.

''अंजू! आता पुढची सगळी लढाई तुलाच लढावी लागणार आहे. मी तुझ्यासोबत आहे. काही चिंता नको!'' शाम.

दोघांचे खूपवेळ बोलणे झाले.

''शाम तू मला केव्हापासून ओळखतो आहेस?''

''फार पूर्वीपासून. आपण ११ वीला असल्यापासून! खूप वाट पाहिली तुझी! पण समजले की तुझे लग्न झाले आणि मी ठरविले लग्न करायचे नाही आणि तुझी भेट झाली हा ही एक अपघात होता. केवढा हा वळणावळणाचा खडतर प्रवास! मी जेव्हा मागे वळून पाहतो तेव्हा तो तुझ्यापासून सुरुवात होतो.'' शाम.

''अंजू! माझे तुझ्यावर तेव्हापासून प्रेम आहे आजही. म्हणून मी ही लग्न करण्याचा विचार कधी केला नाही आणि भेट झाली. तुला तुझ्या अडचणीतून सोडवायचे होते...!'' शाम.

असे म्हणत शामने तिचे हात हातात घेतले. हे सर्व अनपेक्षितपणे घडले. तिही क्षणभर चक्रावली. पण मग सावरली. ओके ओके म्हणत तीने तिचे हात सोडवून घेतले. अचानक घडलेल्या या प्रसंगाने ती कमालीची लाजली.

''अंजू! मी उद्या निघणार आहे सकाळीच. पण तुला दोन दिवसाने मुंबईला यावे लागेल. मयुरची कस्टडी मिळवण्यासाठी ॲबॅसेडर लेव्हलवर आपण प्रयत्न करणार आहोत. मयुर तेथे एकटा आहे. एकाकी आहे आणि तू त्याच्यापासून दूर राहू शकत नाहीस.'' शाम.

लंडनचे कॉन्सिलर जनरल शामच्या परिचयाचे होते. त्यांच्या गाड्या नेहमी सर्व्हिसिंगसाठी येत असत. त्यांचे आणि शामचे मयूरबद्दल बोलणे झाले होते व त्यांनी मदत करण्याचे कबूल केले होते. पण रीतसर एक पिटीशन करणे जरूर होते.

''जरूर! तुम्ही सांगाल तेव्हा मी येईन मुंबईला!'' अंजू.

''आधी माझ्याच घरी यायचं! काय?'' शाम.

''आता आपण तसे परके नाही. तेव्हा! जरूर तुमच्याकडेच मुक्काम असेल माझा.'' अंजू.

आज दोघांना एकमेकांची खरी ओळख झाली होती. आता कोणताही आडपडदा नव्हता. मयूरचे मार्गी लागल्यानंतर पाहू! असा विचार शामच्या मनात घोळत होता. जिच्यावर आपण जीवापाड प्रेम करत आलो; ती आता सापडली होती. मने जुळत होती. आता घोडा मैदान फार काही लांब नव्हते.

त्या दिवशी शामला आणि अंजूलाही जराही झोप लागली नव्हती.

शाम सकाळी ७ वाजताच मुंबईला निघाला. अंजू गाडीपर्यंत त्याला सोडायला आली होती. आता त्या दोघांमधले अंतर खूपच कमी होत होते. हा वळणावळणाच्या वाटेचा प्रवास शेवटच्या टप्प्यात होता असे त्याला वाटत होते. पण नियतीचा काही भरोसा नव्हता. ती अजूनही काही वळणे घ्यायला लावील अशीही शंका त्यांच्या मनाला चाटून गेली.

आता त्याचे पाय एकाच वाटेने वाटचाल करू लागले होते. म्हणजे एकमेकांत विसावण्यासाठी दोघांच्याही मनात प्रेमाची भावना तीव्र झाली होती.

पण मयूरचा प्रश्न सुटल्याशिवाय पुढे जाणे ठीक नव्हते. त्यात अनेक कायदेशीर अडचणी येऊ शकतात हे शाम जाणत होता. म्हणून त्याने अंजूला मुंबईला बोलावले व ते दोघे इकडच्या कौन्सिलरकडे गेले. त्यांनी मयूरची कस्टडी मिळावी यासाठी आपले अर्ज व सपोर्टिंग पेपर्स त्यांच्या हवाली केले.

त्यात एक अडचण होती. मयूर हा इंग्लंडचा नागरिक. अंजूचेही नागरिकत्व भारताचे व इंग्लंडचे. मयूरला भारतीय नागरिकत्व मिळणे जरूर होते. अंजूने त्यासाठी मयूरचा पासपोर्ट व तो मायनर असल्याने आणि तिच्यावरच डीपेन्डंट असल्याने त्याची कस्टडी अंजूला मिळावी. तत्पूर्वी मयूरचा भारतीय नागरिकत्वाचा प्रश्न प्रथम मिटावा. असा अर्ज केला. आता सर्व सोपस्कार पूर्ण झाले होते. पेपर्स मार्गी लागले. कॉन्सिलरच्या प्रयत्नामुळे रॉयल फॅमिलीने हे प्रकरण ह्यूमन राईटस्च्या बेसीसवर ॲप्रीशिएट केले व ब्रिटीश सरकारनेच मयूरची कस्टडी अंजूला दिली. त्याला प्लेनमध्ये बसवून मुंबईला पाठवले. सोबत कॉन्सुलेटचा माणूस त्यांनी सुरक्षेसाठी दिला होता.

मुंबई एअरपोर्टवर अंजू आणि शाम हजर होते. मयूर येणार यासाठी दोघेही उत्सुक होते. सकाळी ७ वाजता फ्लाईट आली. कॉन्सुलेटच्या प्रतिनिधीने अंजूच्या ताब्यात मयूरला सोपविले.

''मम्मी''म्हणत मयूर अंजूला चिकटलाच. शामच्या डोळ्यातही आज अश्रू दाटले होते. अंजूची अवस्था काही वेगळी नव्हती. गाय–वासराची भेट. पार सुकला होता मयूर! कशी वागणूक त्याला मिळत असेल याची कल्पना करवत नव्हती. आज आनंदी आनंद झाला होता. त्या दोघांना घेऊन शाम आपल्या घरी आला.

''आता दोघांनीही इथेच रहायचं आहे! हेच तुमचं घर!'' शाम.

अंजूलाही हेच अपेक्षित होतं. अंजू आणि मयूरला आनंदात पाहून एवढ्या वर्षांच्या प्रतिक्षेला आज पूर्ण विराम मिळाला.

त्यानंतर एक आठवडा अंजू व मयुर शामसोबतच रहात होते. घरात आनंदी वातावरण होते. हा आठवडा कसा गेला हे समजलेच नाही.

''मी काय म्हणते आता मला पुण्याला जावे लागेल. मयुरचे नाव

तिथल्या शाळेत घालावे लागेल. आता जून महिन्यात शाळा सुरू होतील.'' अंजू.

''कां! इतकी घाई कां? येथे पण चांगल्या शाळा आहेत. त्याला येथेही घालूयाना शाळेत!'' शाम.

''बरोबर. मी पुण्याला कायम रहायचे ठरवले आहे. सर्व्हिस सेंटरचे काम पहाता येईल!'' अंजू.

''म्हणजे तू माझ्यापासून दूर जाण्याचा का प्रयत्न करते आहेस?'' शाम.

या त्याच्या खोचक बोलण्याने शामच्या मनात काय चालले आहे याचा अंदाज अंजूला आला. एकदा या गोष्टीचा सोक्ष मोक्ष लावणे गरजेचे होते. पण अंजूला वाटले तो आपला उपकार कर्ता आहे. अनेक अडचणीत त्याने मला मदत केली व मला माझ्या मुलाला सोडवले. त्याचा फायदा तो घेऊ शकला असावा. त्याचे आपल्यावर प्रेम आहे. याचा ठोस पुरावा तिच्या जवळ नव्हता. म्हणून याविषयी आताच काही आखाडे बांधणे शक्य नव्हते वा शामजवळ विषय काढायचा नाही. मग काळच ठरवील. त्याचे माझ्यावर प्रेम होते हे खरेच. पण मधल्या १५ वर्षांत काय काय स्थित्यंतरे झाली. तो दुसऱ्या कोणाच्या प्रेमात तर पडला नसेल ना व लग्न न करताच बाहेर ख्यालीपणाच्या मोहात अडकला नसेल ना. शिवाय तो अजून अविवाहीत आहे ते तिच्यासाठी असा एकदा उल्लेख केला होता ते तिला आठवले व सध्याच्या परिस्थितीने आपण थोडे स्वतःला सांभाळावे हे ठिक असे तीने ठरविले. पण शामच्या वागण्यातून तो त्यांच्याकडे ओढला जात आहे हे मात्र तिला जाणवत होते. त्यात ती दोघेही संयमी होती. म्हणून सध्याच्या परिस्थितीत काहीही निर्णय नको असे अंजूला वाटले.

त्यात तिचे सर्व्हिस सेंटर हे पुण्यात. त्याचे व्यवस्थापन गेले सहा महिने तीच करत होती. त्या कारणाने मुंबईला न रहाता पुण्यात स्थायिक होणे तिला सोईचे व प्राप्त परिस्थितीत स्वत:ला शामपासून दूर ठेवण्याच्या दृष्टिने ठीक आहे; हे ती जाणत होती. पण याबाबत शामच्या मनात काय आहे? हे सुद्धा ती चाचपीत होती. पण कोणत्याही निर्णयाप्रत अंजू आली नव्हती. पण शामचा विषय, त्याच्याविषयी वाटणारी ओढ हे सारे तिला भासत होतेच आणि ती

अधिकाधिक शामकडे ओढली जात होती.

मुंबईमध्ये शामकडे आठवडाभराचे तिचे वास्तव्य होते. त्या काळात शामच्या घरातले वातावरण खऱ्या अर्थाने कौटुंबिक होते. घरात गोड धोड होत होते. मयुरही खूष होता. त्याला शामचा लळा लागला होता. अनेक वेळेला तो व अंजू डिनरला बाहेर जात होते. कधी कधी लाँग ड्राईव्हला कोल्हापूरला एक दिवस ती अंबाबाईचे दर्शन घेऊन आली. शामने मुंबईतली सगळी स्थळे त्यात हॅगींग गार्डन, म्हातारीचा बूट, गेट वे ऑफ इंडिया, मत्सालय सारे काही मयूरला दाखविले. परिणामी तोही अधिकाधिक शामच्याजवळ येत होता. पण तरीही शाम व अंजू यांच्या आघाड्या शांत होत्या एवढे खरे.

एक दिवस रात्री अंजूने पुण्याचा विषय काढला आणि शामने दुसऱ्या दिवशी सकाळी पुण्याला जाण्याचा निर्णय घेतला. खरेतर शामला त्या दिवशी नाशिकला जायचे होते. म्हणून अंजूला सोडून तो नाशिकला गेला.

''शाम अरे एक दिवस तरी रहा आमच्याबरोबर!'' अंजू.

पण शामने नकार दिला व कामच अगदी महत्वाचे असे सांगून तो नाशिकला निघाला. खरेतर तसे काही महत्वाचे काम नव्हते. पण सध्याच्या परिस्थितीत अंजूपासून आपण दूर रहावे हे त्याने ठरवले. खरेतर टू बी ऑर नॉट टू बी या अवस्थेत मनाची दोलायमानता त्याला सतावीत होती. म्हणून नाशिकला जाऊन २/३ दिवस निवांतपणे थांबतो. डोक्याचा भार थोडा कमी होईल. खरेतर तो अधिकाधिक अंजूच्या प्रेमात ओढला जात होता. पण ही वेळ ती नव्हती. खऱ्या अर्थाने जेव्हा अंजूचा प्रस्ताव येईल तेव्हाच आपण तो स्विकारावा असे शामला वाटत होते.

पुढचे ३ दिवस तो नाशिकलाच होता. त्याची सगळी खाण्या पिण्याची व्यवस्था तान्या व त्याची पत्नी पहात होती. तान्याचे वयही आता ८० पार करीत होते. त्यांच्या खूप गप्पा व्हायच्या तासन्तास अनेक गोष्टींबद्दल. तान्या, अंजू व शाम यांच्या दोस्तीचे प्रकरण जाणत होता.

''शाम साहेब, तुम्ही लग्न का करीत नाही? असे एकाकी रहाण्यात काही अर्थ नाही. उतार वयात अनेक अडचणींना माणसाला सामना करावा

लागतो, वा धंद्यातील चढउतारात तुम्हाला कोणाची न कोणाची मदत, प्रेमाचा हात हवा असतो. तेव्हा विचार करा तुम्ही आता ४०शी पार करीत आहात. अजून वेळ गेली नाही!'' तान्या.

''दादा! पाहुया तसा विचार आहे पण वेळ आली नाही!''

''काय? वेळ आली नाही? तुम्ही मला सांगा तुमच्या दोघांच्यामध्ये मी मांडवली करतो बोला!'' शाम.

म्हणजे कोणीतरी त्रयस्थ व्यक्ती ही कोंडी फोडू शकते हे शामला जाणवले.

''छान दादा! मीच अंजूला येथे चार दिवस सुट्टीसाठी पाठवतो. तुम्हीच तो विषय काढा आणि जाणून घ्या तिचे मन!'' शाम.

''जरुर! त्या दोघांना येथे पाठवून दे. मग मी हे भांडे फोडण्याचा प्रयत्न करतो. तू निश्चितपणे मुंबईला जा. पण जाताना व्हाया पूणे जा म्हणजे सारे काही मार्गी लागेल!'' तान्या.

''बरं दादा!'' शाम.

शाम नाशिकडून निघाला व तो पुण्यात अंजूकडे यायला निघाला. निघताना त्याने अंजूला फोन केला व आपण येत आहोत याची वर्दी दिली. पुण्याला आल्यावर शामने अंजूला सगळी कल्पना दिली व ४ दिवस नाशिकच्या माझ्या बंगल्यात एन्जॉय करा असे सांगितले. तेथे माझे दादा आहेत. कसलीच चिंता नको हे सांगायला तो विसरला नाही आणि आपली गाडी अंजूसाठी सोडून शाम टॅक्सीने मुंबईला पोहोचला. त्याच्याजवळ अजून २ गाड्या होत्या. त्यामुळे त्याची कसलीही अडचण नव्हती.

दुसऱ्याच दिवशी अंजू व मयुर नाशिकला पोहोचले. गेले सहा महिने तिला आराम माहिती नव्हता. मयुर येथे आल्यावर ती अधिक निश्चिंत झाली. तिलाही थोडा ब्रेक हवा होता. म्हणून अंजू नाशिकला आली. शामचा हा बंगला अत्यंत प्रशस्त, सुंदर व सर्व सोयींनी युक्त होता. खूप आवडला तो तिला. तान्या दादा त्यांच्या दिमतीला होतेच. सारे दिवस आनंदात जात होते.

या काळात अंजू प्रथमच मयुरला सोबत घेऊन साई बाबांच्या दर्शनला

गेली व तेथून परत नाशिकला आली. शामने उघडलेले वृद्धाश्रमही तिने पाहिले. तिथली व्यवस्था छान होती. शामच्या या कल्पना विश्वात ती पूरती हरवून गेली.

आता तर दोनच दिवस झाले होते अंजू नाशिकला येऊन. अंजूचे आणि तान्याचे छान मेतकूट जमले होते. त्याची पत्नी छान स्वयंपाक करायची. शिवाय त्यांच्या दिमतीला दोन स्वयंपाकी होतेच. रोज सकाळी अंजू व मयुर बाहेर फिरायला जात जवळच्या टेकडीवर. तो ५००० क्वेअर फिटचा परिसर शामने विकत घेतला होता. त्यात हा बंगला, वृद्धाश्रम व छान शेती होती. शिवाय एक टेकडीही या परिसरात होती. शामने या वृद्धाश्रमातल्या लोकांना सकाळी फिरता यावे यासाठी रस्ते बांधले, झाडे लावली, सुंदर प्रसन्न परिसर बनविला. या सगळ्यांच्या मेंटेनन्ससाठी आपल्या उत्पन्नातला काही भाग तो खर्च करीत असे. येथे येणाऱ्या वृद्धांना मेडीकल फॅसिलीटी आणि रिक्रियेशन ची व्यवस्था त्याने केली होती, जेणेकरून त्यांच्या मनाला विरंगुळा लाभेल.

एक दिवस रात्री शामचा अंजूला फोन आला. ''मी जर्मनीला बोर्ड ऑफ डायरेक्टरच्या मिटिंगला जात आहे. आठवडाभरात येईन. तोवर तू नाशिकलाच थांब. जर तुला तिथला परिसर आवडला तर!''

''आवडला ना! छान आहे. मी थांबते आठवडाभर. मी आनंदात आहे. तुम्ही केव्हा येणार? येताना प्रथम नाशिकला या. मग आपण पुण्याला जाऊ. मयुरची शाळाही सुरू होणार आहे.'' अंजू.

''ठिक आहे! मी तेथून परतताच नाशिकला येऊ. मग आपण पुण्याला येऊन उरलेली सगळी कामे पूर्ण करू!'' शाम.

इकडे अंजू आणि तान्या कुटुंबाचे छान चालले होते. तान्याला शामची सगळी माहिती होती. अंजूचे प्रेम प्रकरण तान्याला माहित होते. तिचे झालेले लग्न व त्यानंतरची तिची परवड त्याला माहिती होती. एक दिवस संधी साधून तान्याने तो विषय अंजूजवळ काढलाच.

''अंजू बेटा! तुझ्याबद्दल मला सहानुभूती आहे. मी तुझा सगळा भूतकाळ जाणतो. आता तुम्ही सगळ्या अडचणीतून मुक्त झाला आहात. एकटे रहाणे स्त्री वा पुरुषाला जगात अशक्य आहे. त्याला स्थैर्य नाही आणि कोणाला

ना कोणाचा नैतीक आधार असल्याशिवाय या जगात जगता येणार नाही. आता पहा शामने आम्हाला आधार दिला म्हणून आम्ही मजेत आहोत. माझेही दोन मुलगे आहेत पण वाया गेलेत. मग शामलाच माझा मुलगा मानतो. तो भविष्यात काहीतरी भव्य–दिव्य करेल हे मी जाणून होतो. त्याच्या डोळ्यात भविष्याचा वेध घेणारी ताकद मी जाणीत होतो. मी त्याला मदत केली. त्या काळातही निःस्वार्थी बुद्धीने काहीही अपेक्षा न ठेवता. आज तो माझा आधार झाला आहे. तो माझ्याकडे ११वी झाला आणि आला. अडीच रुपये रोजगारावर राब राब राबला. कॉलेज शिकला बी.ए., एम.बी.ए. केले. त्याने लग्न केले नाही तुला माहिती आहे कां?'' तान्या.

''कां?'' बाबा.

''तुझ्यासाठी! हे सारे मला त्याने सांगितले आहे. त्याचे तुझ्यावर निस्सीम प्रेम आहे आजही. म्हणून तर त्याने लग्न केले नाही. कदाचित तू हे जाणत नसशील. तोच शाम, ज्याने तुला पहिले प्रेम पत्र लिहिले होते आणि मग त्याच्या जीवनाची झालेली परवड मी पाहिली आहे! अंजू! आजही तो तुझ्यासाठी झुरतो आहे. परवा येथे आला तर अगदी विषण्ण अवस्थेत. त्याला मी आधार दिला आणि मग शांत होऊन तो पुनः मुंबईला गेला!'' तान्या.

''बाबा! हे सगळे तुम्हाला कसे माहिती?'' अंजू.

''मी त्याचा जन्मदाता नाही पण त्याच्या जीवनाचा शिल्पकार आहे. माझ्यासमोर तो शिकला, वाढला, घडला आहे. अंतरबाह्य मी त्याला ओळखतो! तो खूप हळवा आहे. प्रेमळ आहे. आज त्याला कोणाच्या तरी प्रेमाचा आधार हवा आहे आणि तू ही त्याच अवस्थेतून गेली आहेस. तुम्ही दोघे एकत्र आलात तर सुखी व्हाल अंजू. तेव्हा विचार कर आणि शाम भरकटण्यापूर्वी त्याला आधार दे!'' तान्या.

हे सारे ऐकून अंजू तर भावनावश झाली. पुढे काहीही न बोलता ती आपल्या बेडरूममध्ये गेली आणि ओक्साबोक्सी रडू लागली. तान्याने तो आवाज ओळखला. मग रात्रभर ती जागीच होती. नजरेसमोर होता तो शाम. अरे तो इतकी वर्षे आपल्यावर प्रेम करतोय आणि मी त्याच्याकडे त्रयस्तासारखी पहात आहे. तो किती संयमी आहे. त्याच्या जागेवर दुसरा

असता तर? आणि आता तर ती पूर्णपणे शाममय झाली होती.

शाम येण्याला अजून ३ दिवस बाकी होते. तेव्हा आपण तो येईपर्यंत येथेच थांबावे असे तीने ठरविले. आपण शामचा स्विकार करावा. त्याच्या प्रेमात न्हावून निघावे असे सारखे तिला वाटत होते. आपण शामवर खूप अन्याय केला आहे. त्याचा फक्त वापर करून घेतला. पण त्याला आपण ओळखू शकलो नाही. त्याने तिला खूपच दुःख झाले.

मुंबई एअरपोर्टवर येताच त्याने अंजूला फोन केला व सरळ तो नाशिकला आला. तान्याने येथे येताच सगळा वृत्तांत सांगितला पण आपण तिला काही संशय येईल असे वागायचे नाही हे शामने ठरवले होते. तसा तो काही घडलेच नाही अशा अवस्थेत वावरत होता. अंजू आणि मयुरला घेऊन तो पूणेमार्गे मुंबईला येणार होता. एक–दोन दिवस पुण्याला थांबून मुंबई गाठावी हे त्याने केव्हाच ठरविले होते.

त्या रात्री अंजू, शाम, मयुर, तान्या व त्याची पत्नी यांनी बरोबर डिनर घेतले. आज अंजूमध्ये झालेले बदल शामच्या नजरेतून सुटत नव्हते. त्या रात्री मयुर शामच्या बेडरूममध्ये येऊन झोपला. खूप गप्पा झाल्या दोघांच्या त्या रात्री. पण मग शाम बराच वेळ जागा होता. झोप लागेना म्हणून शांत आपल्या बेडरूममधून बाहेर व्हरांड्यात आला. पहातो तर काय अंजूही बेडरूम बाहेर येरझाऱ्या घालीत होती.

''अरे! अंजू झोपली नाही? वाजले किती पहा!'' शाम.

''नाही येत झोप.''

''असे काय झाले?''

आणि अंजूने पुढे होऊन शामचा हात हातात घेतला आणि तिच्या डोळ्यातून पाण्याच्या धारा लागल्या होत्या.

''अरे! असे काय एकाएकी व्हावे?'' शाम.

''मी जाणू शकले नाही तुला शाम! क्षमा कर मला. तू जीवापाड प्रेम करतोस माझ्यावर. मला जीवनात संकटकाळी देवासारखा उभा राहिलास आणि मी मुर्ख तुला नाही ओळखू शकले. सॉरी!'' अंजू.

''इटस् ऑल राईट! अंजू.

''तू जाऊन शांतपणे झोप. उद्या आपल्याला पुण्याला जायचे आहे. १० वाजता एक मिटिंग आहे ती आटोपून आपण पुण्याला जाऊ!'' शाम.

आणि ती दोघे पुण्याला जायला निघाली. ड्रायव्हरच्या बाजूला मयुर होता व मागे ती दोघे बसली होती. पण कोणीही काहीही बोलत नव्हते. नाशिक–पूणे हा अडीच तासाचा प्रवास सुन्न वाटत होता. शामही रात्रीच्या प्रसंगाने सावरला नव्हता. पण स्वतःला सावरीत होता.

शामला कंपनीमध्ये सोडून गाडी अंजूच्या घरी आली.

निघताना...

''शाम तुम्ही आज माझ्याकडे थांबा, नाही म्हणू नका!'' अंजू.

''ठिक!'' शाम.

सकाळची शामची मिटिंग खूपच लांबली. कंपनीतच त्याने दुपारचा लंच घेतला. त्याने आधी कामाचा सगळा आढावा घेऊन शाम संध्याकाळी ६ वाजता अंजूकडे आला. मयुरने त्याचे स्वागत केले. त्यावेळी अंजू किचनमध्ये होती.

''अंजू!'' शामने अंजूला हाक मारली.

''मी येते. तुम्ही फ्रेश व्हा!'' अंजू.

त्याच्यासाठी ठेवलेल्या बेडरूममध्ये शाम आला. खूपच दमला होता म्हणून तो बेडवर आडवा झाल्या झाल्या त्याला छान झोप लागली. अंगावरचे कपडेही त्याने काढले नव्हते. दोन तास तो झोपून होता. अंजूने त्याच्या बेडरूममध्ये डोकावले. पण त्याला उठवले नाही. तो खूप दमला होता. रात्रीचे ९ वाजून गेले होते. आता खरेतर डिनरची वेळ होती. मयुर केव्हाच जेऊन झोपला होता. अंजू शाम उठेल याची वाट पहात होती. ९ वाजले,१० होत आले. आता मात्र अंजूला रहावेना.

''शाम! उठा! १० वाजले आहेत. जरा जेऊन घेऊ या उठा!'' अंजू.

शामला जाग आली. ताबडतोब कपडे बदलून तो डिनर टेबलवर आला.

''खूप दमलो होतो मी. शिवाय आज कमालीचा स्ट्रेस झाला होता मला.

म्हणून मी झोपलो! सॉरी. तू जेवलीस का?'' शाम.

''नाही! आपण बरोबरच जेऊ'' अंजू.

आज अंजूने खास महाराष्ट्रीयन म्हणजे श्रीखंड पुरी असा मराठमोळा बेत केला होता. शाम छान जेवला. अंजूने सगळी आवरा आवर केली तोवर शाम हॉलमध्येच पेपर वाचत बसला होता.

''अहो! शाम कधी निघताय मुंबईला?''

''उद्या सकाळीच!''

''अजून एखादा दिवस थांबू नाही का शकणार?''

''बघूया! सकाळी ठरवू. कोरोनाच्या जर्मनी, लंडन मधल्या फैलावाने गेले ३ महिने लॉकडाऊन आहे. आमच्या स्पेअर पार्टना उठाव नाही. कंसाईन्टमेंट अजून बंदरात पडली आहेत. याची चिंता मला सतावते आहे. आपला एव्हढा स्टाफ. शिवाय पगार व इतर खर्च यात वाढ होत आहे. मोठ्या चिंतेत आहे मी. मी युरोप-लंडनमध्ये कोरोनाच्या फैलावामुळे जाऊ शकत नाही. फक्त इथली सर्व्हिस सेंटरची युनिट चांगली चालली आहे. कामगारांना अर्धा पगार ही देता येणे शक्य नाही! ''मी हे सारे मनात ठेऊन आहे. कोणाशी बोलणार? काय उपाय?'' शाम.

''मी आहे ना! तू चिंता करू नकोस!'' महिन्या दोन महिन्यात सारे वातावरण निवळेल. आणि आपली कामेही सुरळीत होतील. तुम्ही चिंता करू नका!'' अंजू.

''अशी अहो जाहो! का बोलतेस? सरळ सरळ शाम याच नावाने हाक मार. मला आवडेल!'' शाम.

''मी हे जाणते तुमची आर्थिक कोंडी होणार नाही यासाठी मी उद्याच माझी पाच कोटीची एफ. डी. मोडून तुम्हाला देते. सगळी देणी भागवा!'' अंजू.

अंजूचे हे उद्गार शामला बरेच काही सांगून गेले.

''आताच घाई नको. अजून मी माझ्या परिने सगळा मामला मिटवतो. तू चिंता करू नको. अशा अडचणींना तोंड द्यायला मी सक्षम आहे. मी माझ्याही एफ. डी. मोडू शकतो. तू माझ्यासाठी एवढा त्याग करायला तयार झालीस

त्यातच सगळे आले!'' शाम.

''आणि तुम्ही! माझ्यासाठी काय काय केलेत? कोण करील हे एका त्रयस्थ स्त्री साठी?'' अंजू.

''अंजू! मी हे जे काय केले ते माझ्या तुझ्यावरील निस्सीम प्रेमापोटी. गेली २५ वर्षे तुझ्यावर माझे प्रेम आहे. तुच माझी मनोदेवता, स्फूर्ती देवता आहेस. आज जो मी आहे तो तुझ्याचमुळे. तू जगाच्या पाठीवर कोठेही आनंदात रहावी हीच माझी इच्छा होती. त्यासाठी थोडेस केले. तुझे जर माझ्याशी लग्न झाले असते तर? अंजू तोच मी शाम ज्याने तुला पत्र लिहिले होते. ते प्रेमपत्रच होते. प्रेमापोटी मी लिहिलेले. तेव्हापासून आजही माझे तुझ्यावर प्रेम आहे. मी हे व्यक्त करू शकलो नाही. ही वळणावळणाची वाट मी जी आजवर तुडवीत आलो. अंजू ही तुझ्यासाठी, तुझ्या प्रेमापायी. यात शारीरिक आकर्षण नव्हते. काळजात घर करून बसलीस तू आजवर आणि आताही तसुभर कमी झाले नाही! अंजू!'' शाम.

आणि हे भरल्या डोळ्यांनी अंजू म्हणत होती. आपण नाही ओळखू शकलो शामला. माझ्यामागे धावणाऱ्या माझ्या शामला! आता मला प्रेमाची किंमत कळते आहे. तिच्या डोळ्यातून वहाणाऱ्या अश्रूतून तिचा सारा अहंकार ताठा पार विरघळून गेला होता. आज ती पूर्ण भावनावश झाली होती आणि शामही.

अंजूने त्याचे हात हातात घेतले. चूंबन घेतले आणि त्याच्या कुशीत शिरली ती...

आज दोन प्रेमिकांचे मनोमिलन झाले होते. पण त्यासाठी २० वर्षांचा काळ जावा? हा त्यांचा वळणावळणाचा प्रवासच त्यांना येथवर घेऊन आला.

मग बराच वेळ ती त्याच अवस्थेत होती.

''अंजू! खूप रात्र झाली आहे. तू जाऊन तुझ्या बेडरूममध्ये झोप मयुरजवळ. तो एकटाच आहे.''

म्हणत तो ही उठला. ही प्रेमाची मिठी अशीच रहावी असे दोघांनाही वाटत होते. दोघांनाही आज पडलेला संयम शामला मोडायचा नव्हता.

ते दोघे गेले आपापल्या बेडरूममध्ये. पण रात्रभर त्यांचा डोळ्याला डोळा लागला नाही. बालपणापासूनचे सगळे प्रसंग डोळ्यासमोर चितारले जात होते आणि केव्हा तरी सकाळी डोळ्याला डोळा लागला.

शाळेत येता-जातानाचा रस्ता एकच. तिला तो पहायचा, आवडली होती आणि तो तिच्या प्रेमात पडला आणि आजही ते प्रेम तसुभरही कमी झाले नव्हते. ती त्याची स्फूर्थी देवताही होती.

शामला मुंबईला जायचे होते. गेल्या दोन महिन्यात सगळ्या धंद्याची वाट लागली होती. त्याच्या नव्हे तर अख्ख्या जगाच्या. त्याची बँक डायरेक्टर बरोबर मिटिंग होती. कर्जाचे हप्ते तुंबले होते. हा कोरोना असाच जगात धिंगाणा घालत बसला तर? या विचारांनी शामची झोपच पार उडाली.

तो उठला, आंघोळ आटोपली आणि बाहेर आला, पण तत्पूर्वी अंजू उठली होती. तिने शाम जाणार म्हणून चहा, नाष्टा केलाच पण दुपारचा डबाही सोबत दिला.

''मी येऊ का तुझ्याबरोबर. हे ओझे मलाही शेअर करू दे!'' अंजू.

''नको! तू येथल्या फॅक्टरीचे काम पहा. मी दोन दिवसात परत येईन वा तुझी गरज पडली तर तुला मुंबईला बोलविन. मयुरला येथे एकट्याला सोडून तुला येणे शक्य होणार नाही!'' शाम.

शाम निघाला मुंबईला. इकडे अंजूचे आणि त्याचे मन एक होत होते. तर एवढा प्रचंड उभा केलेला डोलारा कसा पेलणार? असा अनुभव पूर्वी त्याला आला नव्हता. ही परिक्षाच होती शामची. तो तसा धीराचा होता. पण एकदम येणाऱ्या संकटांना तो कधी सामोरा गेला नव्हता. आज खऱ्या अर्थाने त्याची परिक्षा होती. पण अंजूचा आधार लाभला या वळणावर. त्यामुळे तो सावरला होता. त्याने या सगळ्या संकटांना सामोरे जाण्याची मनाची तयारी केली होती. त्यासाठी तो भारतातल्या बजाज, टाटा या कंपन्यांबरोबर चर्चा करून त्यांना त्यांच्या गाड्यांचे स्पेअर पार्ट द्यायला तयार झाला होता. पण ही गाडी रुळावर यायला २/३ महिन्यांचा अवधी लागणार होता. तोवर कोणाची तरी साथ हवी होती. माणसाला सगळी नाटके करता येतात. पण पैशाचे नाही. हे तो जाणून

होता. अर्थात हे जागतिक संकट आज ना उद्या निपटेल याची त्याला खात्री होती.

एक खूप चांगली गोष्ट घडली. भारत सरकारने बँकाना या परिस्थितीत संयमाने घ्यायला सांगितले. त्यामुळे हप्त्याच्या रक्कमेच्या वसुलीचा बडगा न लावता संयमाने बँका घेत होत्या. हा धंद्यातला लॉस आज फारसा नव्हता. पण इन्कमटॅक्स भरायलाही बँकेत पैसे नव्हते. शामने त्याच्या कर सल्लागाराबरोबर चर्चा केली व चेंबूरचे एक युनीट विक्रीस काढले. निवीदा मागविल्या. पण...

टाटा ऑटोमोबाईल कंपनीने पुढे येऊन मदतीचा हात दिला. शामला ते युनीट विकू दिले नाही. उलट पैशाची मदत केली. एकएक अडचण निपटत होती. शामचे टेन्शन हळूहळू कमी होत गेले. त्याने टाटांच्या गाड्याचे पार्टस बनवून देण्यास सुरूवात केली आणि पैशाची आवक वाढली. आज सगळी चक्रे सुरळीत चालत आहेत. म्हणून शाम सुखावला. टेन्शन संपत आले.

अंजू आणि मयुरला शामने आपल्या घरी बोलावून घेतले मुंबईला. अजून अंजूशी लग्न करावे व आपण गृहस्थी बनावे ही मनाची तयारी शामची झाली नव्हती. अंजूची भेट झाली. तिची मैत्री झाली यातच त्याला समाधान होते. ज्या आपल्या स्फूर्ती देवतेने आपल्याला प्रगतीचा मार्ग दाखविला, मोठे भव्य-दिव्य यश संपादन करण्याची स्फूर्ती आज आपल्याबरोबर आहे. नजरेसमोर आहे. यातच तो समाधानी होता. गेल्या १० वर्षांत त्याला सुखाच्या अनेक संधी आल्या. पण त्याने आपला निर्धार सोडला नाही. तिच्यावरील प्रेमाला तो इमाने-इतबारे निभावत आला. येवढ्या वळणावळणाच्या प्रवासात जे घडत गेले, हे सुद्धा एखाद्या स्वप्नासारखे होते. हे शाम जाणून होता.

आता अंजू आणि मयूर मुंबईला आले होते. शामने मयूरचे नाव डॉन-बॉस्को या शाळेत घातले. त्याचा पालक म्हणून अंजू आणि त्याचे नाव घातले. हे पाहून अंजूही सुखावली. तिच्या मनात शाम बद्दलचे प्रेम आता वेगाने पुढे जात होते. आपल्या बरोबर शाम लग्न करेल का? की असाच ठेवेल आम्हाला उपकाराच्या ओझ्याखाली? असा विचार अंजू करत होती.

आता बहुतेक वेळा अंजू मुंबईलाच असायची. तर शाम पुण्याला जाऊन सगळी कामे करत होता. मयूर अजून लहान होता. ना-समझ होता. त्यामुळे

त्याला एकटे ठेवणे शक्य नव्हते. अंजूची येथे फारशी ओळख नव्हती. तिला जेवण, घरकाम व मुलाला सांभाळण्यासाठी बाई हवी होती. ती तिच्या शोधात होती.

एक दिवस तिला तिचा चुलत भाऊ भेटला. तो तिच्या बाबांच्या घरात रहात होता. त्याच्याजवळ तिने हा विषय काढला. मी शामबरोबर रहाते हेही सांगीतले. तोही उडालाच. लहानपणी अंजू ११वी ला असताना, शामच्या पत्राने केलेल्या गहजबीचा तो साक्षीदार होता. त्यानेच शामला दम दिला होता. ''माझ्या बहिणीकडे ढुंकूनही बघायचे नाही.'' शामनेसुद्धा तिच्या मागे लागणे सोडले. पण ते त्याचे पहिले प्रेम तसे पुसून टाकता येणार नव्हते. काळजात रूतुन बसलेले प्रेम शामने जपून ठेवले आजवर. तिच्या भावाला अप्रुप वाटले नाही, असे कसे होईल?

त्याच्या शेजारच्या एका गरीब आजीला त्याने त्यांच्याकडे पाठवले. पण स्वत: शामच्या घरी कधीच गेला नाही. एव्हढे मात्र खरे. कारण शामला तो ओळखत होता.

आजी आल्यावर अंजूला घर आवरायला, जेवणासाठी, मयूरला सांभाळायला मदत होत होती. पण अंजू ओव्हरनाईट कोठेच जात नव्हती. तसे असेल तर जाताना मयूरला सोबत घेऊन जात असे.

शाम मात्र दिवसभर नायगाव, चेंबुरचे काम पहायचा. त्याचे ऑफीसही भोईवाड्यात होते. त्यामुळे दुपारी शाम जेवायला घरी यायचा.

आता जागतिक बाजारपेठेचे काम सुरू झाले होते. त्याची सगळी कन्साईनमेंटस् रवाना झाली होती, त्या त्या देशातून पैसे आले. लोनचे हप्ते फिटले. वातावरण आता पूर्णपणे निवळले होते. शामची चारही युनिटस् पूर्ण क्षमतेने चालू होती.

आज मयूरचा वाढदिवस होता. शामने खूप थाटामाटात साजरा केला. शामने त्याच्यासाठी आपल्या पसंतीने हिऱ्याचे लॉकेट आणले होते. खूप आवडले ते मयूरला. त्याने शामला मिठी मारली. आजकाल मयूरची आणि शामची दोस्ती खूप जमली होती. शाम आपल्या मुलाप्रमाणे त्याला जपत होता.

लाड पुरवत होता. आता तर गेले वर्षभर येथल्या वास्तव्यात वडिलांचे प्रेम त्याच्या वाट्याला आले होते.

आता अंजूही आपल्या मुलाबद्दल निश्चिंत होती. आज शामने मयूरला आपला मुलगा म्हणून स्वीकारले आहे. पण आपले काय? तिचा जीव आजकाल शामसाठी घुसमटत होता. तिच्याही मनामध्ये प्रेमाचा पाझर फुटला होता. सदान्‌कदा ती शामचाच विचार करत रहायची. पण नैय्या किनाऱ्याला लागत नव्हती.

शामने अंजूसाठी नवीकोरी मर्सिडीज बेंझ गाडी विकत घेतली होती. खूप आवडली तिला ती. पण हा सगळा मटेरियल मामला होता. मनाचा नव्हता.

गेले दोन दिवस शाम पुण्यालाच होता. मार्च महिना जवळ आला होता. ऑडिट चालू होते. ते संपताच तो मुंबईला परतला. जयंत मेहता हा शामचा मित्र आणि सी.ए. होता. कोरोनाच्या अडचणीत शामला त्यानेच मदत केली होती. आज सगळे व्यवस्थित पार पडले. शाम एकदम रिलॅक्स होता. दुपारी तो जेवायला घरी आला तेव्हा मयूर जेवला होता. पण अंजू मात्र जेवायची थांबली होती.

''चला आपण जेवायला बसू या!''

''अरे, अंजू! तू अजून जेवली नाहीस?''

''नाही! तूम्ही आल्यानंतर जेवीन म्हणाले.''

''का?''

''मला वाटलं आपण बरोबरंच जेऊ.''

''आणि मी आलोच नसतो आत्ता तर?''

''मी थांबले असते.''

''काय वेडी आहेस तू! आम्ही बाहेर काही ना काहीतरी खातो. तुला उपाशी रहाण्याचे कारण नाही.'' शाम.

अंजू गप्पच होती. मग दोघे जेवायला बसले. जेवण आटोपले.

''या वीक एन्डला मी पुण्याला जाईन म्हणते!'' अंजू.

''अरे हो! मी पण जाणार आहे शुक्रवारी. आपण बरोबरच जाऊ.

मयूरलाही बरोबर नेऊ या. त्यालाही बरं वाटेल.'' शाम.

''हो! जरूर.''अंजू.

सकाळी लवकर निघून ते ९.३० वाजता पुण्यात पोहोचले. अंजूला सर्व्हिस सेंटला सोडून शाम आपल्या फॅक्टरीत पोहोचला. सारे काही सुरळीत चालले असेल असा त्याचा अंदाज होता. पण मॅनेजर रजेवर. माल अस्ताव्यस्त पडलेला. एक्सपोर्टचा माल अजून पॅक झाला नव्हता. सगळाच सावळा गोंधळ. गेल्या पंधरा दिवसात शाम पुण्याला फिरकला नव्हता.

शाम कमालीचा भडकला.

मी फॅक्टरी बंद करीन! उपाशी मराल! मी दुसरी माणसे ठेवीन. मला ठरलेले प्रॉडक्शन हवे आहे. एक्सपोर्टचा माल वेळेवर गेला पाहिजे. यात हलगर्जीपणा नको! शाम.

त्याने प्रॉडक्शन मॅनेजरला कामावरून काढून टाकले. कामाला नीट सुरूवात झाल्यावरच फॅक्टरीमधून घरी निघाला. रात्रीचे ८ वाजायला आले होते.

''अंजू! आज आपण ताजमध्येच डिनर घेऊ! कसे! शाम.

''नको! मी डिनरची सगळी तयारी केली आहे.'' अंजू.

मग त्यांनी जेऊन घेतले. पण शामच्या डोक्यातून कारखान्यातला गोंधळ काही जाईना. काय उपाय करावा? या विचारात रात्री त्याला झोप कधी लागली, हे कळले नाही. आज शामचे डोके ठणकत होते. असे तो म्हणाला.

''मी बाम लावते. तुम्ही झोपा.''

शामच्या डोक्याला बाम लावता लावता,

''हे तुमचे काय चालले आहे?''

''काही नाही!'' म्हणत अंजूने त्याच्या छातीवर आपले डोके ठेवले.

शामला हे अपेक्षित नव्हते. पण त्यानेही विरोध केला नाही आणि शामने तिला थोपटत आश्वस्थ केले. शाम काय समजायचे ते समजला....

''अंजू तुझ्या मनात काय आहे?''

ती काहीच बोलत नव्हती. पण डोळ्यातून वहाणाऱ्या अश्रूंनी मनाची

कवाडे कधीच उघडली होती.

''आपण उद्या बोलू. तू आता झोप! शाम.

हो!

सकाळी चहा नाष्टा झाला.

''अंजू! मी काल अस्वस्थ होतो. इथल्या फॅक्टरीच्या कामात घोळ झाला आहे. आपण मुंबईत राहिलो तर पुरती वाट लागेल. कोणीतरी ही जबाबदारी सांभाळायला हवी. मला विश्वासू माणसाची गरज आहे. अंजू! तू ही जबाबदारी सांभाळशील?'' शाम.

''हो! जरूर.''

शामला हायसे वाटले. अंजूला वाटले की, शाम लग्नाचा विषय काढेल. पण तसे झाले नाही. तरी दोघंही त्याबाबत चर्चा करत होती.

''अरे हो! मी पार विसरलो! काल तू खूपच अस्वस्थ होतीस. मला सारे समजले. या महिनाभरात आपण तेही उरकून घेऊ! उगाच गाजावाजा नको. शाम.

''मीही तेच म्हणणार होते.'' अंजू

''ओ के!''

त्यांनी नोंदणी पद्धतीने हा लग्नाचा बार उडविण्याचे ठरविले आणि त्यासाठी मॅरेज रजिस्ट्रेशनच्या ऑफिसमध्ये नोंद केली. त्यांना ताबडतोबची तारीख मिळाली आणि लग्न साकार झाले अगदी आनंदात. मयुरलाही आनंद झाला.

''पण त्यानंतर तूला इथेच थांबावे लागेल. आहे ना तयारी? मी अप–डाऊन करत राहिन. मयूरला आपण आजी जवळ ठेऊ. सारे ठीक होईल.'' शाम.

''चालेल!'' अंजू.

''अंजू! मी म्हणतो, आपण रजिस्टर मॅरेज करू या. उगाच गाजावाजा नको. चालेल?'' शाम.

होय! मीही तेच म्हणणार होते. अंजू.

म्हणजे अंजूच्याही मनात लग्न करावे असे होते तर. हे शामला समजले. गेले वर्षभर शामला कोठेच बाहेर जाता आले नव्हते. तेव्हा लग्नानंतर त्याने उटीला जाण्याचे नक्की केले. थंडीचे दिवस होते. वातावरणही थंड होते. म्हणून शामने ही जागा निवडली. आज कित्येक वर्षांनी मनातली.

दुसऱ्या दिवशी त्या दोघांना मुंबईतील बांद्रा ऑफिसमध्ये रजिस्टर मॅरेज यांच्याकडे नोंदणी केली व मग पुढचा कार्यक्रमही ठरवून टाकला. ठरलेल्या तारखेला लग्नाचा बार उडाला आणि ती दोघे फ्लाईटने उटीला पोहोचली. तिथल्या वातावरणात शाम–अंजू सारे शिण विसरून गेली. दोन रात्री उटीला सगळा आनंद त्यांनी अनुभवला.

त्याच संध्याकाळी मुंबईहून शामच्या मॅनेजरचा फोन आला.

''सर! आपल्या फॅक्टरीमध्ये एक्साईज डिपार्टमेंटची रेड झाली आहे. त्यांना तुमचे स्टेटमेंट घ्यायचे आहे. काय करू?'' मॅनेजर.

''आम्ही उद्या परततो आहोत. एअर पोर्टला गाडी पाठव!'' शाम.

त्या दोघांचेही कशातच मन नव्हते. सकाळीच ते दोघे एअर पोर्टला आले आणि सकाळी ३ वाजता मुंबई एअर पोर्टवर ती दोघे आली.

त्यांच्या मॅनेजरने एअर पोर्टला गाडी पाठवली होती. शाम अंजूला घरी सोडून फॅक्टरीमध्ये गेला. त्याला सगळ्या गोष्टी झाल्याचे समजले. कोणताही गैरप्रकार नाही सापडला. पण पुण्याच्या फॅक्टरीमध्ये मोठा घोळ होता. शामने पोलीसात तक्रार केली. त्या मॅनेजरला पोलिसांनी पकडले. त्याने आपला गुन्हा कबूल केला. झालेते चांगले झाले. असे शामला वाटले. ४० लाखांचे मटेरियल चोरीला गेले होते. आता शामला समजले. येथे योग्य माणसाची नेमणूक करण्याची जरूरी आहे.

आणि त्याचदिवशी शामने अंजूची मॅनेजींग डायरेक्टर म्हणून नेमणूक करून तिला पुण्याला पाठवून दिले. मुंबईच्या फॅक्टरीचे काम तो स्वतः पहात होता आणि मुंबई पूणे अप–डाऊन करीत होता.

हनीमुनच्या अडथळ्याने शाम खूप दुःखी झाला. आपण अंजूला काहीही सुख दिले नाही. याचे त्याला दुःख झाले. सारे सुरळीत व्हायला दोन महिने गेले.

शाम अंजू यांच्या प्रपंचाची गाडी आता रुळावर येऊ लागली होती.

अंजू सध्या पुण्यातच रहात होती व मयुर आणि शाम शुक्रवार–रविवार पुण्यात येत होते. पुण्याच्या कारखान्याची व्यवस्था अंजूने छान लावली होती. ती स्वतः अनुभवी असल्याने तिला हे काम अगदी सहजरित्या करता आले. आज त्यामुळे अंजूने एक बाजू सांभाळून शामला मदत केली आहे. सारे काही सुरळीत चालले होते. शाम अंजूच्या प्रपंचाला आता चार चाँद लाभले होते.

पण नव्हती संपली ही वळणावळणाची वाट, अडचणींचा पाढाच घेऊन ती दोघं उभी राहिली.

अंजूला दिवस गेले आणि महिनाभरात तिचे ॲबॉर्शन झाले. साऱ्या उत्साह, आनंदावर पाणी फेरले. डॉक्टरांच्या विधानात बरेच काही माहिती पडले जे भयानक होते. अंजूच्या गर्भाशयात कॅन्सरच्या गाठी होत्या. त्या काढून टाकण्यात आल्या. ती घरी आली. आता आपण कोठे सावरतो आहोत आणि या नव्या संकटाना तोंड द्यावे लागेल असे ध्यानी–मनीही नव्हते शामच्या.

अंजूचे गर्भाशय काढून टाकण्यात आले व टाटामध्ये पुढची ट्रिटमेंट सुरू झाली. केमोने अंजूचा चेहरा–मोहरा बदलला. प्रचंड अशक्तपणा, वेदना याने तिला सामोरे जावे लागले. शामची पूर्ण कोंडी होत होती. तेव्हा कारखान्याची कामे, हातात योग्य जबाबदार व्यक्तीची वानवा, सतत पूणे–मुंबईचा प्रवास. जेवणाचे हाल आणि बाहेर कोरोनाचे थैमान. अशा अवस्थेत कोणीतरी आपल्याला आश्वस्त करावे असे शामला वाटे. आज अंजूशिवाय जीवाभावाचे कोणी नव्हते आणि ती तर लढत होती भयानक रोगासोबत.

याचसाठी अंजू पुनः भेटली का आपल्याला? लग्नाचा घाट घातला. प्रपंच्याच्या पत्रावळ्या लावल्या आणि घासभर अन्न खाली उतरेना. शामची तब्बेतही दिवसेंदिवस खालावत होती. त्याच्या डोक्याला जाराही आराम नव्हता. चिंतेने त्याला ग्रासले होते. आपण काय करावे? हेच मुळी शामला समजत नव्हते.

एक दिवस अंजूने शामला बोलावले...

''शाम या आजारपणातून मी बरी होईन वा होणारही नाही. पण तू मात्र

मयुर ही माझी अनामत जी तू तुझा मुलगा म्हणून स्विकारली आहेस त्याची काळजी घे.'' अंजू.

आज या तिच्या बोलण्याने शामही हबकला. हा काय वेडाचार आहे. ही असे का बोलत आहे. याचा उलगडा मात्र शामला होत नव्हता. शामला दुःख अनावर झाले आणि त्याच्या डोळ्यातून अश्रूंची धार लागली. त्याने अंजूला जवळ घेतले आणि तिला आश्वस्त केले.

''तू काही चिंता करू नकोस असे काही घडणारच नाही.'' शाम.

एक दिवस अंजूने शामला हॉस्पिटलमध्ये बोलावून घेतले......

''शाम आता मला माझा भरोसा वाटत नाही. दररोज माझी तब्येत खालावत चालली आहे. आता अन्नपाणीही जाणे बंद झाले आहे. आणि या अशा अवस्थेत माझ्या मनावर प्रचंड ताण आहे. मला चिंता आहे ती मयुरची..... त्याचे वडील म्हणून तुम्ही त्याची काळजी घ्यालच एक आपला मुलगा म्हणून त्याबद्दल मला जराही शंका नाही.'' अंजू.

हे तिचे बोल ऐकल्यावर अंजूच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा लागल्या आणि शामच्याही. त्याने तिचे दोन्ही हात आपल्या हातात घेऊन याबाबत तिला अश्वस्त केले.

''तू जराही चिंता करू नकोस. मयूर लहान आहे. मी त्याला माझ्या जीवा पलिकडे सांभाळीन वडीलांचे प्रेम देईन.'' शाम.

अंजूच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहतच होत्या. आणि त्यातच तिने डोळे मिटले. मयुर पोरका झाला. तो अजून लहान होता. त्याला सांभाळणे ही जबाबदारी शामवर येऊन पडली आणि शामने स्वतःला सावरीत कारखाने व इतर जबाबदाऱ्या मनापासून स्विकारल्या. पण अंजूच्या आठवणीत तो घायाळ होई.

कधी कधी तो सुन्न मनाने तासन्तास, एकांतात बेड रूमचे दरवाजे लाऊन विचार करीत बसे. पण मध्येच मयुर येऊन त्याची ही चेन तोडायचा. हजार गोष्टी त्याला लागायच्या. जराही उसंत नसायची त्याला. त्यात अभ्यासातल्या अडचणी होत्याच पण त्याला चेस, ल्युडो खेळायला आवडायचे

आणि तो येऊन शामला जराही एकांत देत नसे.

जेव्हा शाम एकटा विचार करीत बसे त्यावेळी आपल्या धंद्यापेक्षा अंजूच्याच आठवणी, त्यांच्या भावनाना चालना देत आणि रात्री तासन्तास तो जागा राही. अनेकदा त्याला प्रश्न पडे. ती तेव्हा पडलीच का माझ्या नजरेला? अनेक मुली वर्गात होत्या. पण अंजू खेरीज कोणीही त्याच्या मनात घर करू शकली नाही. काय असे विशेष होते तीच्यात? ती सुंदर होती. इतरही मुली सुंदर होत्या. पण प्रेमाची गोष्टच वेगळी होती. ''सुंदरा मनामध्ये भरली'' अशी त्याची अवस्था झाली होती. ती गोष्टच त्यावेळी वेगळी होती. तो कधी कधी विचार करी अंजू शाळेनंतर त्याला भेटलीच नाही आणि उगवली ती एकदम तिच्या मर्सिडीज सर्व्हिस सेंटरमध्ये. काय हा योगायोग म्हणायचा की काय? ''

ती त्याला पुण्याला भेटली. हीच मुळी सुखकारक गोष्ट त्याला वाटली. जगाच्या पाठीवर ती कोठेही असो सुखी असावी हीच भावना सतत त्याच्या मनात असे. ती भेटली हा योगायोगच म्हणायचा आणि नंतर तिला आलेल्या अडचणी, त्यात शामची मदत, तिची त्या तुरुंगातून सुटका, मयुरचे परत येणे, शामचे लग्न. सारे का घडले याचाच विचार तो करीत होता. त्याने अंजूला प्रेमापोटी मदत केली. ही तिच्या उपभोगाच्या अभिलाषेपोटी नाही. हे सारे अगदी नैसर्गिक होते. त्याचे कारण त्याचे अंजूवर जडलेले निस्सीम प्रेम. बस्स दुसरा त्याचा काही उद्देश त्यामागे नव्हता. अंजू त्याच्या सहवासात आल्यावर अनेक संधी शामपुढे आल्या. पण त्या सत्वशिल पुरुषातला राक्षस कधीच जागा झाला नाही. का? याचा प्रश्नही बऱ्याच वेळा अंजूला पडे. एक उपकारकर्ता ही भावना तिच्या मनात होती आणि सहवासातून त्याच्या चांगूलपणातून अंजू त्याच्याकडे ओढली जात होती. एव्हढे मात्र खरे.

घरी मयुरला बघणाऱ्या आजीलाही आता वय परत्वे काम होत नव्हते. त्यामुळे शामची जबाबदारी वाढली. त्याने दोघांसाठी खाणावळीतून डबा मागवायला सुरूवात केली. पण त्यात प्रेम नव्हते, ना अंजूच्या आठवणी. शामला वाटे आता पुढचे अख्खे आयुष्य असेच वाळवंटातल्यासारखे बेचव काढायचे का? का अंजूने संसाराचा घाट घालावा. का अनावधनाने शाम यात ओढला गेला न कळत संसारात. कधी ऊन, कधी पाऊस, थंडी असा हा

वळणावळणाचा प्रपंचाचा नव्हे तर संपूर्ण आयुष्याचा प्रवास. आठवून त्याचे डोके सुन्न होई आणि अजून काय वाढून ठेवले आहे पुढे? या कल्पनांनी त्याचे मन कासावीस होई.

त्याच नाशिकला तान्या दादा आणि त्यांची पत्नी यांचे वृद्धापकाळाने देहावसान झाले. तिकडची बाजू उजाड झाली असे शामला वाटले. तिथले व्यवस्थापन कसे चालले आहे हे शामला समजेना. कारण बरेच महिने अंजूच्या आजारानंतर तो तिकडे फिरकलाच नाही. आता त्या बंगल्याची झाडलोटही कोणी करीत नव्हते. बागेतली झाडे ही सुकू लागली होती.

आणि एका शुक्रवारी सकाळी मयुरला घेऊन शाम नाशिकला आला. वृद्धाश्रम पूर्णपणे भरला होता. व्यवस्थापनात शिथिलता आली होती. शाम पैसे पाठवित होता पण त्याचा उपयोग नीट होतो का याची शंका शामला होती.

एकदा या वृद्धाश्रमातल्या लोकांना आपण भेटावे, त्यांची सुख–दुःखे जाणून घ्यावी. त्यांचा परिचय करून घ्यावा. त्यांच्या कुटुंबियांविषयी जाणून घ्यावे. त्यांना अजून काही सुविधा हव्यात का हे पहावे. यासाठी एका संध्याकाळी त्या वृद्धाश्रमाच्या बाजूला असलेल्या आपल्या बंगल्यात सर्वांना येण्याची विनंती केली आणि त्यांच्यासाठी बंगल्याच्या गार्डनवर गोलाकार खुर्च्या लावल्या. चहा, नाष्टा झाला आणि प्रत्येकाला आपल्याविषयी, आपल्या कुटुंबाविषयी, आपण येते या वृद्धामश्रमाच्या आसऱ्याला का आलो ही माहिती एक एक जण देत होता. त्यांच्या जीवनाची, दुःखाची, व्यवसायाची कल्पना प्रथमच शाम अनुभवित होता आणि सद्‌गदीत अंतकरणाने शाम ते सारे ऐकत होता. त्याच्या शेजारीच मयुरही बसला होता. त्याला यात काही स्वारस्य नव्हते. आपल्या बेडरूममध्ये जाऊन विडिओ गेम तो खेळत होता.

अडीच तास हा सगळा सोहळा चालू होता. तिथल्या लोकांना हा प्रकार अनपेक्षित होता आणि शामही शांतपणे ती त्यांची कर्मकहाणी ऐकत होता आणि मध्येमध्ये आपल्या जीवनातला नागमोडी वळणाचा प्रवासही तो अनुभवीत होता. त्यात कष्टाचे क्षण काही अल्हादकारक, प्रेमाचे क्षण, व्यवसायात स्थिर होतानाची कल्पकता, अनेकांनी दिलेला हात, अंजूचे प्रेम, प्रपंचाचा पुसटसा अनुभव, मयुरने दिलेली प्रेमाची साखळी या साऱ्या कडू–आंबट अनुभवातून

शाम बरेच काही शिकला. मग हा सरळ रस्ता का नसावा. वाकडी वळणेच का घ्यावीत या जीवन व्यवहारात.

एक एक करून सगळे जण आपापली कैफीयत मांडीत होते. जीवनाच्या अनेक अंगाना स्पर्श करणारी ही कर्म कहाणी ऐकून असे अनुभव दुश्मनालाही येऊ नयेत असे शामला वाटणे साहजीकच होते. कारण त्याने वयाच्या १८व्या वर्षांपासून केलेला संघर्ष हा त्याच्याजवळ जीवंत होता. तिथपर्यंत ठिक. पण या सगळ्या प्रवासात त्याला अंजू पुनः भेटावीच का? तो ते प्रकरण विसरण्याचा प्रयत्न करीत होता. पण मनाच्या गाभाऱ्यातून त्या पुसता येणार नाहीत हे तोही जाणत होता. आपले अंजूवरचे प्रेम हे शारीरिक भेठीशी जोडलेले नव्हते. त्याला काहीतरी दैवी स्पर्श होता. अशी त्याची भावना होती. जे जे काही घडत गेले तेही याच पठडीत हे ही तो जाणत होता आणि कोण जाणे काय घडणार आहे भविष्यात?

आता शेवटचे एक दोनच गृहस्थ म्हणजे ते जोडपे होते. ती कालच या वृद्धाश्रमात आली होती. त्यांना ठेवण्यासाठी जागाच शिल्लक नव्हती. पण तिथल्या पहारेकऱ्याने त्यांना आपल्या जागेत आसरा दिला होता. अजून त्यांना जागा नव्हती. सगळेच्या सगळे ७० बेडचे रूम भरले होते आणि लवकरच काही व्यवस्था होईल अशी आशाही नव्हती पण काहीतरी व्यवस्था होईल यासाठी ते आशाळभूत नजरेने वाट पहात होते.

शामला त्या दोघांनी उठून नमस्कार केला. शामला हे आवडले नाही. कारण तो कोणी मोठा उपकार कर्ता नव्हता. अडलेल्यांच्या मदतीसाठी त्याने ते केले होते. यामागे एक उदातत्तेचा विचार होता. भरपूर जागा होती. म्हणून हा प्रपंच त्याने थाटला होता. ७० कुटुंबांचा. त्याने सगळ्यांचे बोलणे ऐकून घेतले. अनेक अडचणींना हे वृद्ध सामोरे जात आपले जीवन जगत होते. त्यांना कोणाचा तरी आधार हवा होता. कमाई काही नव्हती. पण जोवर कुडीत जीव आहे तोवर त्याला साथ देणे भाग होते.

शेवटी, ते शेवटचे जोडपे उठून उभे राहिले. हात जोडले.

''मला नमस्कार करू नका! तुम्ही असे पुढे या.'' शाम.

त्याने त्यांना पुढे बसण्यास जागा करून दिली. त्या जोडप्यातला पुरुषाचा अवतार पाहून शाम पार अस्वस्थ झाला. निट कपडे नव्हते अंगावर, दाढी वाढलेली यांना आपण कोठेतरी पाहिले आहे हे त्यांना पहाताक्षणी शामला वाटले.

'आपण कृपया आपले नाव सांगाल का?''

''मी मुकूंद शेणवी!''

ते नाव ऐकताच शाम उठून उभा राहिला.

''आपण नाशिकचे का?''

''हो! आम्ही मुळचे कर्नाटकातले. पण मुंबईत स्थाईक झालो नोकरीसाठी आणि नंतर स्वत:च्या व्यवसायासाठी, पण...!''

आणि त्यांचे डोळे डबडबले. पाण्याच्या धारा लागल्या डोळ्यातून. त्यांच्या डोळ्यात सारे काही लिहिले आहे असे शामने जाणले.

''मला तुम्ही पाहिलय का कधी?''

''नाही आठवत!''

''तुम्ही वडाळ्याला रहात होतात?''

''हो! सहकारनगरमध्ये. पण पुतण्याने आम्हाला फसवले. राहती जागा बळकावली, धंदा बळकावला आणि आम्ही बेघर झालो. नाशिकला आलो. मिळेल ते काम करीत राहिलो. पण आता...! मुकुंदराव.

''ठिक आहे तुम्ही बसा. पण मी तुम्हाला ओळखतो!'' शाम.

''ते कसे?''

त्यांना सांगावे की नाही या विचारात शामने डोळे झाकले आणि त्यांच्या घरी येऊन त्याला दम मारणारे ते हेच गृहस्थ असावेत हे शामने जाणले. पण अजून नक्की काही सांगता येत नव्हते.

''तुम्ही कुटुंबात कोणकोण?''

''आम्ही दोघे आणि आमची मुलगी!''

''मुलगी? कोठे आहे ती?''

''माहिती नाही. तिचे लग्न झाले आणि तिचा संपर्क तुटला. हा तिचा

प्रेमविवाह असावा. कारण ती नाही परतली आमच्या घरी!'' मुकुंद.

''तिचे नाव?''

''अंजू!''

''हे नाव ऐकून शाम उभा राहिला. काय बोलावे हे त्याला कळेना. ती त्याची प्रेयसी आणि पत्नी अंजू होती.''

ते गृहस्थ जेव्हा भेटले तेव्हा शाम ११वीला होता. त्याने अंजूला पाठवलेल्या पत्रामुळे त्याला व त्याच्या वडिलांना भेटण्यास आलेले. ''तुमचा मुलगा माझे हृदय कापायला निघाला आहे. आवरा त्याला.'' म्हणणारे, हेच ते.''

''अंजू का तिचे नाव?''

''हो! आम्ही तिला गेल्या पंधरा वर्षांत भेटलो वा पाहिले नाही. काहीच पत्ता नाही तिचा. तिचा विवाह आम्हाला पसंत नव्हता. गुजराथी मुलगा. वेगळ्या संस्कृतीतला... पण भुलली पैशाला आणि... ''

''ठिक! तुम्ही बसा!''

शाम अगदी गांगरून गेला होता. काय बोलावे, हे त्याला समजत नव्हते. त्याने मिटल्या डोळ्याने सारा प्रकार आठवीत डोळ्यासमोर उभा केला... यात पांच मिनिटे केव्हा गेली, हेही त्याला समजले नाही.

''तुम्ही जायचे नाही. तुमची व्यवस्था मी करतो. तूम्ही मला काही परके नाही. तुम्ही मला ओळखत नाही, हे चूक. तूम्ही मला भेटला आहात. एक वेळ माझ्या वडिलांना भेटला आहात. पण नंतर संपर्क नाही. म्हणजे तशी शक्यताही नव्हती म्हणा!'' शाम.

''आपण कोठे भेटलो होतो!'' मुकुंदराव.

''ते महत्त्वाचे नाही! कळेल केव्हातरी. पण आत्ता येवढे समजा, तुम्ही माझे आहात. तेव्हा तुमची व्यवस्था करणे माझे कर्तव्य आहे.'' शाम.

ती दोघं गप्पच राहिली एकमेकांकडे पहात.

''मयूर! इकडे ये बाळ!'' शाम.

''यांना भेट! बाळ, हे तुझे आजोबा आणि या तुझ्या आज्ञीबाई!'' शाम.

मयूर पुढे आला आणि त्याने त्या दोघांना नमस्कार केला. पण तो त्यांना पहातच राहिला. काय बोलावे समजेना आणि तो शामच्या बाजूला बसला.

ती दोघंही पार चक्रावून गेले होते. काय बोलावे त्यांना समजत नव्हते. त्यांच्या मनात चिंता होती, की पुढे काय वाढून ठेवले आहे? हा मुलगा कोण? कोणाचा? आम्ही त्याचे आजोबा, आज्ञी कसे?

मग सगळ्या वृद्धांना त्याने छान डिनर दिले व एकएक वृद्धाश्रमात परतु लागले. शाम अजुनही जेवला नव्हता. पण ते जोडपे मात्र जेऊन निघणार... येवढ्यात शामने त्यांना हाक मारली. ''तुम्ही थांबा इथेच!''

ती दोघेही खुर्चीत बसली, पण चक्रावली होती. आपण चुकीच्या जागेवर तर आलो नाही ना! बाकीचे गेले आणि याने आम्हालाच का अडकवून ठेवलेय? कि वॉचमनला सांगून हाकलून लावणार आहे? त्या मुलाला त्यांनी तूझे आजी–आजोबा असे का सांगीतले? आमचीच इतकी चौकशी का? इतरांच्या बाबतीत ते काहीच बोलले नाहीत. हजार प्रश्न त्या जोडप्याच्या मनात रेंगाळत होते.

''समशेर सिंग!'' शाम. त्याने वॉचमनला हाक मारली. ''यांचे सगळे सामान इकडे घेऊन ये. या बंगल्यात!''

आता मात्र त्यांच्या मनातली धडधड अधिकच होऊ लागली होती. त्या वॉचमनने आम्हाला थारा दिला आणि यांनी आमचे सामान येथे आणायला सांगीतले.

''साहेब, आम्ही बेघर आहोत. असे करू नका! आम्हाला आसरा द्या! मोठ्या आशेने काल आम्ही येथे आलो आहोत. कृपा करावी आमच्यावर!'' मुकुंद.

''नाही! मी तुम्हाला जायला सांगत नाही. इथे, या बंगल्यात तुमची व्यवस्था करतो आहे. तुम्ही निश्चींत असा!'' शाम.

येवढ्यात वॉचमनने त्यांचे सामान आणले.

''समशेर सिंग! यांचे सामान तळमजल्यावरच्या गेस्ट हाऊसमध्ये ठेव! शाम.

''जा! तुम्ही त्या वॉचमनबरोबर जा! तेथे तुमची उत्तम व्यवस्था होईल. ती जागा सेल्फ कन्टेन्ड आहे. जेवणासाठी मात्र वृद्धाश्रमाच्या मेसमध्ये जावं लागेल तुम्हाला!'' शाम.

''धन्यवाद! उपकार झाले आमच्यावर!'' आणि ते वाकले शामला नमस्कार करायला.

''नाही! नाही! हे काय? ठीक नाही. तुम्ही मला परके नाही. पूर्व जन्मीचे ऋणानुबंध म्हणून आज आपली भेट झाली!'' शामने त्यांना नमस्कार केला.

''हे काय?''

'' बरोबर! केले ते योग्यच केले आहे!'' शाम.

ती दोघे गेस्ट रूममध्ये गेली आणि शाम आपल्या बेडरूममध्ये. मयूर अजून खेळतच होता. त्याने मेसमधून जेवण मागवले होते. तो, मयूर आणि ती दोघं त्याच्याच बंगल्यात जेवले. आता त्या दोघांची नजर गरगर फिरत होती. तो आलिशान बंगला बघण्यासाठी.

रात्री ९ वाजता झोपण्यापूर्वी शाम व मयूर स्वीमींग पूलच्या गार्डनमध्ये येऊन बसले. अर्ध्या तासाने झोपायला जाताना शामने गेस्ट हाऊसची बेल वाजवली. ती दोघे फ्रेश झाली होती.

''आता तुम्ही झोपा. मी अजून दोन दिवस येथे आहे. आपण उद्या भेटू.'' शाम.

सकाळी शाम व मयूरने नाष्टा केला आणि नेहमीची कामे आटोपली. उद्या मयूरची परिक्षा होती. तो पूर्ण दिवस तीच तयारी करत होता. त्या दिवशी शाम वृद्धाश्रमाच्या ऑफीसमध्ये गेला. सोबत ते जोडपे होते. त्यांना एक फॉर्म भरून देण्यास सांगीतला.

''हे पहा! येथे आम्ही प्रत्येकाकडून एक नॉमीनल रक्कम घेतो. कारण फुकटच्या कोणत्याही गोष्टीला किंम्मत नसते.'' शाम.

''पण आमच्याकडे काहीही नाही.''

''ठिक! तुम्ही काहीही देऊ नका. ती रक्कम मी भरेन! इथले सगळे

नियम समजाऊन घ्या. ते तुम्हाला माहित असणे जरूर आहे. दुसरे हे पहा, मी तुम्हाला या ऑफीसमध्ये काम करायला सांगणार आहे. तुम्ही इथले व्यवस्थापन पहायचे! इतर लोक तुम्हाला मदत करतील. मी आजच एक व्यवस्थापन कमिटी करतो. पाच लोकांची. ते सगळे येथे बरेच दिवस आहेत. त्यांना सगळे नियम माहित आहेत. तुम्हाला मी पूर्णपणे ओळखतो. तुम्ही खूप शिकलेले आहात. एका साखर कारखान्याचे सेल्स मॅनेजर होतात शिवाय कारखानदार. तुम्ही इथले सगळे व्यवस्थापन सांभाळाल म्हणून तुमची नेमणूक करतो आहे. पण तुम्ही बंगल्यातल्या गेस्ट हाऊसमध्येच रहायचे. येथे नाही! तुम्ही माझे आहात. मयूरचे आहात. मनातला गैरसमज पार काढून टाका आणि निश्चिंत रहा येथे. काही जरूर पडल्यास मला फोन करत जा. मी १५ दिवसांनी येथे येत जाईन. तुम्ही आजपासून या खुर्चीत बसायचे आणि हा वृद्धाश्रम आपला म्हणून त्याचा कारभार पहायचा.'' शाम.

''हे सगळे अनपेक्षित घडते आहे! तुमचे माझे नाते काय? का एव्हढा विश्वास आमच्यावर टाकत आहात? आपले नावही मी जाणत नाही.'' मुकूंद.

''मी काहीही चूक करत नाही आणि आपल्यावर मेहेरबानी करत नाही. मी तुमची योग्यता जाणतो. दैवगती आहे ही सगळी! दुसरे काहीही नाही! शाम.

नाशिकमधील सगळी कामे आटपून शाम व मयूर दोघेही मुंबईला निघाले.

''आजोबा! बाय!'' मयूर.

आपल्याला हा आजोबा म्हणतो. आपले या मुलाशी नाते काय? आणि हे गृहस्थ आहेत कोण? असे प्रश्न त्यांच्या मनात घोळत होते. पण त्याची उत्तरे मात्र त्यांच्याकडे नव्हती. शिवाय हा माणूस आपल्यावर इतका विश्वास का टाकतो?

मुकुंदरावांनी आपली कामे चालू केली. ते एक कुशल प्रशासक होते. पण परिस्थिती माणसाला कुठे आणि कशी फिरवील याचा नेम नाही. या वळणावर येईपर्यंन्त मुकूंदरावांचे जे हाल झाले हे त्यांच्या ध्यानी मनी तरी होते का? एक सुस्थितीत असणारा प्रापंचिक माणूस, आपल्याच लोकांकडून लूटला जातो,

देशोधडीला लागतो आणि आता बेवारस अवस्थेत वृद्धाश्रमात येतो काय? शाम त्यांना ओळखतो काय? आधार देतो काय? हे सगळेच बुद्धिपलिकडचे होते, हे तुम्हाला समजले असेल. आज पाने पालटली होती. मुकूंदरावांना आधार मिळाला होता.

शाम मुंबईला पोहोचला. ८.३० वाजता मयूरची परिक्षा होती. तो तयार होऊन शाळेत गेला. शाम आपल्या नायगावच्या कारखान्यात. मयूर परत येण्यापूर्वी शाम घरी आला होता. आता मयूरला बघायला कोणीही घरी नव्हते. पण ते शहाणे बाळ स्वत:ची सारी कामे स्वत: करीत होते. कोणत्याही मदती शिवाय. अन्यथा शामची हालत काय झाली असती? ही अनामत आपल्याकडे अंजूने सोपवली आणि ती निघून गेली. याचा अर्थ त्याला अजून समजला नव्हता. हा सिक्वेन्स त्याने विचारात घेतलाच नव्हता, असे नव्हे. पण प्रेमापोटी अंजूचा त्याने स्वीकारला होता.

इकडे मुकूंदरावांच्या विचार चक्राने त्यांना खूप ताप दिला होता. पण त्यांचे काम मात्र ते चोख करीत होते. याचा सगळा वृतांत तेथील कमिटी मेंबर्स शामला देत होते. आता नाशिकबद्दल शाम निश्चिंत होता. पण अंजूच्या सर्व्हिस सेंटरची जबाबदारीही शामवरच पडली होती. आजारी असताना अंजूने शामच्या नावे एक पॉवर ऑफ अॅटॉर्नी दिली होती. त्यामुळे त्या सर्व्हिस सेंटरचे सगळे काम शामलाच करावे लागत होते. तिथलेही काम ठीक चालले होते. थोडक्यात संसाराच्या विस्कटलेल्या घडीनंतरसुद्धा शामने आपल्या धंद्याची व्यवस्था नीट लावली होती.

आता कोरोना संपत आला होता. शामला जर्मनी, लंडन, अमेरीकेला येथे जाणे भाग होते. तो त्याच्या व्यवसायाचा एक भाग होता. ग्लोबलायझेनमध्ये त्याच्या कंपनीची पत वाढवणे, सर्व्हिसची क्वालिटी व ग्राहकांचा विश्वास मिळवण्याबरोबर जागतिक दर्जाची मशीनरी, स्पेअर पार्टस् बनवणे हे काम महत्त्वाचे होते. प्रश्न होता तो मयूरचा. तो जर परदेशवारीला गेला तर मयूरला ठेवावे कोठे? त्याची शाळा, अभ्यास इकडे कोण लक्ष देणार? आज बरेच दिवस शामच्या मनात एक गोष्ट सारखी घोळत होती. मुकूंदराव या उभयतांना आपण मुंबईला आणून ठेवले तर? मयूरचीही चांगली व्यवस्था होईल. त्याची

त्यांच्याजवळ चांगली ओळख होईल. त्यासाठी शामने नाशिकला जाण्याचा विचार पक्का केला.

शाम व मयूर दोघेही नाशिकला आले. आता हा विचार मुकूंदरावांकडे काढावा कसा? याच विचारात पहिली रात्र गेली. सकाळी ९ वाजता मुकूंदराव उभयतांना शामने चहासाठी डायनिंग हॉलमध्ये बोलावले व चहा पीत असताना,

''दादा, तुम्ही उभयता माझ्याबरोबर मुंबईला येता का? मी परदेश दौऱ्यावर १५ दिवस जात आहे. तेव्हा मयूरला तुम्ही माझ्या मुंबईच्या घरात राहून सांभाळायला जमेल ना?''

या एकदम समोर आलेल्या विचाराने मुकूंदराव उभयता थोडे चक्रावलेच. ''मयूरची आई असेल ना त्याची जबाबदारी घ्यायला?'' मुकूंद.

''तोच एक अडचणीचा मुद्दा आहे. तुम्ही दोघेही उद्या माझ्याबरोबर चला. अजून एक आठवडा आहे मला जायला. तोवर मयूरही तुमच्या सहवासात रुळून जाईल. तेव्हा येणार ना?''

मुकूंदरावांनी आपल्या पत्नीजवळ बोलून सांगतो असे सांगून ते दोघे तळमजल्यावरच्या गेस्ट हाऊसमध्ये आले. दोघांमध्ये चर्चा झाली आणि त्यांनी ठरविले मुंबईला जायचे. शाम हा आपला उपकार कर्ता आहे. त्याचे म्हणणे कसे नाकारावे? आणि दुसऱ्या दिवशी ते सर्वजण मुंबईला यायला निघाले. दादर जवळ आले.

''आपण कोठे रहाता?'' मुकूंदराव.

''असे आदरार्थी बोलू नका हो, मी तुमच्या मुलासारखा आहे. तेव्हा नावाने हाक मारा चालेल मला.'' शाम.

''बरं बाबा! आम्ही येथेच पुढे सहकार नगरमध्ये रहात होतो. ई–विंगमध्ये. त्या बिल्डिंग रिडेव्हलप झाल्या आहेत आता.'' मुकूंद.

गाडी उजवीकडे वळली आणि आंबेडकर रोडने कोहिनूर मिलच्या कॉम्प्लेक्समध्ये आली. ते सगळेजण लिफ्टने आपल्या फ्लॅटमध्ये आले. घरी येण्यापूर्वी शामने ड्रायव्हरला सांगितले, ''आजचे सगळे कार्यक्रम कॅन्सल करायला सांग मॅनेजरला.

त्याचे घर बघून मुकूंदराव चक्रावले. पूर्ण मजल्याचा फोर बीएचके फ्लॅट होता तो.

''आई! एक काम करा. तुम्हाला जेवणासाठी ज्या ज्या गोष्टी हव्यात त्या सांगा. ड्रायव्हरला सांगून मागवून घेतो. येथे आम्ही दोघेच रहातो. मयूर आणि मी. तेव्हा हा ब्रह्मचाऱ्यांचा संसार आहे. आम्ही जेवणाचे डब्बे बाहेरून मागवतो. चहा/कॉफीशिवाय काहीही करीत नाही.'' शाम.

''तुमची पत्नी कोठे आहे?'' आई.

''आहे दाखवतो! म्हणत शामने त्या दोघांना हॉलमध्ये आणले आणि अंजूचा फोटो दाखवित, ''ही मयुरची आई आणि माझी पत्नी!'' शाम.

''अरे! अरे ही तर अंजू वाटते!'' मुकूंदराव.

''बरोबर ती अंजूच आहे.'' तिचा हार घातलेला फोटो पाहून त्या दोघांना हुंदका फुटला. ती दोघे ओक्साबोक्सी रडू लागली. त्यांना शांत करीत शामने सगळी हकिकत त्यांना सांगितली.

''म्हणजे तुम्ही.''

''तुम्ही नाही. शाम... हो मीच तो शाम. अंजूला पत्र लिहिणारा ११वीत असताना आणि आता हे वर्तुळ पूर्ण झाले होते. अंजूच्या आईने मयुरला जवळ घेतले. पटापट मुके घेतले त्याचे आणि पुन्हा त्यांना पान्हा फुटला.''

आज शामच्याही डोळ्यात पाण्याचा डोह झाला होता जमा. शामने अंजूच्या फोटोसमोर निरांजन लावले व ते सगळे जण उठले. मयूरची उद्या परिक्षा होती. तो आपल्या बेडरुममध्ये गेला. मयूरला अंजू (फोटोमधली) आपली आई आहे येवढेच माहित होते. बाकी गौडबंगाल त्याच्या ध्यानी येत नव्हते. पण हॉलमध्ये बदललेले वातावरण त्याच्या नजरेमधून सुटले नव्हते. शामही मयूरबरोबर त्याच्या बेडरूममध्ये आला.

''पप्पा हे आजोबा आजी का रडत होते?'' मयूर.

''कारण तुझी आई ही त्यांची मुलगी आहे! म्हणून...''

''म्हणजे हे माझे आजी–आजोबा!''

''हो!''

आता मयूर अभ्यासाला लागला. आता तो ९वीत होता. हे वर्ष महत्त्वाचे होते. पुढच्या करियरसाठी. याची कल्पना शामने मयूरला दिली होती. त्यामुळे मयूर अभ्यासाला लागला होता.

आज कोणीही जेवणाच्या मूडमध्ये नव्हते. आलेल्या डब्यातच चौघांचे जेवण झाले.

शामला ३/४ दिवसांतच युरोप दौऱ्यावर निघावे लागणार होते. म्हणून तोही आपली तयारी करत होता. सगळ्या कारखान्यात असलेल्या स्पेअर पार्टस्‌चा पूरा स्टॉक तो घेण्यासाठी उद्या पुण्याला जाणार होता.

दुसऱ्या दिवशी मयूरला त्या दाम्पत्याच्या हवाली करून शाम पुण्याला गेला. आज शाम खूपच स्वस्थ होता. आज मयूरचे आजी-आजोबा आले होते. ते दाम्पत्य आपल्या नातवाची पूर्ण काळजी घेत होते. मयूरही खूष होता. मुंबईला येताना शाम व्हाया नाशिक आला. तिथल्या व्यवस्थापनाची व्यवस्था लावून.

आणि रात्रीच मेल आल्याने तो तातडीने युरोप-लंडनच्या दौऱ्यावर निघून गेला.

इकडे शामच्या सासू-सासऱ्यांनी मयूरची छान व्यवस्था ठेवली होती. मयूर रोज शामला सगळी इन्फर्मेशन देत असे. तो खूष होता आणि शामही निश्चिंत होता. एक एक गोष्ट आता रूळावर येत होती.

युरोप दौरा आटोपून शाम भारतात परत आला, तो नव्या योजनांची जंत्री घेऊनच. तिथल्या कंपन्या फायनान्स करायला तयार होत्या. हिंदुस्थानभर मर्सीडीजची सेल्स ॲन्ड सर्व्हिस सेंटर्स उघडण्याची तो योजना आखत होता. खरेतर शामचे हे स्वप्न होते आणि त्यासाठी नव्या कंपनीची स्थापना त्याने त्याच्या चीफ जनरल मॅनेजर यांच्या मदतीने आखली. मर्सीडीज बेंझचे चेअरमन या कंपनीत डायरेक्टर झाले. चेअरमनची जबाबदारी शामवरच सोपवण्यात आली. वर्षभरात हे काम पूर्ण करायचे होते. प्रथम भारतातील सर्व राज्यांच्या राजधान्यांमध्ये ही सेंटर्स उघडली. नंतर छोटी-मोठी शहरे कव्हर करावी. अशी ती योजना होती. शिवाय तिथल्या भारतीय कंपन्यांना त्यांच्या

गाड्यांचे स्पेअर पार्टस् तो सप्लाय करीत होता. ऑटोमोबाईल इंडस्ट्रीजचे अप–डाऊन नेहमी चालू असते. पण इंर्पोटेड गाड्या चालत आहेत.

शामचा युरोप दौरा यशस्वी झाला. फॉरेन इन्हेसमेन्टचा ओघ सुरू झाला. सरकारनेही इंडस्ट्रीला व इतर गोष्टीत चांगल्या सुविधा बजेटमध्ये ऑटो इंडस्ट्रिला दिल्या. आता आपला व्याप कसा वाढवायचा असा विचार शाम करत होता.

घरी सगळे सुरळीत चालले आहे. गेली दोन वर्षे शामचे सासू–सासरे त्याच्याबरोबर रहात होते. मयूरही आता महाविद्यालयात जायला लागला होता. त्याला शामने पाचगणीला नेऊन ठेवले होते. रोज रात्री तो बोलायचा त्याच्याबरोबर. पण चार महिन्यातच तो कंटाळला. त्याला हवा होता शामचा सहवास, प्रेमाची उब. म्हणून त्याने त्याला रूईया महाविद्यालयात सायन्सला घातले. आता तो खूप आनंदात होता. त्या दोघातले मेतकूट नजर लागण्यासारखे होते. आईपासून दूर राहिलेले ते बाळ आताशा हळवे होत गेले होते.

पण शाम मात्र कमालीचा अस्वस्थ होत जात होता. अंजूचा विरह त्याला सहन नव्हता होत. एकाकीपणाची जाणीव त्याला सतावीत होती. रात्री रात्री तो जागून काढायचा. फक्त आधार होता तो मयूरच्या सहवासाचा.

त्याची ही अवस्था सासू–सासऱ्यांच्या नजरेतून सुटत नव्हती. त्यांना वाटे अंजूच्या जाण्याने तो अस्वस्थ होत आहे. तिची जागा घेणारी कोणीतरी शामची गरज आहे. शामच्या अशा एकाकी अवस्थेत जगणे पुरूषाला खूप क्लेशकारक वाटत असते. म्हणून त्याच्या सासू–सासऱ्यांनी एक प्रस्ताव ठेवला.

''शाम! आम्हाला नाही बघवत तुमची ही अवस्था. तुम्ही दुसरे लग्न का नाही करीत?'' सासरे.

शामने हे फक्त ऐकून घेतले आणि तो कडाडला.

''अंजूसाठी आयुष्यभर अविवाहीत रहाण्याचा मी पण केला होता. पण तिच्या येण्याने माझ्या निर्धाराला खिंडार पडले. माझे तिच्यावर प्रेम होते.

खरेखुरे प्रेम. नव्हते तकलादू, पण मयूरसाठी आणि अंजूच्या घुसमटीवर उपाय म्हणून, मी हा पर्याय निवडला. अन्यथा जर ती माझ्या आयुष्यात आलीच नसती, तर तिच्या प्रेमात भिजत मी माझे आयुष्य जगलो असतो. तिच्याशी झालेला विवाह हा एक अपघात होता. लोकांच्या नजरा टाळण्यासाठी. अन्यथा मी अविवाहित रहाणेच पसंत केले असते. त्यातून मयूरला वडिल आणि अंजूला पती ही तडजोड मी स्वीकारली. हा माझा प्रवास वळणावळणाच्या वाटेसारखा होता. म्हणून आजही मला विवाह करण्याची गरज नाही. मी मयूरचा बाप, याच भूमिकेत असून, तो सुखी व्हावा असेच मला वाटते. मला पुनः आगीशी खेळण्याची माझी इच्छा नाही. कारण जसा मयूरला मी मुलगा म्हणून स्वीकारला, तसा येणारी दुसरी स्त्री त्याला मुलगा म्हणून स्वीकारेल का?''

या त्याच्या निर्धाराने सासू–सासरेही गप्प राहिले आणि वीस वर्षांपूर्वी या दोघांच्या प्रेमात आपण अडसर आणला, या गुन्हेगार भावनेने त्यांच्या डोळ्यात अश्रू आले.

''तुम्ही दुःखी होऊ नका. हा विचार मला कधीच शिवणार नाही. मी मयूरची बाप म्हणून काळजी आईसारखीच घेत आहे.'' शाम.

''क्षमा कर! शाम, आम्ही तुला नाही ओळखू शकलो. क्षमा कर!!'' मुकुंदराव.

नाही. ही वळणावळणाची वाटच आमच्या दोघांमधील चढउताराची साक्ष आहे. आणि ती तशीच राहील. मी उघड्या डोळ्यांनी प्रत्येक वळणावर तिचे स्वागत करीन. कारण 'अंजू' माझ्या हृदयात कायम ठाण मांडून आहे. ती बोलते माझ्याशी. प्रत्येक छोट्या मोठ्या प्रसंगात ती मला मार्ग दाखवते. मोठ्या प्रसंगात ती मला स्फूर्ती देते. ती माझ्या वाटचालीचा गुरू आहे. आशा–आकांक्षाची ती साक्षीदार आहे, या वळणावळणाच्या वाटेवर!!

❊ ❊ ❊



लेखक

## ॲड. यशवंत बाबुराव कदम

(नमनेश्वर)

आजकालच्या धावपळीच्या आयुष्यात माणसांकडे वेळच नसतो त्यामुळे मला या कादंबरीविषयी एक गोष्ट आवडली ती म्हणजे ही कादंबरी सुपरफास्ट पद्धतीने पुढे सरकते. एका माणसाच्या आयुष्यातील पन्नास वर्षाचा पट हा त्र्यान्नव पानांमध्ये मांडते.

या कादंबरीत कोरोनाकाळात घडलेल्या काही घटनाही सहजपणे आणि तितक्याच नेमकेपणाने येतात त्यामुळे ही कादंबरी वास्तववादी वाटते. 'वृद्धाश्रमा' सारखा एक वेगळा आणि आजच्या काळातील महत्त्वाचा विषय या कादंबरीमध्ये हाताळला गेला आहे, ही गोष्ट सुद्धा मला फार महत्त्वाची वाटते. वडिलांकडे असुरक्षित वाटणाऱ्या आणि कॅन्सरग्रस्त होऊन हे जग सोडून गेलेल्या आईमुळे अनाथ झालेल्या मुलाचा सांभाळ करणारा या कादंबरीचा अत्यंत त्यागी वृत्तीचा आणि स्फूर्तीदेवते पुढे सदा नतमस्तक झालेला नायक शाम हा आपल्या मनात घर करतो. ही कादंबरी सर्व वयोगटातील वाचकांच्या मनाचा ठाव घेईल आणि जीवनाकडे बघण्याची एक सकारात्मक दृष्टी देईल, हे निश्चितच !

**प्रा. प्रतिभा सराफ**

कोमल प्रकाशन